**गोपनीय**

**क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१५४**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई – ४०० ०५१.

दिनांक : २४ मार्च, २०२३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १० मार्च, २०२३ (शुक्रवार) रोजी झालेल्या १५४व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२८.३.२०२३

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

प्रति,
सर्व सदस्य व निमंत्रित

__प्रत अग्रेषित :-__
मा. मुख्यमंत्री व नगर विकास मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय
मा. उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५४व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक : १० मार्च, २०२३ (शुक्रवार)**
**वेळ : दुपारी ०३.०० वाजता**
**स्थळ : मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष,**
**विधानभवन,**
**मुंबई — ४०० ०२१.**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. एकनाथ शिंदे<br>माननीय मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री | - | अध्यक्ष |
| श्री. देवेंद्र फडणवीस<br>माननीय उप मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री | - | सदस्य |
| श्री. मनुकुमार श्रीवास्तव<br>मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>अपर मुख्य सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| डॉ. संजय मुखर्जी<br>व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको | - | **सदस्य** |
| श्री. एस.व्ही.आर.श्रीनिवास<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | **सदस्य-सचिव** |

**निमंत्रित :**

श्री. प्रकाश निकम
अध्यक्ष,
पालघर जिल्हा परिषद

श्री. मनुज जिंदल
प्रशासक,
पालघर जिल्हा परिषद

श्री. आर.एल.मोपलवार
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

बैठकीच्या सुरुवातीस माननीय मुख्यमंत्री व नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण तसेच मा. उप मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१५३व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१५३व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : प्राधिकरणाचे सन २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्र**

३.१ महानगर आयुक्त यांनी मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाचे सन २०२३-२४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम, १९७६ मधील अ.क्र. ३ (४) अन्वयें मुंबई महानगर प्रदेश विकास (मुंमप्रवि) निधीचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :-

**जमा :-**

सन २०२३-२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात **रु.२३,६८९.७७ कोटी इतकी रक्कम जमा** होईल असे अपेक्षित आहे. यात प्रामुख्याने राज्य शासनाकडून मिळणारे दुय्यम कर्ज रक्कम रु.६१५ कोटी, जमीन विक्रीपोटी रु.४,२१७ कोटी, कर्जाऊ रक्कमा रु.१४,९८९.४३ कोटी, इतर जमा रक्कमा रु.१,८७७.४४ कोटी, शासन अनुदान/विकास हक्क हस्तांतरण रु.१,१९०.९० कोटी, नागरी परिवहन निधी रु.८०० कोटी इत्यादीचा समावेश आहे.

**<u>खर्च :-</u>**

सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात **रु.२८,७०४.१८ कोटी इतकी रक्कम खर्च** होईल असे अंदाजित आहे. त्यापैकी सुमारे ९४ % इतका म्हणजे रु. २७,०७९.६९ कोटी हा पायाभूत सुविधा प्रकल्पांवर खर्च करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त सर्वेक्षणे, अभ्यास रु.२१८.७६ कोटी, अनुदाने रु.२४४.७७ कोटी, कर्ज व अग्रीम रु.२५७.०३ कोटी, प्रशासकीय खर्च रु.६५८.२१ कोटी आणि इमारत, संगणक खरेदी, फर्निचरसाठी रु.२४५.७२ कोटी इत्यादीचा समावेश आहे.

चर्चेदरम्यान असे नमूद केले की, प्राधिकरणाकडे स्वत:चे कोणतेही कायमस्वरूपी व प्रवाही आर्थिक स्त्रोत नाही ही बाब लक्षात घेऊन मेट्रो प्रकल्प मंजूर करताना राज्य शासनाने वेळोवेळी काही आदेश निर्गमित केले आहेत व त्याअनुषंगाने दरमहा / दरवर्षी काही उत्पन्न प्राधिकरणास येणे अपेक्षित आहे. यामध्ये खालील घटक समाविष्ट आहेत :-

अ) **<u>मुद्रांक शुल्क</u>** : मुद्रांक शुल्काच्या सदर मेट्रो सेसपोटी साधारणत: माहे फेब्रुवारी, २०१९ ते मार्च, २०२० या कालावधीकरीता रु. १३१६.६७ कोटी शासनाकडे जमा झाले असून, त्यापैकी मुद्रांक शुल्कावरील १% अधिभार रक्कम रु.४०० कोटी वितरीत करण्यास दि.२०/०२/२०२३ रोजी शासनाने मान्यता दिली आहे. दरवर्षी सुमारे रु. १००० कोटी इतकी रक्कम येणे अपेक्षित आहे.

ब) **<u>विकास आकार</u>** : महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेल्या दिनांकापासून प्रचलित विकास शुल्कामध्ये १००% वाढ करणे व जमा झालेले वाढीव विकास शुल्क निकडीचे नागरी परिवहन प्रकल्प राबविणाऱ्या संस्थेकडे वर्ग करावयाचे आहे. सदर सुधारणेमुळे प्राधिकरणास दरवर्षी सुमारे रु.२,००० कोटी मिळणे अपेक्षित आहे. तथापि, याबाबत शासनाकडून कार्यवाही होणे गरजेचे आहे.

..४/-

**क)** **परिवहन केंद्रित विकास (TOD) :** शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत परिवहन केंद्रित विकास व अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.) ची तरतूद आहे. सदर तरतूदीमुळे प्राधिकरणास दरवर्षी सुमारे रु. १,३०० कोटी मिळणे अपेक्षित आहे. प्राधिकरणाने दि. २६ जून, २०२० व दि. ८ ऑगस्ट,२०२० रोजी याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

**ड)** **प्राधिकरणास येणे असलेल्या इतर रक्कमांचा तपशील : -**

प्राधिकरणाने सन १९९५ ते सन २००० पर्यंत विविध शासन आणि शासकीय संस्था यांच्याकडे ठेवी ठेवलेल्या होत्या. तथापि, काही संस्थानी मुदत ठेवी मुदतीनंतर परत केलेल्या नाहीत. माहे डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत व्याज व मुद्दल विचार घेता रु. २५५६.३२ कोटी इतकी रक्कम येणे आहे.

तद्नंतर, महानगर आयुक्त यांनी सन २०२२-२३ मध्ये पूर्ण केलेले प्रकल्प , सन २०२३-२४ मध्ये पूर्ण होणारे प्रकल्प आणि सन २०२३-२४ मध्ये नव्याने हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती दिली.

**सन २०२२-२३ मध्ये पूर्ण केलेले प्रकल्प**

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव |
|---|---|
| १ | मेट्रो मार्ग २अ – (दहिसर (पु) ते अंधेरी (प.) |
| २ | मेट्रो मार्ग – ७ (अंधेरी पूर्व-दहिसर पूर्व) |
| ३ | सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यावरील वाकोला ते कुर्ला उन्नत मार्ग |
| ४ | मालाडमधील कुरारगाव भूयारी मार्ग |
| ५ | पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी, ठाणे येथील रेल्वे ओलांडणी पुल (ROB) |
| ६ | कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे ६ पदरी पुल |
| ७ | जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील नावडेफाटा येथील उड्डाणपुल |
| ८ | नायगांव जूचंद्र-बोपाणे येथील राज्यमार्ग व उड्डाणपूल बांधकाम |
| ९ | मुंब्रा वाय जंक्शन येथील उड्डाणपूलाचे बांधकाम |

## सन २०२२-२३ मध्ये पूर्ण होणारे प्रकल्प

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव |
|---|---|
| १ | सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (टप्पा-१ वसई-विरार) |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आंतरराज्यीय टर्मिनल (T१) उड्डाणपूल |
| ३ | पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर (पुर्व) उड्डाणपूल |
| ४ | सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता प्रकल्पातील केबल-स्टे पूलाचे तसेच मुंबई विद्यापीठ ते पश्चिम द्रुतगती महामार्गास जोडणाऱ्या उन्नत मार्गाची कामे |
| ५ | ऐरोली - कटाई नाका रस्ता प्रकल्प भाग-१ व २ |
| ६ | मा. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक |
| ७ | विस्तारित नागरी सुविधा प्रकल्पांतर्गत (MUIP-Extn.) मोटागांव-माणकोली रस्त्यावर उल्हासखाडी ओलांडूण सहा पदरी पुलाचे बांधकाम |
| ८ | पारसी पंचायत, जनता वसाहत व आकुर्ली येथे भुयारी मार्ग |
| ९ | मुंबई पारबंदर प्रकल्प (MTHL) |

## सन २०२३-२४ या वर्षात सुरु करण्यात येणारे नवीन प्रकल्प

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव |
|---|---|
| १ | वर्सोवा-विरार सागरी सेतू |
| २ | मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह, सागरी किनारामार्गापर्यंत भूयारी मार्ग |
| ३ | ठाणे ते बोरीवली दरम्यान दोन भुयारी मार्ग |
| ४ | पूर्व द्रुतगती महामार्गावर ठाणे शहरातील तीन हात नाका जंक्शन येथे वाहतुक सुधारणा करणे |
| ५ | मुंबई पारबंदर प्रकल्प ते मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग जोडरस्ता |
| ६ | बाळकुम ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्ग(ठाणे कोस्टल रोड) |
| ७ | ठाणे, पालघर जिल्ह्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विकास कामे |
| ८ | देहरजी मध्यम प्रकल्प |
| ९ | भिवंडी-वाडा रोड राज्यमार्ग (क्र.३५) विश्वभारती नाका ते भिनार ते वडपे |
| १० | छेडानगर-घाटकोपर ते ठाणे पर्यंत पूर्व मुक्त मार्गाचे विस्तारीकरण |
| ११ | पूर्व द्रुतगती महामार्गावर ठाणे शहरातील आनंद नगर ते साकेत रस्ता |
| १२ | कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-३ |

अर्थसंकल्पावर चर्चा करताना मा. उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांनी भिवंडी-रिंग रोडचेही काम हाती घेण्याबद्दल सूचित केले. अर्थ संकल्पावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर

महानगर आयुक्त यांनी सन २०२३-२४ या वर्षाचा अर्थसंकल्पास मान्यता देण्याबाबत प्राधिकरणास विनंती केली.

**३.३ चर्चेनंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६३९:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) अन्वयें प्राधिकरणाचे सन २०२३-२४ चे मूळ अर्थसंकल्पीय जमा रु.२३,६८९.७७ कोटी व खर्च रु.२८,७०४.१८ कोटी अंदाजित आहे आणि सन २०२२-२०२३ वर्षाचे सुधारीत अंदाज मंजूर करण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधी अंदाजित जमा रु. २२०.०० कोटी व खर्च रु. ५.०० कोटी आणि महानगर योजना – फिरता निधी यांचे अंदाजित जमा रु.५०.६५कोटी व खर्च रु.६२.९० कोटी दर्शविणारे सन २०२३-२०२४ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०२२-२०२३ चे सुधारीत अंदाज मंजूर करण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाकडे उपलब्ध असणारे निधिचे स्त्रोत अतिशय मर्यादित स्वरुपाचे असल्याने उपलब्ध होऊ शकणाऱ्या सर्व संसाधनाचे कार्यक्षम एकत्रीकरण (Most Efficient Resource Mobilization) होण्यासाठी प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या मालमत्तेचे मुल्यीकरण (Assets Monetisation) Infrastructure Investment Trusts (InvITs) / Toll Operate Transfer (TOT) / Alternate Investment Fund (AIF) इत्यादी माध्यमाद्वारे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर माध्यमांचा वापर करुन प्रकल्पांच्या मालमत्तेचे मूल्यीकरण (Assets Monetisation) झाल्यावर, प्रकल्पांसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करता येईल. तसेच उर्वरीत निधीमधून नवीन प्रकल्प हाती घेण्यास आणि आवश्यक तिथे SPV स्थापन करण्यास आणि आवश्यक ते तज्ज्ञ सल्लागार नेमण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

..७/-

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** यापूर्वी महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिल्याप्रमाणे रु. ६०,००० कोटीच्या कर्जांपैकी मेट्रो प्रकल्पासाठी प्रथम टप्प्यात रु. १२,००० कोटी इतक्या रक्कमेची शासन हमी प्राप्त झाली आहे. इतर प्रस्तावित प्रकल्प जसे की, ठाणे ते बोरीवली (संजय गांधी राष्ट्रीय उद्यान) भुयारी मार्ग, मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम इत्यादी पूर्ण करण्याच्या दृष्टीने REC / PFC अथवा इतर संस्था / बँका यांच्याकडून कर्ज घेण्यास व याकरिता शासन हमी मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** उपरोक्त ठरावाची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत."

**बाब क्र.४ : प्राधिकरणाचा सन २०२३-२४ चा वार्षिक कार्ये कार्यक्रम.**

४.१ महानगर आयुक्त यांनी मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाचा सन २०२३-२४ च्या वार्षिक कार्यक्रमाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विनियम, १९७६ मधील नियम ४ नुसार सन २०२३-२४ या वर्षाचा वार्षिक कार्ये कार्यक्रम मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे. सन २०२३-२४ या वर्षात राबविण्यात येणा-या महत्वपूर्ण योजना / प्रकल्पांची माहिती थोडक्यात सांगितली. प्राधिकरण पुढील आर्थिक वर्षात एकूण ११० प्रकल्प/योजना राबविणार आहे. सन २०२३-२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. २८,७०४.१८ कोटी इतका खर्च होणार आहे. याबाबतची अर्थसंकल्पीय तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. वार्षिक कार्ये कार्यक्रमावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर सन २०२३-२४ या वर्षाच्या वार्षिक कार्ये कार्यक्रमास मान्यता देण्याबाबत प्राधिकरणास विनंती केली.

**४.२ त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६४०:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीसह सादर केलेल्या सन २०२३-२४ वर्षाचा वार्षिक कार्ये कार्यक्रम व मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना – फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रमास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता प्रकल्पाच्या सुधारित रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

५.१ महानगर आयुक्त यांनी प्रकल्पाची माहिती देताना सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या १५३ व्या बैठकीत वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा ऐवजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राहील असा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (म.रा.र.वि.म.) सदर प्रकल्पासाठी यापूर्वी सुमारे रू.३२ हजार कोटी इतकी ढोबळ अंदाजित किंमत दर्शविण्यात आली होती. तथापि, प्रकल्पाची सुधारीत अंदाजित किंमत रू.४० हजार कोटी होण्याची शक्यता असल्याबाबत प्राधिकरणाच्या १५३ व्या बैठकीत चर्चा झाली. त्या अनुषंगाने, सदर बैठकीत प्रकल्पाच्या बांधकामाकरिता रू.४० हजार कोटी इतक्या अंदाजित रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

५.२ चर्चेस अनुसरून सदर प्रकल्पाची शक्यशक्यता तपासणे, व्यवहार्यता व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दि.१३.०९.२०२१ रोजी मे. पेंटॅकल-सेमोसा (जेव्ही) कं. या सल्लागाराची नियुक्ती केली. तद्नंतर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व सल्लागार यांच्यासमवेत प्रकल्पाच्या कामाकरिता दि. २३.०९.२०२१ रोजी करारनामा झाला. सदर करारनाम्यातील कामाच्या वावानुसार (Scope of Work) सल्लागाराने अंतिम व्यवहार्यता अहवाल दि.०६.१०.२०२२ रोजी म.रा.र.वि. महामंडळास मान्यतेस्तव सादर केला. सल्लागाराने महामंडळास सादर केलेल्या प्रकल्पाच्या अंतिम व्यवहार्यता अहवालानुसार प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रू.६३,४२६/- कोटी इतकी आहे. प्राधिकरणाच्या १५३व्या बैठकीत झालेल्या चर्चेवेळी सल्लागाराने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास

सादर केलेल्या अंतिम व्यवहार्यता अहवालात नमूद केलेली प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत प्राधिकरणास अवगत नव्हती. तसेच सदर अंतिम व्यवहार्यता अहवालास (Final Feasibility Report) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दि.०७/११/२०२२ रोजी मान्यता दिली. प्रकल्पासाठीचा प्राथमिक प्रकल्प अहवाल (Preliminary Project Report) केंद्रीय आर्थिक व्यवहार विभागाच्या (Department of Economic Affairs) संकेतस्थळावर जतन करण्यासाठी व जायकामार्फत अर्थसहाय्य घेण्यासाठी सविस्तर प्रस्ताव महाराष्ट्र शासनास दिनांक २९.११.२०२२ रोजी सादर करतेवेळी प्राधिकरणाने प्रकल्पाचा व्यवहार्यता अहवाल प्राप्त करून घेतला. चर्चेवेळी, मा. मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर प्रकल्पाचा सविस्तर अहवाल करतेवेळी विरार ते पालघर पर्यंतच्या लांबीसाठी नियंत्रित मार्गिकेचा (Access Control) अभ्यास करण्याचे निर्देशित केले.

५.३ सदर प्रकल्पास लागणाऱ्या खर्चाचा विचार करता कर्ज सहाय्य प्राप्त करून घेण्यास्तव प्राथमिक प्रकल्प अहवाल (Preliminary Project Report) केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागाच्या (Department of Economic Affairs) संकेतस्थळावर दि.१०/०२/२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या (वित्त व नगर विकास विभाग) मान्यतेसह निती आयोग व केंद्र शासनाच्या नगर विकास विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. निती आयोग व केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाची प्राथमिक प्रकल्प अहवालास मान्यता मिळताच सदर प्राथमिक प्रकल्प अहवाल केंद्रीय आर्थिक व्यवहार विभागाच्या स्क्रिनिंग समिती (Screening Committee) च्या शिफारसी / मंजूरीनंतर जायका या वित्तीय संस्थेमार्फत प्रकल्प उभारणीसाठी कर्ज सहाय्य उपलब्ध होणेस्तव मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या धर्तीवर राज्य व केंद्र शासनाची हमी घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले. सदरबाबत केंद्र शासनाकडे प्राधिकरणाचा पाठपुरावा सुरु आहे. तथापि, सदर प्राथमिक प्रकल्प अहवालास मान्यता मिळणेस्तव शासनाच्या स्तरावर केंद्र शासनास विनंती व्हावी अशी विनंती महानगर आयुक्तांनी प्राधिकरणास केली.

५.४ सदर प्रकल्पासाठी महामंडळाने नियुक्ती केलेल्या मे. पेंटॅकल-सेमोसा (जेव्ही) कं. या सल्लागाराचे एकूण शुल्क रू. २६.२३ कोटी (वस्तु व सेवाकर वगळून) असून कामाच्या वावानुसार आत्तापर्यंत झालेल्या कामासाठी रू.६.५५ कोटी इतकी रक्कम सल्लागारास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे अदा करण्यात आलेली आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत होणार असल्यामुळे,

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व सल्लागार यांच्यात झालेल्या करारनाम्याच्या धर्तीवर, प्राधिकरणाने सल्लागार मे. पेंटॅकल-सेमोसा (जेव्ही) यांच्यासोबत उर्वरीत कामाच्या वावाकरिता करारनामा करणे क्रमप्राप्त आहे. प्रस्तावित प्रकल्प हा विस्तृत स्वरूपाचा असल्याने व मुंबई महानगर प्रदेशातील विकासाच्या अनुषंगाने महत्त्वकांक्षी असल्याने मे. पेंटॅकल-सेमोसा (जेव्ही) कं. यांचेमार्फत तयार करण्यात येणाऱ्या प्रकल्प अहवाल व सर्वेक्षणाचे समवयस्क पुनरावलोकन (Peer Review) करणे आवश्यक असल्याने त्याकरीता स्वतंत्र सल्लागाराची नियुक्ती करणे हे क्रमप्राप्त आहे.

**५.५ त्यानंतर, सविस्तर चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६४१:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पाच्या बांधकामासाठी सुधारीत रक्कम रू.६३,४२६/- कोटी इतक्या अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नियुक्त केलेले सल्लागार मे. पेंटॅकल-सेमोसा (जेव्ही) यांच्यासोबत उर्वरीत कामाच्या वावाकरिता करारनामा करण्यासाठी व त्याअनुषंगाने सल्लागाराच्या सेवा शुल्कापोटी होणाऱ्या संभाव्य अतिरिक्त आर्थिक खर्चासह प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** मे. पेंटॅकल-सेमोसा (जेव्ही) यांचेमार्फत तयार करण्यात येणाऱ्या प्रकल्प अहवाल व सर्वेक्षणाचे समवयस्क पुनरावलोकन (Peer Review) करणेकरीता स्वतंत्र सल्लागार नेमण्याकरीता व त्याअनुषंगाने सल्लागाराच्या सेवा शुल्कापोटी होणाऱ्या संभाव्य खर्चासह प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** विरार ते पालघर पर्यंतच्या लांबीसाठी नियंत्रित मार्गिकेचा (Access Control) अभ्यास करण्याकरिता प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.६ : मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतूकीच्या दळणवळणासाठी भूयारी मार्गाचे बांधकाम करण्याच्या कामास प्रशासकीय मंजुरी देणेबाबत व सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत.**

६.१ प्रकल्पाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत मुंबई शहराच्या पूर्व किनारपट्टीस समांतर असा मानखुर्द चेंबूर जोडरस्त्यापासून पी' डिमेलो रस्त्यावरील ऑरेंज गेट पर्यंत पूर्व मुक्त मार्ग बांधण्यात आला आहे. या मार्गामुळे दक्षिण मुंबईकडे जलदगतीने वाहतूक करणे शक्य झाले आहे. पूर्व मुक्त मार्गावरील वाहतूक, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ऑरेंज गेट येथे गजबजलेल्या पी' डिमेलो मार्गावर येऊन मिळते. त्यामुळे गर्दीच्या वेळी या ठिकाणी वाहनांच्या लांब रांगा लागतात आणि मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होते. तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल जवळील पी' डिमेलो मार्गावरील मुख्य पोस्ट ऑफिसच्या चौकात वाहतुकीचे नियमन करणे अवघड होत आहे. मुंबई महापालिकेतर्फे मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीस समांतर किनारा मार्गाच्या कामाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. परंतु, मुंबई शहरात पूर्व पश्चिम बाजूस जोडणारी प्रभावी वाहतूक निर्गमन व्यवस्था नसल्याने मुंबईकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो व पर्यायाने इंधन व वेळेची हानी होत आहे.

६.२ मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह येथून सागरी किनारा मार्गापर्यंत वाहतुकीच्या दळणवळणासाठी उन्नत/ भुयारी मार्गाचे बांधकाम" या प्रकल्पाची शक्याशक्यता तपासण्यासाठी (Feasibility Study) व सविस्तर प्रकल्प अहवाल बनविणे (DPR) या कामांकरिता तसेच कंत्राटदाराच्या व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणूकीसाठी निविदा प्रक्रिया करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांचेकडून दिनांक २६ जुलै, २०२२ रोजीच्या टिप्पणी अन्वये मान्यता प्राप्त असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. उपरोक्त मान्यतेनुसार विहित निविदा प्रक्रिया राबवून प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. पडॅको कंपनी लि. जपान यांची नेमणूक करण्याच्या प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७२ व्या बैठकीत मान्यता घेऊन सल्लागाराची दि.१५ नोव्हेंबर, २०२२ रोजी नेमणूक करण्यात आली.

सल्लागाराच्या कामाच्या वावामध्ये सदर प्रकल्पाच्या आखणीमध्ये भुयारी मार्ग करण्याकरीता शक्याशक्यता अभ्यास (Feasibility Study) करून तांत्रिकदृष्टया सुसाध्य मार्गाची आखणी करण्याचा वाव आहे. तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रक बनविण्याचे कामाचे आणि कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमणूकीच्या कामासाठी सहाय्य इत्यादी बाबींचा अंर्तभाव आहे.

सद्यस्थितीत सल्लागाराने प्रकल्पाचा इन्स्पेक्शन अहवाल, शक्यशक्यता अहवाल- feasibility report सादर केला आहे. तसेच ड्रोन सर्वेक्षण, सेवा वाहिन्याचे सर्वेक्षण पुर्ण केले असून, भू-चाचणी सर्वेक्षण व सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. भुयारी मार्गाच्या दोन्ही बाजूस वाहतूकीची सुविहित पध्दतीने विकीरण व्यवस्था प्रस्तावित असून त्यासाठी वाहनांच्या रहदारीचा अभ्यास करण्यात आला आहे.

सल्लागारामार्फत सदरच्या प्रकल्पाच्या प्रस्तावित मार्गरेषा पूर्व मुक्त मार्गाच्या ऑरेंज गेट पासून चिंचबंदर रेल्वे ओलांडणी पुलाच्या पूर्वेकडून सुरु होते व सरदार वल्लभभाई पटेल या रस्त्यावरुन हार्बर व मध्य रेल्वेमार्ग ओलांडून, मोहम्मद अली रस्ता ओलांडून, पठ्ठे बापूराव मार्ग (अलंकार सिनेमा चौक), राजा राजमोहन रॉय मार्ग, (हरकिसन नरोत्तमदास हॉस्पिटल), तसेच विठ्ठलभाई पटेल रस्ता, लॅमिंग्टन रोड, न्यू क्वीन रस्ता, पश्चिम रेल्वेवरील वरेकर रेल्वे पुल इ. रस्ते ओलांडून नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग (मरिन ड्राईव्ह) येथे सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान अशी प्रस्तावित आहे. (CTS) Comprehensive Transport Study चा भाग नाही. सदरच्या प्रकल्पाचा प्रस्तावित मार्गरेषा दर्शविणारा नकाशा देखील दाखविण्यात आला.

सदरच्या मार्गरेषेनुसार मुंबई पोर्ट ऑथॉरटी, बृहन्मुंबई महानगरपालिका, भूमिगत मेट्रो लाईन ३ इत्यादी आस्थापनाशी समन्वय साधुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. यामध्ये पूर्व मुक्तमार्ग ऑरेंजगेट याठिकाणी मुंबई पोर्ट ऑथोरिटी यांचेकडून काही प्रमाणात भूसंपादन करावे लागणार आहे व याबाबत स्थळ पाहणी प्रत्यक्ष केली असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर असल्याबाबत देखील महानगर आयुक्तांनी सांगितले.

६.३ चर्चेच्या अनुषंगाने असे नमूद करण्यात आले की, प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ३.८ किमी. इतकी आहे. सदरच्या कामामध्ये दोन भूमिगत बोगदयांचे काम करण्याचे प्रस्तावित आहे. प्रत्येक बोगदयाचा आतील बाजूस व्यास सुमारे ११ मी. इतका प्रस्तावित आहे. प्रत्येक बोगद्यामध्ये वाहतूकीसाठी २ मार्गिका व १ आपत्कालीन मार्गिका आणि पादचारी मार्ग अशी

रचना दोन्ही बोगदयांमध्ये प्रस्तावित आहे. बोगदयांचे काम टनेल बोरींग मशिनद्वारे करण्याचे नियोजित आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने बोगदयांच्या आतील बाजूस कॉँक्रीटीकरणाद्वारे अस्तरीकरणाचे काम नियोजित आहे.

दोन्ही बोगदे सुरक्षिततेच्या दृष्टीने मानकानुसार एकमेकांशी क्रॉस पॅसेजद्वारे जोडण्याचे नियोजित आहे. जमिनीखाली सुमारे ७ ते २० मी. खोलीवर बोगदयांची मार्गरेषा प्रस्तावित आहे. बोगदयांमध्ये हवा खेळती राहण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या क्षमतेचे यांत्रिकीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. आगप्रतिरोधक यंत्रणा, पुरेशा प्रमाणात प्रकाश व्यवस्था, सुयोग्य व आधुनिक पध्दतीने वाहतूक विनिमयासाठी इन्टीलिजंट ट्रान्सपोर्ट सिस्टम (ITS) इ. प्रयोजन आहे.

पूर्व मुक्तमार्ग ऑरेंज द्वार याठिकाणी सुमारे २०० मी. लांबीचे व्हायाडक्टचे काम प्रस्तावित आहे. पूर्व मुक्तमार्ग बाजूस ओपन कट व पोहोचमार्गाचे सुमारे ६८० मी. लांबीचे काम प्रस्तावित आहे. मरीन ड्राईव्ह बाजूस ओपन कट व पोहोचमार्गाचे सुमारे ७०० मी. लांबीचे काम प्रस्तावित आहे.

६.४ सल्लागाराने सद्यस्थितीत प्रकल्पाची ढोबळमानाने अंदाजपत्रकीय किंमत सुमारे रू.८०५६ कोटी इतकी प्रस्तावित केली आहे. यामध्ये प्रकल्पाचा खर्च, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, प्रस्तावित भूसंपादन व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, दरवाढ किंमतीतील फरक, जी.एस.टी. इत्यादीचा समावेश आहे. सदर भुयारी मार्गाचे बांधकाम करण्याच्या कामाचा कालावधी ४८ महिने इतका प्रस्तावित आहे. काम पूर्ण झाल्यानंतर दोषदायित्व कालावधी २४ महिने इतका नियोजित आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटदाराची नेमणुकीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणुकीसाठी लवकरच निविदा मागविण्याचे प्रस्तावित आहे.

अंदाजित रक्कमेचा सर्वसाधारण तपशिल दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | दर रू. | रक्कम रू. कोटीमध्ये |
|---|---|---|---|
| A | विविध प्रकारचे सर्वेक्षण व कार्यस्थळावरील साफसफाई, झाडे कापणे व प्रत्यारोपण करणे इ. | | ४५.२५ |
| B | कार्यस्थळाचे सेटअप | | ४७.६७ |
| C | भुयारीमार्गाचे खोदकाम | | १७६२.७३ |
| D | खोदकामाची मातीची विल्हेवाट | | २८३.०० |
| E | भुयाराचे कॉँक्रीट सेगमेंटने अस्तरीकरण | | ६०३.५३ |

| अ.क्र. | कामाचे विवरण | दर रू. | रक्कम रू. कोटीमध्ये |
|---|---|---|---|
| F | भुयारातील रस्त्याचे व क्रॉस पॅसेज रस्त्याचे काम | | ७७.९९ |
| G | भुयारातील बॉक्सचे व पोहोच मार्गाचे बांधकाम | | ९४०.५८ |
| H | **एकूण (स्थापत्य कामे)** | | **३७६०.८२** |
| K | विद्यूत, यंत्रिक आग प्रतिरोधक यंत्रणा इ. कामे | | ५७१.०० |
| L | देखभाल व दुरुस्ती (Operation & Maintenance) | | १२४.०० |
| M | **कामाची एकूण किंमत** | H + K+L | **४४५५.८२** |
| N | तात्पुरती तरतुद (PROVISIONAL SUM) | M वर २०% | ८९१.१६ |
| R | पर्यावरण विषयक बाबी | M वर २% | ८९.११ |
| S | **एकुण (N+R)** | | **९८०.२८** |
| T | विमाविषयक खर्च | M वर २% | ८९.१२ |
| V | लेबर सेस | M वर १% | ४४.५६ |
| **W** | **एकूण (T + V)** | | **१३३.६७** |
| **W1** | **कामाची अंदाजित किंमत** | **M+S+W** | **५५६९.७७** |
| W2 | आकस्मिक बाबी(CONTENGENCIES) | M वर १०% | **४४५.५८** |
| X | भुसंपादन आणि पुर्नवसन खर्च (अंदाजित) | | ४३३.०० |
| Y | दरवाढ किंमतीतील फरक | M वर ६% | २६७.३५ |
| Z | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार खर्च | M वर २.५% | १११.४० |
| AA | **एकूण किंमत (W1+W2 +X +Y+Z)** | | १२५७.३३ |
| **AA1** | **एकूण** | | **६८२७.१०** |
| AB | वस्तु सेवाकर | AA१ वर १८% | **१२२८.८८** |
| AC | **प्रकल्पाची एकूण किंमत (AA1+AB)** | | ८०५५.९७ |
| | **एकूण** | | **८०५६** |

६.५ मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम हा प्रकल्प मुंबई शहर भागात पूर्व-पश्चिम किनारपट्टी जोडणारा व वेगवान सुविहित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करुन देणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. हा प्रकल्प तांत्रिकदृष्टया आव्हानात्मक आहे.

**६.३ वरीलप्रमाणे निर्देश विचारात घेऊन प्राधिकरणाने सदर विषयीच्या बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेल्या प्रस्तावास मान्यता दिली आणि पुढील ठराव मंजूर केला:-**

**ठराव क्र.१६४२:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम व अन्य तद्नुषंगीक कामे करण्याकरिता रू.८०५६ कोटी कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.७ : ठाणे ते बोरीवली दरम्यान दोन भुयारी मार्ग आणि बोगद्या जवळचा मार्ग व इतर नागरी बांधकामासाठी प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

७.१ महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाविषयी माहिती देतांना असे सांगितले की, ठाणे ते बोरीवली हे अंतर पार करण्यासाठी ठाणे ते बोरीवली अशा सहापदरी (३+३ मार्गिकेचे २ बोगदे) भुयारी मार्गाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्याच्या प्रस्तावास दिनांक २३ सप्टेंबर २०१५ रोजी झालेल्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या १५० व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्प महामंडळामार्फत हाती घेण्याबाबत मंत्रीमंडळाच्या पायाभुत सुविधा समितीच्या दिनांक ३०.११.२०१५ रोजीच्या बैठकीत चर्चा होवून सदर प्रकल्पासाठी महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले आहे.

तसेच सदर प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अहवाल व सविस्तर अहवाल, पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. सदर प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ञ सल्लागार म्हणून मे. ऐइकॉम ऐशिया कंपनी लिमिटेड यांची दिनांक ११.०४.२०१६ रोजी नेमणूक करण्यात आली आहे.

७.२ चर्चेस अनुसरून दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बैठकीत सदर प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना हस्तांतरीत करण्याबाबत मंजूरी दिली आहे. प्राधिकरणाच्या १४९ व्या बैठकीमध्ये (MMRDA Authority Meeting) दिलेल्या मान्यतेनुसार सदर प्रकल्पाची सद्य:स्थिती, सल्लगार नेमणुक व सल्लागाराच्या कामाचा वाव, सल्लागाराच्या देयका बाबतीची माहिती, निविदा प्रक्रीया इत्यादी पुढील कार्यवाहीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दिनांक १९ ऑगस्ट, २०२० पासून सदर प्रकल्प हस्तांतरीत करण्यात आला असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

७.३ ठाणे घोडबंदर रोड (एसएच-४२) हा मुख्य दुवा रस्ता आहे की, जो एक पूर्व पश्चिम लिंक आहे आणि एनएच -३ आणि एनएच-८ दरम्यान भारी व्यावसायिक रहदारी असते. ठाणे ते बोरीवली या लांबीतील अंतर घोडबंदर मार्गे २३ कि.मी आहे. ठाणे ते बोरीवली लांबीतील अंतर पार करण्यासाठी सद्य:स्थितीत सकाळी व संध्याकाळी वर्दळीच्या वेळी (peak hours) अंदाजे १ ते दीड तास लागतो व इतर वेळी किमान १ तास वेळ लागतो. ठाणे ते पश्चिम उपनगर मुंबई दरम्यानचा प्रवास आणि पूर्वेकडील प्रवेश कमी करण्यासाठी, ठाणे ते बोरिवली दरम्यान संजय गांधी राष्ट्रीय उद्यान अंतर्गत जुळ्या ट्यूब (Twin Tube) बोगद्याचे बांधकाम प्रस्तावित आहे, जेणेकरुन ठाणे ते बोरीवली हा प्रवास १२ कि.मी. ने कमी होईल. बोगद्याचा भाग हा संरक्षित वन क्षेत्रातून जात असल्यामुळे बोगद्याच्या खोदकामासाठी कोणते तंत्रज्ञान वापरणे योग्य होईल याकरीता National Institute of Rock Mechanics यांच्या मार्फत अभिप्राय मागविला असता त्यांनी संरक्षित वनक्षेत्र असल्यामुळे Tunnel Boring Machine च्या सहाय्याने बोगद्याचे खोदकाम करण्याचे कळविले असल्याचे महानगर आयुक्तांनी नमुद सांगितले.

..१७/-

७.४ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) सादर केलेल्या आराखडा मसुद्याच्या तपशीलवार प्रकल्प अहवालाची छाननी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे केली. प्राधिकरणाने केलेल्या अभ्यासाप्रमाणे ठाणे बोरिवली २+२ लेन कॅरेज-वे सह बोगद्याचा V/C (Volume / Capacity) गुणोत्तर ०.६३ आहे आणि LOS (Level of Service) C आहे. ट्विन ट्यूबचे बांधकाम, ठाणे ते बोरिवली दरम्यान २+२ लेन कॅरेज-वे सह सन २०२७ ते २०३१ पर्यंत प्रथम दर्शनी सुयोग्य होते.

७.५ चर्चेस अनुसरून असे नमूद करण्यात आले की, प्रस्तावित २ बोगद्याची एकूण लांबी - ११.८५ कि.मी. (बोगद्याची एकूण लांबी १०.२५ कि.मी. व जोडरस्त्याची लांबी १.५५ कि.मी. आहे.)

- बोगद्याचा बाह्य व्यास : १३.०५ मी. (२ **मार्गिकेचा असे २ बोगदे.**)
- लेन कॉन्फ्रीगयुशन : २ मार्गिका + १ आपत्कालीन मार्गिका
- प्रत्येक ३०० मीटर अंतरावर पादचारी क्रॉस पॅसेज आणि प्रत्येक २ पादचारी क्रॉस पॅसेजनंतर वाहन क्रॉस पॅसेजची तरतुद आहे. एकुण क्रॉस पॅसेजची संख्या ४५ प्रस्तावित आहे.
- अग्निशमन यंत्र, पाण्याची नाळी, धुरांचे डिटेक्टर, प्रकाशित प्रतिबिंब (LED Light sign boards) योग्य ठिकाणी स्थापित केले जातील.
- NFPA५०२ च्या तरतुदीनुसार बोगद्याला हवेशीर करण्यासाठी नैसर्गिक किंवा यांत्रिक मार्गांनी पुरेशी वायुवीजन प्रणाली प्रस्तावित आहे
- या प्रस्तावित नवीन कनेक्टिव्हिटीमधील वाहतुकीचे अंदाजे प्रमाण ५०,००० पी.सी.यू **आहे.**
- प्रस्तावित बांधकाम हे चार टीबीएमच्या सहाय्याने चार वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
- याप्रमाणे भूसंपादनकरीता क्षेत्र हे एकूण ४९.४८ हेक्टर इतके आहे. यापैकी अंदाजे ३७.६३ हेक्टर सरकार वन क्षेत्र व ११.९१ हेक्टर खाजगी जमीन इतके आहे.

या मार्गीकेच्या ११.८ कि.मी. लांबीपैकी ४.४३ कि.मी. लांबी ही ठाणे जिल्ह्यातुन व ७.४ कि.मी लांबी ही बोरीवली जिल्ह्यातुन प्रस्तावित आहे. एकुण ६ गावांपैकी ३ (चितळसर मानपाडा- ठाणे, माजीवाडा - ठाणे व मागाठाणे - बोरीवली) गावांमध्ये संयुक्त मोजणी ही

थेट खरेदी पध्दतीने करण्याचे प्रस्तावित आहे व उर्वरित ०३ गावे म्हणजेच (बोरीवाडे, चेणे आणि येउर-ठाणे) शासकीय वनक्षेत्रातून जात आहेत.

७.६ प्रकल्पाचा अंदाजित बांधकाम खर्च रॉयल्टी वगळून ₹. १६६००.४० कोटी (भुसंपादनासह) इतका आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (EPC) या तत्त्वावर आर्थिकदृष्टया सुसाध्य आहे. प्रकल्पाचे बांधकाम एकुण ३ पॅकेजसमध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यापैकी स्थापत्य कामाचे २ पॅकेजेस (Civil works) व तिसरा भाग सुनियोजित वाहतुक प्रणाली (Intelligent Transport) या कामाचे पॅकेज आहे. पॅकेज १: ०+०० ते **Ch** ५+७५० बोरीवली बाजू- (अंदाजित किंमत –रू.७२७३ कोटी) पॅकेज **२: Ch** ५+७५० ते ११ + ८४ ठाणे बाजू (अंदाजित किंमत - रू.७४६१ कोटी) आणि पॅकेज ३: सिस्टमची खरेदी, स्थापना आणि कार्यान्वित इ. (अंदाजित किंमत - रू.५३० कोटी) .

सल्लागाराने विविध आर्थिक मॉडेलचा अभ्यास केला आहे. जसे की, बीओटी (BOT), एचएएम (HAM) आणि ईपीसी (EPC) इ. वरील अभ्यासाप्रमाणे खर्चाच्या दृष्टीने निव्वळ वर्तमान मुल्य हे प्रकल्पासाठी ईपीसी (EPC) मॉडेलमध्ये सर्वात कमी आहे. ईपीसी निधी अंतर्गत उक्त प्रकल्पाच्या एकुण बांधकाम खर्चाच्या जवळपास २०% बचत अपेक्षित आहे. वरील संपुर्ण विश्लेषणावरुन व डीपीआर सल्लागाराने शिफारस केल्याप्रमाणे असे दिसून आले आहे की, प्रकल्पाची अंमलबजावणी अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (EPC) या तत्त्वावर आर्थिकदृष्टया सुसाध्य आहे. प्रकल्पाचा खर्च ओपन रोड टोलिंग प्रणालीद्वारे वसुल केला जाईल.

७.७ मे. ऐइकॉम ऐशिया कंपनी लिमिटेड. या सल्लागाराने सादर केलेल्या प्राथमिक सुसाध्यता अहवालानुसार सदर प्रकल्पाची एकूण किमंत रू.१६६००.४० कोटी इतकी असून तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | तपशिल | अंदाजित किंमत (रू.. कोटी) |
|---|---|---|
| १. | बांधकामाची किंमत (सन २०१८) आणि भाववाढ (Tunnel Boring Machine (TBM) पद्धतीने) including १८% GST | १५,२६४.०० |
| २. | भूसंपादन | ७००.०० |
| ३. | प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या आकस्मिक बाबींवरील खर्च | ३७५.४ |
| ४. | अन्य<br>सल्लागार सेवा, प्रशासकीय खर्च, आयातीवरील कर, पर्यावरणविषय ,अग्रीम फी | २६१.०० |
| | **एकूण अंदाजित किंमत** | **१६६००.४०** |

७.८ सल्लागाराने मसुदा डीपीआर सादर केला आहे, मसुद्यानुसार डीपीआर प्रकल्प तीन पॅकेजेसमध्ये (दोन सिव्हिल पॅकेजेस आणि एक सिस्टम पॅकेज) डिझाइन आणि बिल्ड आधारावर लागू केला जाईल. सिस्टीम पॅकेज सिव्हिल पॅकेज मिळाल्यानंतर एक वर्षाने घेतले जाईल. दोन सिव्हिल पॅकेजेसाठी निविदा दिनांक ०८/०२/२०२३ रोजी मागविण्यात आल्या असून सादर करण्याची अंतिम तारीख ३/४/२०२३ आहे.

- केंद्रीय पर्यावरण व वन विभागाच्या दि. ०१ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिसुचनेनुसार पर्यावरण ना-हरकत प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव पर्यावरण व वन विभागाकडे सादर केला होता. दिनांक १५.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी सदर प्रकल्पासाठी पर्यावरण ना हरकत दाखल्याची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे.
- नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफची (NBWL) परवानगी नियमावलीनुसार तसेच वन विभागाच्या परवानगी नियमावलीनुसार ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सुधारीत प्रस्ताव मंजुरीकरीता दिनांक ०५.०९.२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाच्या बांधकामात बाधित होणाऱ्या वन जमिनीच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी नियमानुसार आवश्यक असलेली उमरावती, फुलंब्री जि. औरंगाबाद येथील सुमारे ६० हेक्टर क्षेत्राची (गट नं. ५९५) गायरान जमीन माहे मे, २०१९ मध्ये उप वनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.
- सदर प्रकल्पासाठी खाजगी जागेचा भुसंपादनाचा प्रस्ताव प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आला असून, भुसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे. गाव- मानपाडा, जि. ठाणे याची संयुक्त मोजणी दि. १४.१०.२०२२ रोजी पूर्ण करण्यात आल्याचे नमूद केले.

या संदर्भात महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाचे तपशिलवार सादरीकरण केले.

**७.९ चर्चेनंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६४३:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उप कलम (१) चे (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त

झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, "ठाणे ते बोरीवली दरम्यान दोन भुयारी मार्ग आणि बोगद्या जवळचा मार्ग व इतर नागरी बांधकामासाठी" प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रू. १६६००.४० कोटी इतकी आहे (यामध्ये बांधकाम खर्च रू.१५२६४ कोटी including १८% GST, भूसंपादन किंमत रू.७००.०० कोटी , तसेच पर्यावरणविषयक, सल्लागार शुल्क व आकस्मिक बाबींवरील खर्च इ. करीता रू. ६३६ कोटी). सदर प्रकल्पाच्या रू. १६६००.४० कोटी इतक्या किंमतीस प्राधिकरण प्रशासकीय मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्पाची अंमलबजावणी अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (EPC) या तत्त्वावर मान्यता देत असून प्रकल्पाचे बांधकाम एकूण ३ पॅकेजेसमध्ये करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यापैकी २ स्थापत्य कामाचे पॅकेजेस (Civil works) व तिसरा भाग सुनियोजित वाहतुक प्रणाली (Intelligent Transport) या कामाचे पॅकेज आहे. **पॅकेज १:** ०+०० ते **Ch** ५+७५० बोरीवली - (अंदाजित किंमत - रू.७२७३ कोटी) **पॅकेज २: Ch** ५+७५० ते ११ + ८४ ठाणे (अंदाजित किंमत - रू.७४६१ कोटी) आणि **पॅकेज ३:** सिस्टमची खरेदी, स्थापना आणि कार्यान्वित इ. (अंदाजित किंमत - रू.५३० कोटी) आहे. तसेच प्रकल्पाकरीता साधारण सल्लागार (General Consultant) अंदाजित किंमत रू.२५४.४ कोटी) यांच्या नेमणुकीकरीता निविदा मागविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ :** **<u>अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.१२४ बगीचा ने बाधित होत असलेल्या सुर्योदय को.ऑप.हौसिंग सोसायटी, अंबरनाथ मधील भूखंड क्र.६०४ मधील वनक्षेत्रात नसलेले ३८०.२५ चौ. मी. इतके क्षेत्र रहिवास परिमंडळात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये करावयाच्या जमीन वापर फेरबदलाच्या कार्यवाहीबाबत.</u>**

८.१ महानगर आयुक्त यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नियुक्त असलेल्या अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या विकास योजनेस शासनाने सन २००५ (भाग) व २००८ (भाग) या वर्षी

उक्त अधिनियमाची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर मंजूरी प्रदान केली असल्याचे सांगितले.

८.२ अर्जदार श्री. शैलम शांताराम जाधव यांनी दि १०.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सूर्योदय को. ऑप. हौसिंग सोसायटी, अंबरनाथमधील भूखंड क्र. ६०४ खालील क्षेत्र अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेत नजरचुकीने गार्डन या आरक्षण क्र. १२४ मध्ये समाविष्ट केलेले असून, सदर बाधित क्षेत्र रहिवास परिमंडळात समाविष्ट करण्याची प्राधिकरणास विनंती केली असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले. तसेच अर्जदार यांनी सदर पत्रात खालीलप्रमाणे नमूद केले असल्याचेही स्पष्ट केले :

i. सदर सोसायटीमधील डीडीस्कीम १५ पैकी १अ, १अ, १अ, १अ नवा सर्व्हे नं २०६/१०३४ या भूखंडापैकी भूखंड क्र. ६०४ (प्रत्यक्ष जागेवरील क्षेत्र: ३८०.२५ चौमी) जिल्हाधिकारी ठाणे यांनी २०२० वर्षी अर्जदारांच्या नावावर केलेली आहे.

ii. तसेच भूखंड क्र. ६०४ या भूखंडास नगर भूमापन क्रमांक देण्याकरीता अंबरनाथ नगर परिषद यांनी भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे कार्यालयात प्रस्ताव सादर केलेला आहे.

iii. भूखंड क्र. १ ते ६३० या भूखंडास रहिवासी वापराकरिता जिल्हाधिकारी, ठाणे यांनी संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून १९४९ साली मान्यता प्राप्त करून घेतलेली आहे.

iv. अंबरनाथ शहराच्या मूळ विकास योजनेत (१९७५-७६) सदर भूखंड रहिवास परिमंडळात समाविष्ट असल्याने भूखंड क्र. ६०४ गार्डन या आरक्षण क्र. १२४ मध्ये समाविष्ट करणे योग्य नाही. शासनाने विकास योजना मंजूर करतांना भूखंड क्र ६०५ आऱक्षण क्र. १२४ गार्डन मधून वगळून रहिवास परिमंडळात समाविष्ट केलेला आहे. त्याच धर्तीवर भूखंड क्र. ६०४ रहिवास परिमंडळात समाविष्ट करणे गरजेचे होते ते नजरचुकीने सदर आरक्षणात समाविष्ट करण्यात आलेले आहे. सदर भूखंड वगळून अंबरनाथ नगरपरिषदेने आरक्षण क्र. १२४ विकसित केलेले आहे. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सदर भूखंड (६०४) त्यांना रहिवासी वापराकरिता दिलेला असल्याचेही महानगर आयुक्त यांनी विषद केले.

८.३ त्याअनुषंगाने प्राधिकरणाने दि. १४.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषदेकडून संयुक्तिक अहवाल प्राधिकरणास सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार प्रशासक, अंबरनाथ नगरपरिषद यांनी दि.०४.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये आपला अहवाल प्राधिकरणास सादर केला असून सदर अहवालान्वये श्री. शैलम शांताराम जाधव यांनी त्यांच्या विनंतीसोबत सादर केलेला मोजणी नकाशा व मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दि. ११.०६.२०२० चे जागा हस्तांतरणा बाबतचे पत्र, ही कागदपत्रे पुन्हा प्रमाणित करून सादर केली आहेत. सदर अहवालामध्ये खालीलप्रमाणे बाबी नमूद केले असल्याचे महानगर आयुक्त यांनी विषद केले ;

i. सदर जागेवरील अभिन्यास हा १९४९ साली मा. जिल्हाधिकारी यांचेतर्फे मंजूर झाला असून विकास योजना तयार करतांना सदर संपूर्ण अभिन्यास रहिवास परिमंडळात अंतर्भूत करणे आवश्यक होते. तथापि उक्त प्रकरणी रस्त्यालगतच्या भूखंडांची पूर्ण ओळ आरक्षणात समाविष्ट केलेली आहे.

ii. मा. जिल्हाधिकारी यांचेतर्फे मंजूर रेखांकनाप्रमाणे काही भूखंडावर आरक्षण प्रस्तावित केले आहे. तथापि वर्ष २००५ ला विकास योजना मंजूर करतांना या भूखंडाच्या ओळीतील एकच भूखंड क्र.६०५ हा आरक्षणातून वगळला गेला. प्रारूप विकास योजनेत आरक्षणात समाविष्ट झालेले अभिन्यासातील सर्व नियमित भूखंड हे आरक्षणातून वगळणे क्रम प्राप्त होते.

iii. भूखंड क्र.६०४ खालील क्षेत्र रहिवास वापरात समाविष्ट करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करून सदर भूखंड रहिवास वापरात समाविष्ट करण्याबाबत शासन स्तरावर आदेश झाल्यानंतर रहिवास वापरासाठी इमारतीच्या नकाशांना मंजुरी प्रदान करण्यात येईल.

८.४ अंबरनाथ नगरपरिषदेने दि. ०४.०३.२०२२ रोजी विषयांकित प्रकरणी त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला असून, त्यांनी सदर विषयी फेरबदलाच्या कार्यवाहीकरिता प्राधिकरणास शासन स्तरावरून निर्देशित करण्यास विनंती केली.

८.५ प्राधिकरणाच्या अभिलेख्यानुसार वस्तुस्थिती बाबत महानगर आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे विषद केले :

i. अंबरनाथ-कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राची विकास योजना तयार करतांना सुर्योदय को.ऑप. हौसिंग सोसायटीतील भूखंड क्र.६०४ बाबत कोणतीही सूचना / हरकत प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

ii. भूखंड क्र.६०५ बाबत काही सूचना/हरकती प्राप्त झाल्याचे दिसून येते. प्रशासक, अंबरनाथ नगरपरिषद यांनी त्यांच्या पत्रांमध्ये नमूद केल्याप्रमाणे १९४९ साली जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून सदर जागेवरील अभिन्यास मंजूर झालेला असल्याचे नमूद केले असले तरी (तसेच सदर अभिन्यासातील भूखंड क्र.६०४ व ६०५ व लागून इतर या भूखंडांचा काही भाग वन क्षेत्रातही मंजूर झालेला दिसून येतो) भूखंड क्र. ६०५ व्यतिरिक्त, भूखंड क्र.६०४ किंवा सदर सोसायटी मधून इतर कुणाचीही कोणतीही सूचना/हरकत प्राप्त न झाल्याने नियोजन समितीने इतर भूखंड व भूखंड क्र.६०४ बगीचा (Garden) या आरक्षणामधून वगळलेला नसून प्रारूप विकास योजनेमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणेच सदर भू-वापर मंजूर झालेला असल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने नियोजन समिती आणि नगर विकास विभाग यांनी दि.२५.०७.२००५ रोजीच्या SM अधिसुचने अन्वये भूखंड क्र.६०५, सिटी सर्वे क्र.७५६४/२ आरक्षण क्र.१२४ (मनोरंजना साठीची खुली जागा) मधून वगळून रहिवास परिमंडळात समाविष्ट करून उर्वरीत भूखंड उद्यान (Garden) या आरक्षणात समाविष्ट केलेला असल्याचे दिसून येते.

iii. म्हणून, श्री. शैलम शांताराम जाधव यांच्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे भूखंड क्र.६०४ एकूण क्षेत्र ३८०.२५ चौ.मी. नजर चुकीने आरक्षण क्र.१२४ गार्डन मध्ये दर्शविलेले आहे. असे अर्जदाराचे म्हणणे वस्तुस्थितीस अनुसरून नाही. विकास योजना प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींची दखल घेऊन उक्त अधिनियमाची प्रक्रिया पूर्ण करून सन २००५ (भाग) व २००८ (भाग) मध्ये मंजूर झालेली आहे.

८.६ चर्चेस अनुसरून याबाबत प्राधिकरणाने नगर विकास विभागास दि. २३.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविलेली असून शासन स्तरावर योग्य निर्णय घ्यावा, असे कळविले होते. त्यावर शासनाने दि. ०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये "सदरचा भूखंड क्र ६०४ हा आरक्षण क्र १२४ मधून वगळणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव आपले कार्यालयाकडून

शासनास प्राप्त झाल्यास शासन त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेईल", असे प्राधिकरणास कळविले आहे. विषयांकित प्रकरणी शासनास त्यांचा निर्णय घेण्याकरिता प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वयेची फेरबदलाची कार्यवाही करून प्राधिकरणाचा अहवाल अपेक्षिलेला आहे.

८.७ या बाब टिप्पणीतील वरील वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबतचा प्राधिकरणाचा निर्णय झाल्यास अधिनियमातील तरतूदीनुसार फेरबदलाची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**८.८ चर्चेनंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६४४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उप कलम १ चे पोट कलम (क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १२४ बगीचा ने बाधित होत असलेल्या सुर्योदय को. ऑप. हौसिंग सोसायटी, अंबरनाथ मधील भुखंड क्र. ६०४ मधील वन क्षेत्रात नसलेले ३८०.२५ चौ. मी. इतके क्षेत्र आरक्षण क्र १२४ बगीचा मधून वगळून रहिवास परिमंडळात समाविष्ट करण्याकरिताच्या फेरबदलास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये जमीन वापर फेरबदल करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, प्राधिकरण याद्वारे वरीलप्रमाणे विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ मधील सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यासाठी जसे जनतेकडून सुचना/हरकती मागविणेसाठी नोटीस प्रसिध्द करणे, शासनास याबाबत अहवाल सादर करणे यासाठी व अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.९ :** **<u>ठाणे जिल्ह्यातील प्राधिकरणाच्या अखत्यारीतील विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता प्रस्ताव स्विकारण्याच्या मुदतीत वाढ करण्यासाठी कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.</u>**

९.१ महानगर आयुक्त यांनी उपरोक्त प्रस्तावाबाबत असे सांगितले की, शासनाच्या दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रानुसार प्राधिकरणाने १५२ व्या बैठकीत पारित केलेल्या ठराव क्र.१६०२ नुसार ठाणे जिल्ह्यातील प्राधिकरणाच्या भिवंडी परिसर अधिसुचित क्षेत्र (BSNA), अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र (AKBSNA) व कल्याण ग्रोथ सेंटर (KGC) या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमीत करणेकरीता दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत प्रस्ताव स्वीकारणे व जाहिरात प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत प्रोत्साहनात्मक सवलतीबाबत दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. तसेच तद्नंतर, उक्त ठरावानुसार सदर धोरणाच्या अंमलबजावणीकरिता वापरावयाचे 'Standard Operating Procedure (SOP)' देखील जारी केले आहे.

९.२ सदर परिपत्रकानुसार प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी व या कालावधीत प्राप्त प्रस्तावांवर SOP नुसार कार्यवाही करणेची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी समाप्त होणार आहे. तथापि सदर प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही करताना असे निदर्शनास आले आहे की, प्रस्ताव सादर करताना आवश्यक भूमि अभिलेख विभागाचे मोजणी नकाशे, अग्निशमन विभागाचे ना- हरकत दाखले इत्यादी कागदपत्रे/ ना-हरकत दाखले/ परवानग्या मिळविण्याकरिता विलंब होत असल्याने विहित कालावधीत अर्जदारांना प्रस्ताव सादर करणे शक्य होत नाही. याबाबींचा विचार करता तसेच प्राधिकरणाच्या बैठकीची तारीख निश्चित झालेली नसल्याने प्राधिकरणाच्या अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या धोरणाची यशस्वी अंमलबजावणी होणे करिता सदर परिपत्रकातील प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत दिनांक ३० जून, २०२३ पर्यंत वाढविण्यासाठी व प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही करणेची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत करण्यासाठी, तसेच नियमिती करणासाठी संबंधितांनी जास्तीत जास्त प्रस्ताव सादर करावेत यासाठी या वाढीव कालावधीत प्राप्त सर्व प्रस्तावांस दंडात्मक शुल्कावर ५% सवलत अनुज्ञेय करणेकरिता त्यानुसार परिपत्रक प्रसिद्ध करणेसाठी व याबाबत प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत कार्योत्तर मान्यता घेण्याकरिता मा. मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांची दिनांक ०६ डिसेंबर, २०२२ रोजी मान्यता घेतली आहे. त्यानुसार

दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी याबाबत परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. नियमितीकरणाच्या प्रस्तावांवर कार्यवाही करताना पार्किंग, समोरील सामासिक अंतर, रस्त्याची रुंदी, सुविधा क्षेत्र, पर्यावरण विभागाची परवानगी, सी.आर.झेड., मालकी हक्क, भूखंड सीमांकन, इत्यादीं संदर्भात येणाऱ्या अडचणी व सदर अनधिकृत बांधकामे आधीपासून अस्तित्वात असल्याने तसेच प्राधिकरणाच्या सदर धोरणाचा मर्यादित कालावधी लक्षात घेता प्राधिकरणाने काही प्रकरणांमध्ये अर्जदाराकडून हमीपत्र/शपथ पत्र घेऊन त्याअनुषंगाने आवश्यक अटी व शर्ती सहीत नियमतीकरणाची परवानगी प्रदान केली आहे. ही बाब प्राधिकरणाने दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या अवलोकनासाठी व पुढील योग्य त्या आदेशाकरीता सादर केली आहे.

९.३ वरील अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रस्ताव प्राधिकरणाच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर करण्यात आला :

अ) प्राधिकरणाच्या १५२व्या बैठकीत पारित केलेल्या ठराव क्र. १६०२ नुसार अनधिकृत बांधकामे नियमीत करणेकरीता प्रसिद्ध केलेल्या दिनांक ११ मार्च, २०२२ रोजीच्या परिपत्रकामध्ये प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत व प्रोत्साहनात्मक सवलत याव्यतिरिक्त कोणताही बदल प्रस्तावित नाही. अनधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत दिनांक ३० जून, २०२३ पर्यंत वाढविण्यासाठी व प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही करणेची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत करण्यासाठी, तसेच या वाढीव कालावधीत प्राप्त सर्व प्रस्तावांस दंडात्मक शुल्कावर ५% सवलत अनुज्ञेय करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी दिलेल्या मान्यतेनुसार प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता द्यावी;

आ)वरील अनुषंगाने आवश्यकतेनुसार वेळोवेळी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासही महानगरआयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी, हि विनंती.

९.४ प्राधिकरणाने वरील परिच्छेद ९.३ प्रमाणे सदर विषयीच्या बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता दिली आणि पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१६४५ :-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उप कलम १ चे पोट कलम (क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे अनधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दिनांक ३० जून, २०२३ पर्यंत वाढविण्यासाठी व प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही करणेची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत करण्यासाठी, तसेच या वाढीव कालावधीत प्राप्त सर्व प्रस्तावांस दंडात्मक शुल्कावर ५% सवलत अनुज्ञेय करण्यासाठी मा. मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिलेल्या मान्यतेनुसार कार्योत्तर मान्यता देत आहे. तसेच, प्राधिकरणाच्या १५२ व्या बैठकीत पारित केलेल्या ठराव क्र. १६०२ नुसार अनधिकृत बांधकामे नियमीत करणे करीता प्रसिद्ध केलेल्या दिनांक ११ मार्च, २०२२ रोजीच्या परिपत्रकामध्ये प्रस्ताव स्विकारण्याची मुदत व प्रोत्साहनात्मक सवलत याव्यतिरिक्त कोणताही बदल प्रस्तावित नाही.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, मा. मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिलेल्या मान्यतेनुसार महानगर आयुक्त यांनी दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकास याद्वारे मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, वरील अनुषंगाने आवश्यकतेनुसार वेळोवेळी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासही महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास याद्वारे मान्यता देत आहे."

**बाब क्र.१० : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) ठाणे-बेलापूर रस्त्यावरून ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर जाण्यासाठी उन्नत मार्गिकेचे संकल्पन व बांधकाम (Design Build) तत्वावर ठोक रक्कम पध्दतीवर बांधकाम करणेच्या कामास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

१०.१ महानगर आयुक्त यांनी उपरोक्त प्रस्तावाबाबत असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत रस्त्यांचे बांधकाम व रुंदीकरण तसेच पुलांची कामे हाती घेण्याचे ठरले. त्यानुसार दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीत प्रस्तावित १७ कामांकरीता रु. ३६२८.५१ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय

मान्यता देण्यात आली होती. सदर कामामध्ये ऐरोली कटाई नाका महामार्ग प्रकल्पाचा अंतर्भाव असून त्यास भूसंपादनाच्या किंमती व्यतिरिक्त रु. ९४४.२० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेशाच्या भविष्यातील प्रवास गरजा लक्षात घेऊन क्षितीज वर्ष २०३१ पर्यंत व्यापक परिवहन जाळे निर्माण करण्याच्या दृष्टीने सर्वंकष परिवहन अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये ऐरोली कटाई नाका रस्त्याचा अंतर्भाव आहे. प्रस्तावित केलेल्या महामार्गांच्या जाळयांपैकी नाहूर ते बदलापूर या एकूण ३३.३८ कि.मी. लांबीच्या महामार्गाचा सूचीत समावेश असून त्यामध्ये ऐरोली पूल ते कटाई नाका या अस्तित्वात नसलेल्या सुमारे १२.३ कि.मी. लांबीच्या मार्गाचा अंतर्भाव आहे. सदर प्रस्तावित रस्त्यामुळे ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर इ. शहरे मुंबई शहराशी सरळ जोडली जातील. तसेच, सदर प्रस्तावित रस्ता हा विरार ते अलिबाग- बहुउद्देशिय वाहतुक मार्गिकेला जोडला जाऊन, रहदारीचे परिणामकारक विभाजन होण्यास मदत होईल. सदर कामास दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीत मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच सदर ऐरोली कटाई नाका भाग-१ व २ या प्रकल्पासाठी वाढीव खर्चाच्या कामास रु. १४४१.३९ कोटी इतक्या रक्कमेस दिनांक २०/१०/२०२२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १५३ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर रस्त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्प खालीलप्रमाणे ३ भागांत विभागण्यात आलेला आहे:-

१) भाग १ :- ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४- लांबी सुमारे ३.४३ कि.मी.

२) भाग २ :- ऐरोली पूल ते ठाणे बेलापूर रस्ता- लांबी सुमारे २.५७ कि.मी.

१) भाग ३ :- राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते कटाई नाका जंक्शन- लांबी सुमारे ६.३० कि.मी.

१०.२ चर्चेस अनुसरून प्रकल्पाचा भाग-१: ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ दरम्यानचा उन्नत रस्ता हा संकल्पन व बांधकाम ठोक रक्कम पद्धतीने करण्यासाठी मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा रु. १४४,४७,००,०००/- (रुपये एकशे चव्वेचाळीस कोटी सत्तेचाळीस लाख फक्त) इतक्या रक्कमेच्या लघुत्तम देकारास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या २५४ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. सद्य:स्थितीत भाग- १ चे ८८% काम पूर्ण करण्यात आलेले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच पारसिक डोंगरातून जाणा-या बोगद्याचे व रस्त्याचे काम हे

..२९/-

टक्केवारी पद्धतीने करण्यासाठी मे. आय. व्ही. आर.सी. एल. लि. व मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (जेव्ही) यांचा रु. २३७,५५,५१,७८७.२७ (अक्षरी दोनशे सदतीस कोटी पंच्यावन्न लाख एकावन्न हजार सातशे सत्याऐंशी आणि सत्तावीस पैसे) इतक्या रक्कमेच्या लघुत्तम देकारास, प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ मार्च, २०१८ रोजी झालेल्या २५७ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. सद्य:स्थितीत सदर काम ६६% पूर्ण करण्यात आलेले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

१०.३ प्रकल्पाचा भाग-२: ऐरोली पूल ते ठाणे बेलापूर रस्ता या दरम्यानच्या उन्नत रस्त्याचे बांधकाम संकल्पन व बांधकाम ठोक रक्कम पद्धतीने करण्यासाठी मे. जे.कुमार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा रु. २७५,९०,००,०००/- (रुपये दोनशे पंच्याहत्तर कोटी नव्वद लाख फक्त) इतक्या रक्कमेच्या लघुत्तम देकारास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दि ०५ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या २५९व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. सद्य:स्थितीत सदर काम ६२.५०% पूर्ण करण्यात आलेले असून उर्वरित काम प्रगतीप्रथावर आहे.

१०.४ सदर प्रकल्पावर ठाणे बेलापूर रस्त्यावरुन ऐरोलीकडे ये-जा करणेकरीता मार्गिकेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीकडून प्राधिकरणामध्ये सातत्याने मागणी करण्यात आली होती. सदरबाबत नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे सुसाध्य अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकरीता मे. आकार अभिनव कन्सलटंट प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यात आली होती.

१०.५ सदर प्रकल्पाला सल्लागारातर्फे सविस्तर अभ्यास करुन प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर अहवालानुसार ऐरोली, घणसोली, इ. क्षेत्रातील लोकांना मुंबईला जाणे तसेच मुंबईकडून ठाणेस जाण्याकरीता ठाणे बेलापूर रस्त्यावरुन चढउतार करणेकरीता स्वतंत्र मार्गिका असणे गरजेचे आहे असे नमुद केलेले आहे. याबाबतचा प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर करण्यात आला होता. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने याबाबत असे ठरविले की प्रथमत: ठाणे-बेलापूर रस्त्यावरुन ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर चढणेकरीता मार्गिका बांधणे संयुक्तीक होईल. या मार्गिकेच्या बांधकामामुळे नवी मुंबईच्या दक्षिणेकडून ऐरोली पुलावरून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक सुरळीतपणे होईल. सदर मार्गिका वाहतुकीस खुली केल्यानंतर ठाणे-बेलापूर रस्त्यावरील वाहतुकीचा सखोल अभ्यास केल्यानंतर ऐरोली कटाई नाका प्रकल्पावरुन ठाणे-बेलापूर रस्त्यावर उतरणेकरीता मार्गिका बांधणेबाबत निर्णय घेण्यात येईल.

१०.६ ठाणे-बेलापूर रस्त्यावरुन ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर जाण्याकरीता मार्गिका बांधणे या कामासाठी प्रत्यक्ष कामाचा खर्च, इतर आवश्यक बाबी व सर्व करांचा अंतर्भाव करून रु. ५३,४७,५१,०८७/- (रुपये त्रेपन्न कोटी सत्तेचाळीस लाख एकावन्न हजार सत्याऐंशी फक्त) इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक प्रकल्प सल्लागाराकडून प्राप्त झालेले आहे.

**१०.७ त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१६४६ :-</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम, (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या सर्व अधिकारांचा वापर करुन विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) ठाणे बेलापूर रस्त्यावरून ऐरोली कटाई नाका उन्नत मार्गावर जाण्यासाठी उन्नत मार्गिकेचे संकल्पन व बांधकाम (Design Build) तत्वावर ठोक रक्कम पद्धतीवर बांधकाम करणेच्या कामास प्रत्यक्ष कामाचा खर्च, इतर आवश्यक बाबी व सर्व करांसहित एकूण रक्कम रु. ५३,४७,५१,०८७/- (रुपये त्रेपन्न कोटी सत्तेचाळीस लाख एकावन्न हजार सत्याऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस कार्योत्तर प्रशासकीय मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र.११ :</u>** **<u>विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ व उल्हास खाडीवर दुर्गाडी किल्ल्याजवळील सहा पदरी पुलाच्या उर्वरित बांधकाम — सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.</u>**

११.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्यात येत आहे. कार्यकारी समितीने दिनांक २२/०२/२०१४ रोजी झालेल्या २४१ व्या बैठकीमधील ठराव क्र. १२५० अन्वये शिफारस केल्यानुसार प्राधिकरणाच्या

दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीमधील ठराव क्र. १३०४ अन्वये सदर प्रकल्पांतर्गत रस्त्यांच्या व उड्डाणपुलांच्या कामासाठी एकूण रु.३६२८.५१ कोटी इतक्या अंदाजित किमंतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदर कामांमध्ये कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे सहापदरी पूल बांधणे या कामांचा समावेश असून त्यासाठी रु.८५ कोटी इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

११.२ कार्यकारी समितीच्या दिनांक १४/०१/२०१६ रोजी झालेल्या २४७ व्या बैठकीमधील ठराव क्र. १२९६ अन्वये मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी सादर केलेल्या विषयांकित कामाच्या रु. ७५.७२ कोटी किंमतीच्या न्युनत्तम निविदेस मंजूरी प्रदान करण्यात आली होती. त्याअनुषंगाने कंत्राटदारास सदर काम २४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यासाठी दिनांक ११/०३/२०१६ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आला. संबंधित कंत्राटदार, कामाच्या कालावधी दरम्यान सदर पुलाच्या बांधकामावर लागणा-या प्रगतीच्या आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री व मनुष्यबळ, उपलब्ध करु शकला नाही. दरम्यान, सदर काम सुरु केल्यानंतर, भारतीय जलमार्ग (National Waterway- ५३) जाहीर करण्यात आल्यामुळे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दि. ०९/०५/२०१७ रोजीच्या सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्राद्वारे नौकावहन गाळयांची लांबी वाढवून पूलाच्या संरचनेमध्ये बदल केला. या अनुषंगाने कंत्राटदाराने सुमारे रु. २४ कोटी रुपयांचा आर्थिक दावा केला. सदर दावा कंत्राटीय तरतूदीनुसार नामंजूर करण्यात आला. तथापि, सदर संरचनीय बदलामुळे काम पूर्ण करण्यासाठी कालावधी वाढवून देण्यात आला. तथापि, सदर काम अपेक्षित प्रगतीने व मंजूर मुदत वाढीमध्ये पूर्ण होण्यासाठी प्राधिकरणामार्फत वेळोवेळी आढावा घेऊन कंत्राटदारास कामावरील असमाधानकारक प्रगतीबद्दल पत्रव्यवहार करण्यात आला. सदर कंत्राटदाराची कामाबाबतची सुमार कामगिरी, त्याची आर्थिक डबघाईची स्थिती, आयकर विभागाकडून सदर कंत्राटदाराच्या नावे असलेला थकीत कर भरणासाठी प्राधिकरणाला प्राप्त झालेले समन्स, बँकांचे थकीत कर्ज वसूल करण्यासाठी Debt Recovery Tribunal (DRT) यांचे आदेश, प्राधिकरणाच्या इतर प्रकल्पावर तसेच इतर शासकीय विभागांमधील प्रकल्पांवर असमाधानकारक प्रगती इ. बाबींचा विचार करुन सदर काम माहे मे,२०१९ पर्यंतच्या मंजूर वाढीव कालावधीच्या मुदतीमध्ये पूर्ण होण्याच्या दृष्टीने सदर कंत्राटदार तत्कालीन स्थितीत सक्षम नसल्याचे दिसून आले. प्राधिकरणामार्फत दिनांक ०१/१०/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे सदर

कामासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध करण्याची विनंती व तसे न झाल्यास कंत्राटीय तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची नोटीस कंत्राटदारास निर्गमित करण्यात आली. तद्नंतर, प्राधिकरणाच्या दिनांक २५/१०/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे कंत्राट संपुष्टात आणण्यात आल्याचे कंत्राटदार मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांना कळविण्यात आले. याबाबतचा सद्य:स्थिती अहवाल दिनांक ०५/०१/२०१९ रोजी पार पडलेल्या कार्यकारी समितीच्या २६० व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला.

११.३ चर्चेस अनुसरून प्रकल्पाच्या बांधकामावर दैनंदिन देखरेख ठेवणे व प्रकल्प व्यवस्थापन करणे इत्यादी बाबींसाठी नेमण्यात आलेल्या मे. मोनार्क सर्व्हेअर आणि इंजिनियरींग कन्सल्टंट या मुळ प्रकल्प सल्लागारांनी संपुष्टात आणलेल्या मुळ कंत्राटाच्या अटी व शर्तीच्या आधारे उर्वरीत बांधकाम पूर्ण करण्यासाठी रु. ६१.३३ कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक व निविदासंच तयार करण्यात आले, विषयांकित काम, मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर्स इंडिया लि. यांचेकडून काढून घेण्यात आल्याने आणि सदर कंत्राटीय करारामधील अटी, शर्ती व दर कायम राखून तुलनात्मक निविदा प्राप्त करणे आवश्यक ठरल्याने सन २०१३-१४ च्या दरसूचीवर आधारित असलेल्या व वस्तू सेवा कर इ. चा समावेश नसलेल्या मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर्स इंडिया लि. यांच्या मंजूर दरानुसार उर्वरित कामाची अंदाजपत्रकिय किंमत निश्चित करुन नविन कंत्राटदार नेमण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या.

११.४ उर्वरित कामाकरीता कंत्राटदार नेमण्यासाठी व्यापक प्रसिद्ध देण्यासाठी दिनांक २९/११/२०१८ रोजीच्या वर्तमानपत्रामध्ये (इंग्रजी दैनिक "डीएनए" व मराठी दैनिक "सामना") व दिनांक ०३/१२/२०१८ रोजीच्या टाईम्स ग्रुप मध्ये (देश पातळीवर) ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. त्याचप्रमाणे सदर ई-निविदा सूचना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर व ई-निविदा पोर्टलवर दिनांक ३०/११/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

११.५ प्रकल्प सल्लागारानी देखील पुर्नअभ्यास करुन पूर्वी समाविष्ट नसलेल्या अतिरिक्त बाबींचा खर्च (जसे की, कास्टींग यार्डसाठी लागणारी जागा व बांधकाम स्ट्रक्चरल डिझाईन तयार करणे व ५ वर्षाचा दोषदायित्व कालावधी दरम्यान पूर्ण झालेल्या कामाची देखभाल इ.) समावेश करुन अद्यावत केलेले कारणमिमांसेसह पुर्नसादर केलेले रु. ९३.४९ कोटी इतक्या किंमतीचे सुधारित अंदाजपत्रक निविदा समितीच्या सदर बैठकीमध्ये त्यांच्या दि. २२/०२/२०१९ रोजीच्या पूरकपत्राद्वारे सादर करण्यात आले.

११.६ सदर पत्रांमध्ये नमूद केलेल्या काही बाबी हया राज्यस्तरीय दरसूची (SSR) मध्ये समाविष्ट नाहीत, तसेच मूळ अंदाजपत्रकामध्ये देखील नाहीत. परंतू, राज्य शासनाच्या दि.२५/०१/२०१९ रोजीचा शासन निर्णय व MORTH च्या कंत्राटीय तरतुदीप्रमाणे काम पूर्ण करण्यासाठी सदर बाबीं आवश्यक त्याबाबतचा खर्च जमेस धरणे योग्य असल्याचे दिसून येते. त्यांचे तपशिल व विश्लेषण खालीलप्रमाणे -:

| अ.क्र. | अधिक्याची बाब | खर्च रु. कोटीमध्ये |
|---|---|---|
| १. | कास्टिंग यार्ड उभारणे. | |
| i) | जागेचे भाडे (रेडी रेकनर वर आधारित) | २.६२ |
| ii) | बांधकाम (राज्यस्तरीय दरसूची २०१८-१९ वर आधारीत) | १.६३ |
| | **एकूण** | **४.२५** |
| २. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २५/०१/२०१९ रोजीचा शासन निर्णय क्रमांक: खाक्षेस-२०१८/प्र.क्र.७५/रस्ते-९अ अन्वये स्ट्रक्चरल डिझाइन तयार करणेसाठी १.०% अधिकचा खर्च | ०.८६ |
| ३. | MORTH च्या नियमानुसार काम पूर्ण झाल्यावर ५ वर्षाच्या दोष्दायित्व कालावधी दरम्यान कामाची देखभाल करणेसाठी २.२५% चा अधिकचा खर्च | १.९४ |
| | **एकूण** | **७.०६** |

तसेच काही बाबींचे वस्तुनिष्ठ आर्थिक विश्लेषण तयार करणे शक्य नाही, अशा बाबींची नोंद खालीलप्रमाणे घेण्यात आली :

अ) विषयांकित कामाच्या स्थळाचा परिसर वाहतूक कोंडीचा असून त्यामुळे कामाची प्रगती कमी होण्याची शक्यता असणे, भरती-ओहोटीचा प्रभाव असलेल्या सुमारे १७ मी. पाण्याच्या खोलीमध्ये काम करण्यासाठी अधिकच्या यंत्रसामुग्री व मनुष्यबळाचा खर्च आणि पावसाळी मोसमादरम्यान काम बंद ठेवावे लागण्याच्या शक्यतेमुळे यंत्रसामुग्री व मनुष्यबळाचा क्षमतेपेक्षा कमी वापर होणे इत्यादी कारणास्तव अधिक्याच्या Overhead चा खर्च.

आ) नौकावहन गाळा एकच असल्याने विषयांकित कामासाठी आवश्यक असलेल्या Form Work चा पुर्नवापर करणे शक्य नाही ज्यामुळे किंमतीत वाढ अपरिहार्य.

इ) कामाच्या प्रस्तावित ठिकाणी पुलाच्या कामासाठी लागणाऱ्या मजुरांच्या अनुपलब्धतेमुळे मजुरी खर्चामध्ये वाढ.

ई) अंशत: काम दुसऱ्या कंत्राटदाराने केलेले असल्याने त्या अनुषंगाने खर्चामध्ये वाढ.

११.७ प्रकल्प सल्लागारांनी राज्यस्तरीय चालू वर्षाच्या दरसूची (SSR- २०१८-१९) च्या आधारे गणना केलेली सुधारीत अंदाजपत्रकीय किंमत रु.८६.४३ कोटी इतकी येते. तथापि, ११.१० मध्ये नमूद केल्यानूसार प्रस्तावित बांधकामाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय दरसूचीत समाविष्ट नसलेल्या बाबी पण कामासाठी आवश्यक असलेल्या बाबींचा समावेश केल्यानंतर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय किंमत रू.९३.४९ कोटी इतकी येते. या किंमतीच्या आधारे प्रथम लघुत्तम निविदाकारांनी कमी केलेला रू.१०१.७० कोटी इतक्या किंमतीचा आर्थिक देकार ८.७८% इतक्या अधिक्याचा ठरतो. त्यावर सखोल चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान खालील बाबींची देखील निविदा समितीने नोंद घेतली :-

अ) अंशत: काम इतर कंत्राटदाराने केलेले आहे व १७ मी. खोल भरती—ओहोटी च्या पाण्यामध्ये करावयाचे आहे. त्यामुळे विशेष तांत्रिक काम असल्यामुळे अधिकच्या प्रसिध्दीसाठी खास बाब म्हणून मंजूरी घेऊन २ वर्तमानपत्राबरोबर टाईम्स ऑफ इंडियाच्या सर्व राज्य व देश पातळीवरील वर्तमानपत्रांमध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार ३ निविदाकारांकडून स्पर्धात्मक निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

आ)वाहतूक कोंडीमधून लवकरात लवकर सुटका होण्यासाठी सदर प्रस्तावित काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी वर्तमानपत्र व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे व त्यामुळे सदर काम त्वरीत पूर्ण करणे गरजेचे होत आहे.

इ) फेर निविदा मागविल्यास कालापव्यय होऊन प्रस्तावित कामाच्या स्वरुपानुसार यापेक्षाही कमी किंमतीचा आर्थिक देकार मिळण्याची खात्री देता येत नाही.

ई) जूने काम आहे त्या अर्धवट स्थितीत जास्त काळ राहणे योग्य नाही.

वरील सर्व बाबींचा सारासार विचार करुन निविदा समितीने प्रथम लघुत्तम निविदाकार मे.टी ॲण्ड टी इन्फ्रा लि. यांनी कमी केलेला रु.१०१.७० कोटी (वस्तू व सेवाकरासहीत) इतक्या किंमतीचा अंतिम आर्थिक देकार स्विकारण्यासाठी शिफारस केली.

११.८ कार्यकारी समितीच्या दिनांक ०२/०३/२०१९ रोजी झालेल्या २६१ व्या बैठकीमधील ठराव क्र. १३७१ अन्वये मे.टी ॲण्ड टी इन्फ्रा लि. यांनी सादर केलेल्या विषयांकित कामाच्या रु. १०१.७० कोटी किंमतीच्या न्युनत्तम निविदेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

११.९ त्यानुसार मे. टी ॲण्ड टी लि. यांना सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ०८/०३/२०१९ आला. सन २०१९ व २०२० च्या अतिवृष्टी व लांबलेला पावसाळी मोसम आणि कोविड- १९ व त्याअनुषंगाने टाळेबंदी इ. अडचणींवर मात करुन एकूण ६ पदरी पुल नियोजित कालावधीमध्ये सदर प्रकल्प पूर्ण करुन दि. १७/०२/२०२२ रोजी वाहतुकीसाठी पूर्णपणे खुला करण्यात आलेला आहे.

११.१० वरील सर्व बाबींचा अंतर्भाव करुन तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | प्राधिकरणाची दिनांक २७ जून, २०१४ रोजी १३४ व्या बैठकीत मान्यतेनुसार मंजुरी प्रदान (रुपये कोटी मध्ये) | प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६१ व्या बैठकीत मान्यतेनुसार मंजुरी प्रदान (रुपये कोटी मध्ये) | प्रकल्पाची सुधारित किंमत (रुपये कोटी मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १. | कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे चौपदरी पूल बांधणे | ८५.०० कोटी | १०१.७० कोटी | १०१.७० कोटी |

**११.११ त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-**

<u>ठराव क्र.१६४७ :-</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) चे पोटकलम (ग) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ व उल्हास खाडीवर दुर्गाडी किल्याजवळील सहा पदरी पुलाच्या उर्वरित बांधकामास सुधारीत रक्कम रु. १०१,७०,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणे यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावची अंमजबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१२ : वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील सी-१३ व सी-१९ या वाणिज्य वापराच्या भूखंडांच्या विकसनासाठी ई-निविदा पध्दतीने वाटप करण्यास मंजुरी मिळणेबाबत.**

**१२.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सादरीकरण करुन प्राधिकरणास खालीलप्रमाणे अवगत केले :- :-**

१.१ शासनाने अधिसूचना क्र.बीकेआर-११७७/२६२-नवि-५, दिनांक ७ मार्च, १९७७ अन्वये "महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६" च्या कलम ४०(१)(सी) नुसार वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नेमणूक केली असून शासनाने अधिसूचना क्र.बीकेआर-११७७/२६२-नवि-५, दिनांक ९ एप्रिल, १९७९ अन्वये सदर अधिसूचित क्षेत्रासाठी प्राधिकरणाने सादर केलेल्या नियोजन प्रस्ताव (Planning Proposal) व विकास नियंत्रण नियमावलीस (DCRs) मंजुरी प्रदान केली आहे.

१.२ वांद्रे- कुर्ला संकुलाच्या मंजूर नियोजन प्रस्तावानुसार सदर अधिसूचित क्षेत्र विविध ब्लॉक ('अे' ते 'आय') मध्ये विभाजित केले आहे.

१.३ नियोजन प्रस्तावातील विविध ब्लॉक पैकी 'इ' व 'जी' ब्लॉकमधील जमीन प्राधिकरणाच्या मालकीची आहे.

१.४ प्राधिकरणाच्या ताब्यातील 'इ' व 'जी' ब्लॉकमधील जमिनीसाठी प्राधिकरणाने सविस्तर आरेखन (Detailed Layout) मंजूर केले आहे.

१.५ वांद्रे-कुर्ला संकुलातील 'ई' व 'जी' ब्लॉकमधील प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीचे वाटप "प्राधिकरण जमिन विल्हेवाट विनियम-१९७७" मधील विनियम ४(ii) अनुसार वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदेद्वारे केले जाते.

१.६ प्राधिकरणाने दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या १५१ व्या बैठकीत वांद्रे-कुर्ला संकुलातील पुढील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ४ वाणिज्य वापरासाठीच्या, ३ रहिवासी

वापरासाठीच्या व २ सामाजिक सुविधा वापरासाठीच्या भूखंडाच्या वाटपाबाबत ठराव क्र. १५८६ अन्वये ई-लिलाव / ई- निविदेव्दारे वाटपास मान्यता प्राप्त आहे.

<u>तक्ता १</u>

| अ. क्र. | भूखंड क्र. | भूखंड क्षेत्र (चौ. मी.) | वापर | विमानपत्तन प्राधिकरणा नुसारअनुज्ञेय इमारत उंची (मी.मध्ये) | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ. मी.) | चटईक्षेत्र निर्देशांक | भाडेपट्टा कालावधी | राखीव दर (रु. प्रती चौ. मी.बांधकाम क्षेत्र) | अधिमुल्याची राखीव किंमत (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ज्ञ | त | थ | द | ध | न= तXध |
| १ | सी-३७ | ४९५६ | वाणिज्य | ६४.८५ | २५,००० | ५.० | ८० वर्षे | ३,४४,४४८/- | ८६१.१२ |
| २ | सी-४४ व ४८ | ६०१९ | | ५९.५३ | ३०,००० | ५.० | | | १०३३.३४ |
| ३ | सी-६९ (सी) | ५८०८ | | ६८.०२ | ३०,००० | ५.२ | | | १०३३.३४ |
| ४ | सी-६९ (डी) | ६०७८ | | ६८.०२ | ३०,००० | ४.९ | | | १०३३.३४ |
| **एकूण वाणिज्य** | | **२२,८६१** | | | **१,१५,०००** | | | | **३,९६१.१४** |
| ५ | आर.१.५ | ५४०९ | रहिवास | ५४.०४ | २०,००० | ३.७ | ८० वर्षे | ३,५२,००८/- | ७०४.०२ |
| ६ | आर.१.६ | ४९७४ | | ५४.०५ | २०,००० | ४.० | | | ७०४.०२ |
| ७ | आर.१.७ | ५८७६ | | ५४.०५ | २०,००० | ३.४ | | | ७०४.०२ |
| **एकूण रहिवास** | | **१६,२५९** | | | **६०,०००** | | | | **२,११२.०६** |
| ८ | एस एफ -४ | १२०८ | सामाजिक सुविधा (शाळा/ रुग्णालय) | ६२.२६ | २४१७ | २.० | ८० वर्षे | १,६१,२८०/- | ३८.९८ |
| ९ | एस एफ -५ | २८६२ | | ६२.५० | ५७२४ | २.० | | | ९२.३२ |
| **एकूण सामाजिक सुविधा** | | **४,०७०** | | | **८,१४१** | | | | **१३१.३०** |
| **एकुण** | | **४३,१९०** | | | **१,८३,१४१** | | | | **६,२०४.५** |

१.७ प्राधिकरणाने दि.१६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या १५१ व्या बैठकीत मंजुर केलेला ठराव क्र. १५८६ मधील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :-

१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, URDPFI-Guidelines, National Building Code वेगवेगळया मंजुर विकास नियंत्रण नियमावली या सर्वांमध्ये नमूद केलेले वापर व त्यामधील होणा-या वेळोवेळी सुधारणा महानगर आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार भूखंड वाटपाबाबतच्या निविदेवेळी व बांधकाम परवानगी देतेवेळी विचारात घ्यावे.

२) प्रस्तावित निविदेस चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी प्राधिकरणाने याअगोदर मागविलेल्या यशस्वी निविदेमधील पात्रता निकष व निविदा भरण्यासाठी पात्र प्रवर्ग यामध्ये महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने आवश्यक सुधारणांसह अथवा सुधारणांशिवाय निविदा मागविण्यात येतील.

३) प्रस्तावित भूखंडांचे वरील तक्त्यात नमुद केलेल्या अधिमूल्याच्या राखीव दरानुसार भाडेपट्टयावर वाटप करण्यासाठी ई-निविदा अथवा ई-लिलाव पद्धती वापरणे, भूखंड/ बांधकाम क्षेत्रातील किरकोळ बदल करणे, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापर ठरविणे, भूखंडांचे एकत्रीकरण/विभागणी करणे, भुखंड विकास योग्य (developable) करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे तसेच बाजाराच्या परिस्थिती नुसार ई- निविदा/ई-लिलाव उचित वेळी मागविणे, एकावेळी किती भूखंडांच्या निविदा काढायच्या याचा निर्णय घेणे, त्या एकत्र किंवा वेगवेगळया मागविणे, त्यांचा प्राधान्यक्रम ठरविणे व याबद्दलची सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत केलेले आहे.

**१२.२ पुढे अशी चर्चा झाली की,**

२.१ **वाणिज्य वापराच्या भूखंड वाटपाबाबत :**

वरील परिच्छेद १.५ व १.६ मध्ये नमूद केल्यानुसार प्राधिकरणाच्या १५१ व्या बैठकीतील ठराव क्र. १५८६ च्या मान्यतेनुसार ई-निविदेद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या जी-ब्लॉकमधील सी-६९सी व सी-६९डी या वाणिज्य वापराच्या २ भूखंडाच्या वाटपासाठी प्राधिकरणाने महानगर आयुक्तांच्या मान्यतेने ई-निविदा मागविल्या होत्या.

सदर निविदेत प्राप्त प्रतिसाद प्राधिकरणाच्या दि. २० ऑक्टोंबर, २०२२ रोजीच्या १५३व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. त्यास प्राधिकरणाने ठराव क्र. १६३२ अन्वये या निविदेद्वारे प्राप्त दर रु. ३,४४,५०० प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र यादराने सदर भूखंड मेसर्स गोईसू रियल्टी प्रा.ली. यांना वाटपास मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे प्राधिकरणाने दि. १७/११/२०२२ रोजी यशस्वी निविदाकारास देकार पत्र दिले असून त्याने अधिमुल्याच्या ३०% एवढा पहिला हप्ता एक महिन्यात (दि.१५/१२/२०२२ रोजी) दुसरा हफ्ता

(दि.१६/०१/२०२३ रोजी) व तिसरा हप्ता (दि. १६/०२/२०२३ रोजी) प्राधिकरणास भरणा केला आहे. याबाबतची सद्यस्थिती खालील तक्त्यात नमूद केली आहे :-

तक्ता— २

| भुखंड | भुखंड क्षेत्र (चौमी) | बांधकाम क्षेत्र (चौमी) | राखीव दर (रू/चौमी) | प्राप्त दर (रू/चौमी) | एकूण अधिमुल्य (रु कोटी) | देकारपत्र दिनांक | प्राप्त अधिमुल्य (रू. कोटी) | प्राप्त अधिमुल्य दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सी-६९सी | ५८०७.५० | ३०,००० | ३,४४,४४८ | ३,४४,५०० | १०३३.५० | १७/११/२०१२ | ३१०.०५ | १५/१२/२०२३ |
| | | | | | | | ९०.४३ | १६/०१/२०२३ |
| | | | | | | | ९०.४३ | १६/०२/२०२३ |
| | | | | | | | एकूण प्राप्त ४९०.९१ | |
| सी-६९डी | ६०७७.६० | ३०,००० | ३,४४,४४८ | ३,४४,५०० | १०३३.५० | १७/११/२०१२ | ३१०.०५ | १५/१२/२०२३ |
| | | | | | | | ९०.४३ | १६/०१/२०२३ |
| | | | | | | | ९०.४३ | १६/०२/२०२३ |
| | | | | | | | एकूण प्राप्त ४९०.९१ | |

सबब रु. ३,४४,५०० प्रति. चौ.मी. बांधकाम क्षेत्र हा वाणिज्य वापराचा प्राप्त दर असून तो पुढील भूखंड वाटपाचा राखीव दर असेल.

**१२.३ बाब टिप्पणीमधील मुद्दे विचारात घेता खालील प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी सादर: -**

३.१ **वाणिज्य वापराच्या २ भूखंडासाठी ई-निविदा मागविण्याबद्दल :**

प्राधिकरणाने संपुर्ण मुंबई महानगर क्षेत्रात पायाभूत सुविधांचे अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यामुळे प्राधिकरणास या प्रकल्पांसाठी निधीची आवश्यकता आहे. प्राधिकरणाने दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या १५१व्या बैठकीत ठराव क्र. १५८६ अन्वये ई-लिलाव/ई-निविदेव्दारे वाटपास मान्यता दिलेल्या भूखंडाव्यतिरिक्त आता वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील वाणिज्य वापरासाठीच्या सी-१३ व सी-१९ या जी-ब्लॉकमधील २ भूखंडांचे देखील भाडेपट्टयावर वाटप करण्यासाठी रु. ३,४४,५००/- प्रति.चौ.मी. वाणिज्य बांधकाम क्षेत्र या अधिमूल्याच्या राखीव दराने ई निविदा मागविण्यास

देखील मान्यता दयावी ही विनंती. या सी-१३ व सी-१९ भूखंडाच्या प्रस्तावित वाटपाबद्दलची सविस्तर माहिती खालील तक्त्यात दिली आहे :-

तक्ता – ३

| क्र. | वाणिज्य भूखंड क्र. | सी-१३/जी-ब्लॉक | सी-१९/जी-ब्लॉक |
|---|---|---|---|
| (१) | भूखंड क्षेत्र | ७०७१.९० चौ.मी. | ६०९६.६७ चौ.मी. |
| (२) | अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र | ४५,००० चौ.मी. | ४०,००० चौ.मी. |
| (३) | राखीव दर | रु.३,४४,५०० प्रति. चौ.मी. बांधकाम क्षेत्र | रु.३,४४,५०० प्रति. चौ.मी. बांधकाम क्षेत्र |
| (४) | भूखंडाची राखीव किंमत | रु.१५५०.२५ कोटी | रु.१३७८.००कोटी |
| (५) | भाडेपट्टा कालावधी | ८० वर्षे | ८० वर्षे |
| (६) | दिनांक १८/०९/२०१८ रोजी विमानपत्तन प्राधिकरणाने अनुज्ञेय केलेली इमारतीची उंची | ६९.०७ मी. (AGL) | ६९.०० मी. (AGL) |

सदर भूखंडाचे स्थळ दर्शविणारा नकाशा बाब टिप्पणी सोबत जोडपत्र-३ येथे ठेवला आहे.

३.२ प्राधिकरणाच्या १५१व्या बैठकीतील ठराव क्र.१५८६ अन्वये यापूर्वी प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार खालील अटी सी-१३ व सी-१९ या भूखंडाच्या वाटपास देखील लागू असतील यास मान्यता द्यावी ही विनंती.

१) प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, URDPFI-Guidelines, National Building Code, वेगवेगळया मंजुर विकास नियंत्रण नियमावली या सर्वांमध्ये नमूद केलेले वापर व त्यामधील होणा-या वेळोवेळी सुधारणा महानगर आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार भूखंड वाटपाबाबतच्या निविदेवेळी व बांधकाम परवानगी देतेवेळी विचारात घेण्यास्तव मान्यता द्यावी ही विनंती.

२) प्रस्तावित निविदेस चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी प्राधिकरणाने याआधी मागविलेल्या यशस्वी निविदेमधील पात्रता निकष व निविदा भरण्यासाठी पात्र प्रवर्ग यामध्ये महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने आवश्यक सुधारणांसह अथवा सुधारणाशिवाय निविदा मागविण्यास मान्यता द्यावी, ही विनंती.

३) प्रस्तावित भूखंडाचे ई-निविदा पध्दतीने वाटप करताना भूखंड बांधकाम क्षेत्रातील किरकोळ बदल करणे, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापर ठरविणे, भूखंडांचे एकत्रीकरण/विभागणी करणे, भुखंड विकास योग्य करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे याबद्दलची सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी, ही विनंती.

४) प्रस्तावित भूखंडांचे विकसन करताना वास्तुशास्त्रीय नियंत्रणे (Architectural Control) लागू न करता या भूखंडांचे विकसन प्रचलित विकास नियंत्रण नियमावली अनुसार अनुज्ञेय करण्यास मान्यता द्यावी, ही विनंती.

५) बाब टिप्पणीतील परिच्छेद ३.१ मधील तक्ता-३ मध्ये नमूद अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र हे प्राधिकरणाने दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विमानपत्तन प्राधिकरणाकडून (AAI) कडून प्राप्त केलेल्या ना हरकत दाखल्यानुसार (NOC) अनुज्ञेय इमारत उंचीनुसार प्रस्तावित केले आहे. भविष्यात सदर प्रस्तावित बांधकाम क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्र वितरीत करण्याबाबत सदर भूखंडाच्या वाणिज्य वाटपग्रहींनी प्राधिकरणास मागणी केली तर प्राधिकरणामार्फत सदर अधिक बांधकाम क्षेत्राचे वितरण या निविदेद्वारे अशा भूखंडासाठी प्राप्त उच्चतम दर किंवा अधिकचे बांधकाम क्षेत्र वितरण करतेवेळी प्राधिकरणाने निश्चित केलेले त्यावेळचे बाजार मूल्य दर यापैकी जे अधिक असेल त्या दराने वाटप करण्यास मान्यता द्यावी, ही विनंती.

३.३ वांद्रे-कुर्ला संकुलातील बहुमजली वाहनतळ व मोकळया भूखंडावर तात्पुरत्या स्वरुपात वाहनतळ चालविण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती प्राधिकरणाने केलेली आहे. परंतु, प्राधिकरणास प्रस्तावित वाहनतळाचा भूखंड सी-१३ हा ई-निविदा मागविण्यासाठी आवश्यक असल्याने याबाबतच्या करारनाम्यातील अनुज्ञेय अटी शर्तीनुसार व सदर भूखंड प्राधिकरणाच्या ताब्यात घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाने मान्यता द्यावी, ही विनंती.

३.४ प्राधिकरणाने दिनांक ०३ जून, २०१६ रोजीच्या १४०व्या बैठकीमध्ये मिश्रवापर (वाणिज्य + रहिवासी) अनुज्ञेय करण्यास मान्यता दिली होती व त्याप्रमाणे प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६च्या कलम ३७ (१) अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिल्यास, शासनाच्या मान्यतेप्रमाणे सी-१३ व सी-१९ या भूखंडांवर मिश्रवापर अनुज्ञेय करण्यास प्राधिकरणाने मान्यता द्यावी, ही विनंती.

१२.१० वरील विषयाबाबत चर्चेदरम्यान मा. उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांनी असे सांगितले कि, या भूखंडांच्या विक्रीतून मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाने हाती घेतलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांसाठी आवश्यक निधींपैकी काही प्रमाणात निधी प्राप्त होईल. मा. मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी त्यास दुजोरा दिला. त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव संमत केला :-

**ठराव क्र.१६४८:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील वाणिज्य वापरासाठीच्या बाब टिप्पणीमधील परिच्छेद ३.१ मधील तक्ता-३ अनुसार जी-ब्लॉकमधील सी-१३ व सी-१९ या दोन भूखंडांचे, भाडेपट्टयावर वाटप करण्यासाठी व रु.३,४४,५००/- प्रति चौ. मी. बांधकाम क्षेत्र या अधिमूल्याच्या राखीव दराने ई निविदा मागविण्यास प्राधिकरण मान्यता देतआहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या १५१व्या बैठकीतील ठराव क्र.१५८६ अन्वये यापूर्वी प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार आता सी-१३ व सी-१९ या दोन भूखंडांचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, URDPFI-Guidelines, National Building Code, वेगवेगळया मंजुर विकास नियंत्रण नियमावली या सर्वांमध्ये नमूद केलेले वापर व त्यामधील होणा-या वेळोवेळी सुधारणा महानगर आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार भूखंड वाटपाबाबतच्या निविदेवेळी व बांधकाम परवानगी देते वेळी विचारात घेण्यास्तव प्राधिकरण मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या १५१व्या बैठकीमधील ठराव क्र. १५८६ अन्वये यापूर्वी प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार आता सी-१३ व सी-१९ या दोन भूखंडांचे प्रस्तावित निविदेस चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी प्राधिकरणाने याआधी मागविलेल्या यशस्वी निविदेमधील पात्रता निकष व निविदा भरण्यासाठी पात्र प्रवर्ग यामध्ये महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने आवश्यक सुधारणांसह अथवा सुधारणाशिवाय निविदा मागविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे."

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या १५१व्या बैठकीमधील ठराव क्र. १५८६ अन्वये यापूर्वी प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार आता सी-१३ व सी-१९ या दोन भूखंडांचे ई-निविदा पध्दतीने वाटप करताना भूखंड/ बांधकाम क्षेत्रातील किरकोळ बदल करणे, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापर ठरविणे, भूखंडांचे एकत्रीकरण /विभागणी करणे, भुखंड विकास योग्य करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे

याबद्दलची सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या १५१व्या बैठकीमधील ठराव क्र. १५८६ अन्वये यापूर्वी प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार आता सी-१३ व सी-१९ या दोन भूखंडांचे विकसन करताना वास्तुशास्त्रीय नियंत्रणे (Architectural Control) लागू न करता या भूखंडांचे विकसन विकास नियंत्रण नियमावली अनुसार अनुज्ञेय करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या १५१व्या बैठकीमधील ठराव क्र. १५८६ अन्वये यापूर्वी प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार आता सी-१३ व सी-१९ या दोन भूखंडांचे बाब टिप्पणीतील परिच्छेद ३.१ मधील तक्ता-३ मध्ये नमूद अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र हे प्राधिकरणाने दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विमानपत्तन प्राधिकरणाकडून (AAI) कडून प्राप्त केलेल्या ना हरकत दाखल्यानुसार (NOC) अनुज्ञेय इमारत उंचीनुसार प्रस्तावित केले आहे. तथापि, भविष्यात सदर प्रस्तावित बांधकाम क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्र वितरीत करण्याबाबत सदर वाणिज्य भूखंडाच्या वाटपग्रहींनी प्राधिकरणास मागणी केली तर प्राधिरकणामार्फत सदर अधिक बांधकाम क्षेत्राचे वितरण या निविदेद्वारे अशा भूखंडासाठी प्राप्त उच्चतम दर किंवा अधिकचे बांधकाम क्षेत्र वितरण करतेवेळी प्राधिकरणाने निश्चित केलेले त्यावेळचे बाजार मूल्य दर यापैकी जे अधिक असेल त्या दराने वाटप करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**"त्यापुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वांद्रे-कुर्ला संकुलातील बहुमजली वाहनतळ व मोकळया भूखंडावर तात्पुरत्या स्वरुपात वाहनतळ चालविण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती प्राधिकरणाने केलेली आहे. परंतु, प्राधिकरणास प्रस्तावित वाहनतळाचा भूखंड सी-१३ हा् ई-निविदा मागविण्यासाठी आवश्यक असल्याने याबाबतच्या करारनाम्यातील अनुज्ञेय अटी शर्ती नुसार व सदर भूखंड प्राधिकरणाच्या ताब्यात घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यास याद्वारे मान्यता देत आहे."

**"त्यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की** ,प्राधिकरणाने दिनांक ०३ जून, २०१६ रोजीच्या १४०व्या बैठकीमध्ये मिश्रवापर (वाणिज्य + रहिवासी) अनुज्ञेय करण्यास मान्यता दिली होती व त्याप्रमाणे प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या

कलम ३७ (१) अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिल्यास, शासनाच्या मान्यतेप्रमाणे सी-१३ व सी-१९ या भूखंडांवर मिश्रवापर अनुज्ञेय करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे."

**"आणखी पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** याबद्दलची सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर क्षेत्रामध्ये करण्यात येत असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीच्या अनुषंगाने पथकर वसुलीमार्फत परतावा मिळणेबाबत.**

१३.१ महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत माहिती देताना असे प्रस्तावित केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ही संस्था मुंबई महानगर क्षेत्रामध्ये पायाभुत सुविधांच्या विकासाकरिता सन २००५ पासून मोठया प्रमाणावर गुंतवणुक करीत आहे. यामध्ये मेट्रो रेल्वे प्रकल्प, मोनो रेल प्रकल्प, मुंबई पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत मुंबई महानगर पालिका क्षेत्रात विविध प्रकल्प तसेच मुंबई महानगरपालिका क्षेत्राबाहेर विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पाअंतर्गत विविध प्रकल्प, बाह्य रस्ते विकास योजना, निर्मल अभियान, सुर्या पाणी पुरवठा प्रकल्प असे अनेक प्रकल्प राबविण्यात आले आहेत. यातील अनेक प्रकल्प आजमितीस पूर्ण झाले असून काही प्रकल्प सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत व काही प्रकल्प सुसाध्यता व अंदाजपत्रक बनविणेच्या स्थितीत आहेत. या सर्व प्रकल्पांमुळे मुंबई महानगर क्षेत्रातील नागरिकांना वाहतुक व दळणवळणाकरीता काही प्रमाणावर सुविधा उपलब्ध झाल्या आहेत यामुळे क्षेत्रातील नागरिकांचे राहणीमान उंचावून एकूणच परिसराच्या विकासास मोठया प्रमाणावर सहाय्य झाले आहे.

१३.२ या सर्व प्रकल्पांकरीता आर्थिक गुंतवणूक करताना प्राधिकरणामार्फत फक्त वांद्रे कुर्ला संकुल व वडाळा भार वाहन तळ या परिसरातील भुखंडाची विक्री करुन त्यामधुन प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा एकमेव स्त्रोत म्हणून वापर करण्यात आला आहे. अपवादात्मक काही प्रकल्पांकरिता इतर उदा. केंद्रातील संस्थाकडून अर्थसहाय्य प्राप्त झाले असले तरीही मुख्यत्वे भुखंड विक्री या स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. तथापि, उपरोक्त दोन्ही ठिकाणची भुखंड उपलब्धता संपुष्टतेकडे येत असून सद्य परिस्थितीत सुरु असलेल्या मेट्रो व इतर पायाभुत सुविधा प्रकल्पांचा

खर्च देखील यामधुन भागविणे कठीण होणार आहे. या व्यतिरिक्त भविष्यात वर्सोवा विरार सागरी सेतु, बोरीवली ४ पदरी भुयारी मार्ग, ठाणे कोस्टल रोड, फ्री-वे एक्सटेंशन ई. काही प्रकल्प हाती घेण्याचे नियोजन असून त्यांची यादी बाब टिप्पणीच्या परिशिष्ट- १ नुसार सादर करण्यात आली (प्रकल्पाची किंमत रु. १,१९,७६४.०९ कोटी). या सर्व सध्या सुरु असलेल्या व भविष्यात हाती घेण्यात येणार असलेल्या प्रकल्पांचा खर्च भागविणेकरीता इतर उत्पन्न स्त्रोतांचा तातडीने विचार होणे आवश्यक असल्याचे चर्चेदरम्यान नमूद केले.

१३.३ चर्चेस अनुसरून महाराष्ट्र राज्ये रस्ते विकास महामंडाळामार्फत सन १९९५-१९९८ या कालावधीत मुंबई शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणेकरिता ५५ उड्डाणपुल उभारण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. या अनुषंगाने करण्यात आलेल्या आर्थिक गुंतवणुकीचा परतावा म्हणुन तेव्हापासून आजतागयत मुंबई शहरात प्रवेश करणाऱ्या सर्व वाहनांकडून पथकर आकारण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्ये रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येत असलेल्या या पथकर वसुलीची मुदत दि. ३०/०९/२०२७ पर्यंत असून तदनंतर सदर पथकर वसुली बंद होणार आहे असे समजते. या व्यातिरिक्त खाडी पुल क्र. ३ सर्वसाधारणपणे अंदाजपत्रकीय किंमत रु. ५५९.० कोटी किंमतीच्या प्रकल्पासाठी सन २०३६ पर्यंत पथकर वसुलीची मुदत सायन पनवेल रस्त्यावर येणाऱ्या वाहनासाठी असणार आहे.

१३.४ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सन २००५ पासून अव्याहतपणे मुंबई महानगर पालिका क्षेत्र तसेच इतर मुंबई महानगर क्षेत्रातील महापालिकामध्ये मोठया प्रमाणावर पायाभुत सुविधांची कामे करण्यात आली असून भविष्यात देखील करण्याचे नियोजन आहे. सध्या महाराष्ट्र राज्ये रस्ते विकास महामंडाळामार्फत करण्यात येत असलेल्या व सन २०२७ मध्ये संपुष्टात येणाऱ्या पथकर वसुलीचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला मिळाल्यास भविष्यातील मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामधील नियोजित (रक्कम रु. १,१९,७६४.०९ कोटी) प्रकल्पांकरिता प्राधान्य ठरवून होणे गरजेचे आहे, असा प्रस्ताव महानगर आयुक्त यांनी सभेपुढे सादर केला. मा. मुख्य मंत्री, मा. उप मुख्यमंत्री व मा. मुख्य सचिव यांनी प्राधिकरणास उत्पन्नाचे स्त्रोत आवश्यक आहे यावर चर्चा केली. बैठकीत वाशी पथकर नाक्याबाबत महानगर आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे स्तरावर व्यवहार्य निर्णय घेणेबाबत चर्चा केली. याशिवाय महानगर प्रदेशात नविन पथकर नाके, त्यांचे

स्थळ व नियोजन महानगर आयुक्त यांनी करणे योग्य होईल. याशिवाय महानगर आयुक्त यांनी सर्वंकष प्रकल्प निहाय पथकर नियोजन नगर विकास विभागाच्या एका संस्थेखाली होणे गरजेचे असल्याबद्दल मा. उप मुख्यमंत्री यांनी सुचविले.

१३.५ मुंबई महानगर क्षेत्रामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत असलेल्या गुंतवणुकीच्या अनुषंगाने मुंबई शहरात प्रवेश करणाऱ्या सर्व वाहनांकडून पथकर वसुलीचे अधिकार सन २०२७ नंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला मिळण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेकरीता प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आल्याचे महानगर आयुक्त यांनी नमूद केले.

**१३.६ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला:-**

**<u>ठराव क्र.१६४९:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर क्षेत्रामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत असलेल्या गुंतवणुकीच्या अनुषंगाने व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये सद्यस्थितीत असणा-या रू.१,१९,७६४/- कोटी व प्राधिकरण आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मा. मुख्य सचिव, मा. उप मुख्यमंत्री व मा. मुख्यमंत्री यांनी मुंबई शहरात प्रवेश करणाऱ्या सर्व वाहनांकडून पथकर वसुलीचे अधिकार सन २०२७ नंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकणाला मिळण्याचा प्रस्ताव याव्यतिरिक्त महानगर प्राधिकरण क्षेत्रात इतर ठिकाणी पथकर लावण्याच्या नियोजनाचे व आधुनिकीकरण करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहेत. तसेच वाशी येथील खाडी पुल क्र.३ चे काम प्रगतीपथावर असून त्यावर पथकर व त्याचा कालावधी आणि अन्य पर्यायांचा अभ्यास करून व्यवहार्य निर्णय घेण्याचा अधिकार महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना देण्यात येत आहे. वरील सर्व प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरीता पाठविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१४ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा उपप्रमुख्य प्रायोजित व प्रदर्शन (Sponsorship and Exhibition) प्रकल्पांतर्गत (Extd. MUIP) श्री क्षेत्र सिध्दगीरी महासंस्थान, कणेरी मठ, कोल्हापूर या संस्थेस प्रायोजकत्व रक्कम (Sponsorship amount) उपलब्ध करून दिलेल्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

१४.१ महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) योजनेअंतर्गत Kshetra Siddhagiri Amusement Pvt.Ltd, श्री क्षेत्र सिध्दगिरी महासंस्थान, कणेरी मठ, कोल्हापूर या संस्थेस "सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव" या कार्यक्रमासाठी दि.०७/०२/२०२३ रोजी एकूण रू.२/- कोटी अधिक आवश्यक त्या सर्व करासहित वितरीत करण्यास मान्यता दिली आहे.

१४.२ श्री क्षेत्र सिध्दगिरी महासंस्थान, कणेरी मठ, कोल्हापूर या संस्थेकडून दि.११/०१/२०२३ रोजी प्राधिकरणास विनंती पत्र प्राप्त झालेले आहे. त्या पत्रामध्ये "सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव" म्हणजेच पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश असे पर्यावरणावर आधारीत एक अद्वितीय परिषद व भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे व त्याबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. तसेच मंत्रालयात दि.१०/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सर्व विभागातील संबंधित मान्यवर अधिकारी उपस्थित होते ज्यात या कार्यक्रमाबाबत सविस्तर चर्चा व सादरीकरण करण्यात आले होते. या कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सर्व विभागांना याबाबत सक्रिय सहभाग घ्यावा असे निर्देश दिले होते.

१४.३ चर्चेनुसार श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ, कणेरी, कोल्हापुर यांचे वतीने दिनांक २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत आयोजित "सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव" हा कार्यक्रम श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ, कणेरी, कोल्हापूर येथे महाराष्ट्र राज्य शासन यांच्या संयुक्त सहयोगाने आयोजित केला जात असून त्यामध्ये वर्तमानात जीवसृष्टीचे व वसुंधरेचे संरक्षण व संवर्धन याबाबत व्यापक स्वरुपात जनजागृती केली जाणार आहे. श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ यांच्या दिनांक ११/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सुरुवातीच्या आयोजनाकरीता रू.५०,००,००० (रू.५० लाख फक्त) ची मागणी करण्यात आली होती. परंतू, तद्नंतर या अद्वितीय आंतरराष्ट्रीय परीषद, भव्य

प्रदर्शन असे या कार्यक्रमाचे वाढते स्वरुप व प्रतिसाद पाहता त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या सहयोगाने आयोजित करण्यात येणाऱ्या या जागतिक स्तरावरील लोकशिक्षणाच्या, जनजागरणाच्या या लोकोत्सवाकरीता एकूण रू.२,००,००,०००/- (रू. दोन कोटी फक्त) अधिक आवश्यक त्या सर्व करासहित इतक्या अधिक रक्कमेची या उपक्रमासाठी प्राधिकरणाकडे व्यक्त केली असून त्यांच्या बँकेच्या खात्यात जमा करण्याची विनंती केली आहे. मा. मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दि.०७/०२/२०२३ रोजी दिलेल्या मंजूरीनुसार सदरची रक्कम Kshetra Siddhagiri Amusement Pvt.Ltd, श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ यांच्या रू.२,३६,००,०००/- + (वस्तू व सेवाकर (१८%) सहित) (रू.दोन कोटी छत्तीस लाख फक्त) UTR No.BKIDA23040766804 अन्वये दि.०९/०२/२०२३ रोजी प्रायोजकत्व रक्कम (sponsorship amount) जमा करण्यात आलेली आहे.

प्राधिकरणाच्या दि.२६/०८/२०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीच्या बाब क्र.१८.२ च्या ठरावानुसार श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ, कणेरी, कोल्हापूर येथे दिनांक २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत आयोजित "सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव" हा कार्यक्रमासाठी Kshetra Siddhagiri Amusement Pvt.Ltd रू. २,३६,००,०००/- + वस्तू व सेवाकर (१८%) सहित (रू. दोन कोटी छत्तीस लाख फक्त) प्रायोजकत्व रक्कमेच्या (sponsorship amount) प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर (post facto) मंजूरी मिळणेसाठी सादर.

**१४.४ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

<u>ठराव क्र.१६५०:</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ, कणेरी, कोल्हापूर येथे दिनांक २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत आयोजित "सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव" हा कार्यक्रमासाठी Kshetra Siddhagiri Amusement Pvt.Ltd ₹ २,३६,००,०००/- + वस्तू व सेवाकर (१८%) सहित ((₹ दोन कोटी छत्तीस लाख फक्त) इतक्या रक्कमेचे प्रायोजकत्व (sponsorship amount) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्विकारण्यास याव्दारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : बाळकूम ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्गाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

१५.१ महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, दि. १६/११/२०२१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १५१व्या बैठकीत ठाणे खाडी किनारा मार्गाच्या प्रस्तावास व त्यास अपेक्षित रु. १३१६.१८ कोटी या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर अंदाजपत्रकीय रक्कम ठाणे महानगरपालिकेने सादर केलेल्या ढोबळ स्वरुपाच्या अंदाजपत्रकावर आधारीत होती. तसेच सदर अंदाजपत्रक तयार करताना सखोल सर्वेक्षणे (Detailed Estimate) केलेले नसल्याने केवळ पर्यावरण परवानगीसाठी आवश्यकतेनुसार ढोबळ स्वरुपाचे अंदाजपत्रक होते. या अंदाजपत्रकात सविस्तर सर्वेक्षण करुन प्रत्यक्ष अंदाजपत्रकीय किंमतीत बदल करणे अपेक्षित होते. प्राधिकरणाच्या सदर ठरावात याबाबत स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. प्राधिकरणाच्या मंजूरीनंतर सदर प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक बनविणे व कामाचे पर्यवेक्षण करणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करण्यात आली होती. सदर सल्लागारांनी प्रकल्पाचे अनुषंगाने आवश्यक चाचण्या, सर्वेक्षणे व संकल्पने करुन सविस्तर अंदाजपत्रक तयार केले.

१५.२ चर्चेनुसार, असे नमूद करण्यात आले की, सल्लागारांनी प्रथम प्रस्तावित रस्त्याची समान पातळीत आखणी निश्चित केली. त्यानंतर सदर आखणीमध्ये महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) च्या निर्देशानुसार किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ) व बफर क्षेत्रामध्ये रस्त्याचे स्टील्टवरील बांधकाम, कळवा खाडीवर पुल, नौदल क्षेत्रालगत जमिनीखालून रस्ता, वाघबीळ व नागला बंदर येथे टेकडी खोदुन रस्ता व इतर भागात जमिनीवरील रस्ता तसेच इतर नियोजित रस्त्यांशी जोडणी याप्रकारे रस्त्याची आखणी (Plan and Profile) केली. भूवैद्यानिक सर्वेक्षण चाचण्यांनुसार प्रस्तावित रस्त्याच्या बहुतांश भागात रस्ता बांधकामासाठी जमिनीचा स्तर योग्य नसल्याचे (खार जमीन / दलदल) आढळून आल्याने याची भुधारण क्षमता (Soil Bearing Capacity) वृद्धींगत करण्यासाठी परफोरेटेड व्हर्टीकल ड्रेन Perforated Vertical Drain) या तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

१५.३ चर्चेनुसार बाळकुम ते गायमुख या भागात रस्त्याची लांबी १३.३८४ किमी इतकी असून रुंदी महानगरपालिकेच्या विकास आराखडयानुसार ४०/४५ मी. आहे. प्रस्तावानुसार रस्त्याचे बांधकाम ३+३ मुख्य मार्गिका आणि प्रत्येकी २.५ मी. रुंदीची साईड पट्टी यासाठी करण्यात येणार आहे. प्रस्तावित रस्ता बाळकुम जवळ प्रस्तावित ठाणे - भिवंडी - कल्याण मेट्रो मार्गास छेदुन जात आहे. या ठिकाणी रस्त्याची आखणी ठाणे भिवंडी रस्त्याच्या वरुन तर मेट्रो मार्गिकेच्या खालून करण्यात आली आहे. यामुळे ठाणे भिवंडी रस्ताच्या पातळी व आखणीमध्ये बदल करणे गरजेचे आहे. अस्तित्वातील नाल्यांच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार कलव्हर्ट / छोट्या पुलांचे बांधकाम समाविष्ट करण्यात आले आहे. प्रस्तावित ठाणे खाडी किनारा मार्ग हा खारेगाव जवळ मुंबई - आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ या ठिकाणी सुरु होऊन गायमुख येथे ठाणे - घोडबंदर राज्य महामार्ग क्र. ४२ या रस्त्यास मिळतो. या तीनही ठिकाणी प्रस्तावित ठाणे खाडी किनारा मार्गाचे या अस्तित्वातील रस्त्यांशी सुयोग्यरीत्या जोडणी करण्यासाठी जंक्शन सुधारणा व कमीत कमीत भुसंपादन करणेचे दृष्टीने उपाययोजना (मुक्त डावे वळण, भुयारी मार्ग, इ.) करण्यात येणार आहेत. सदर जंक्शनचा फेर आवश्यकतेनुसार वाहतुक निश्चित झाल्यास अन्य डावे, उजवी वळणे भविष्यात नियोजन करणे अपेक्षित आहे.

१५.४ प्रकल्पाच्या अंदाजपत्रकाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, उपरोक्त बाबींचा अंतर्भाव करुन सल्लागारांमार्फत महाराष्ट्र शासनाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचिवर आधारीत प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रकल्पाची एकूण २ टप्प्यांमध्ये विभागणी करण्यात आली असून प्रथम टप्प्यात बाळकुम ते गायमुख मुख्य रस्त्याचे बांधकाम सद्यस्थितीत प्रगतीपथावरील असलेल्या भुसंपादन क्षेत्रामध्ये व प्राप्त पर्यावरण परवानग्यांच्या अनुषंगाने करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात वर नमूद ३ ठिकाणी जंक्शन सुधारणेची (कमीत कमी भुसंपादनसह) कामे करणे प्रस्तावित केले आहे. या टप्प्यासाठी भुसंपादन व पर्यावरण परवानग्या घेणे गरजेचे असुन त्यांचे सविस्तर प्रस्ताव ठाणे महानगरपालिका / प्राधिकरण यांचे मार्फत सादर करण्यात येतील. पहिल्या टप्प्यातील मुख्य रस्त्याचे अंदाजपत्रक जमिनीच्या उपलब्ध रुंदीत तसेच प्रत्यक्ष काम करण्यासाठी ३ भागांमध्ये विभागणी करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये बदल अथवा एकीत्रतपणे करणे याचे नियोजन महानगर आयुक्त करतील.

१५.५ प्रकल्पाच्या टप्प्यांबाबत माहिती खालीलप्रमाणे :

अ. टप्पा १ भाग १ : खारेगाव ते कोलशेत (सा.क्र. ०/०००/ कि.मी. ते सा.क्र. ४/०५०) लांबी ४.०५० कि.मी.

सदर भागामध्ये प्रामुख्याने कळवा खाडीवरील पुल, त्यापुढील कांदळवन क्षेत्रामध्ये स्टिल्ट वरील रस्त्याचे बांधकाम आणि बाळकुम येथील मेट्रो मार्गिका व ठाणे भिवंडी मार्ग ओलांडण्याकरीता उपाययोजना या कामांचा प्रामुख्याने समावेश आहे. या भागाकरीता प्रत्यक्ष बांधकाम खर्च रु. ६९४.५४ कोटी इतका असून यात वस्तू व सेवा कर (१८%), भाव वाढ (१०%), गौण खनिज, स्वामित्व मानधन, विमा, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे शुल्क आणि सेवा वाहिन्यांवरील खर्च या बाबी मिळुन एकूण सविस्तर अंदाजपत्रकीय किंमत रु. ८९७ कोटी इतकी आहे.

ब. टप्पा १ भाग २ : कोलशेत ते वाघबीळ (सा.क्र. ४/०५० कि.मी. ते सा.क्र. ६/८८०) लांबी २.८३ कि.मी.

या भागामध्ये प्रामुख्याने कोलशेत नौदल तळालगतच्या भुयारी मार्गाचे बांधकाम (जमिन व पाण्याखालून), भुयारी मार्गाच्या पोच रस्त्यांचे (Approaches) बांधकाम आणि काही भागांमध्ये नवीन रस्त्याचे बांधकाम यांचा समावेश आहे. या भागाकरिता प्रत्यक्ष सविस्तर अंदाजपत्रकीय किंमत रु. ४६८.७४ कोटी इतकी असून यात वस्तू व सेवा कर (१८%), भाव वाढ (१०%), गौण खनिज, स्वामित्व मानधन, विमा, प्रकल्प व्यवस्थापन शुल्क आणि सेवावाहिन्यांवरील खर्च या बाबी मिळुन एकूण खर्च रु. ६०८ कोटी इतका आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये नौदलासह झालेल्या करारानुसार त्यांनी सुचविलेल्या इतर कामांसाठी रु. १०० कोटी रकमेची तरतुद करण्यात आली आहे.

क. टप्पा १ भाग ३ : वाघबीळ ते गायमुख (सा.क्र. ६/८८० कि.मी. ते १३/३८४) लांबी ६.५०४ कि.मी.

या भागामध्ये प्रामुख्याने रस्त्याचे कामाचा समावेश असून नागला बंदर भागात पुल, भुयारी मार्ग तसेच पादचारी पुलाचा समावेश आहे. या भागाकरीता अंदाजपत्रकीय किंमत रु. ६०४.४१ कोटी इतकी असून यात वस्तू व सेवा कर (१८%), भाव वाढ (१०%), गौण खनिज, स्वामित्व मानधन, विमा प्रकल्प व्यवस्थापन शुल्क आणि सेवावाहिन्यांवरील खर्च या बाबी मिळुन एकूण अपेक्षित खर्च रु. ७९५ कोटी इतका आहे.

ड. टप्पा २ : खारेगाव, ठाणे - भिवंडी रस्ता आणि गायमुख येथील जंक्शन सुधारणा

दुसऱ्या टप्प्यामध्ये वाहतुकीच्या दृष्टीने सोयीस्कर अशा डाव्या व उजव्या वळण रस्त्यांची तरतुद करण्यात आलेली आहे. या टप्पाच्या बांधकामासाठी भुसंपादन आणि पर्यावरण व वन खात्याच्या परवानग्या आवश्यक आहेत. या परवानग्या प्राप्त करण्याची कार्यवाही ठाणे महानगरपालिका / प्राधिकरण यांचे मार्फत करण्यात येईल. या व्यतिरिक्त परीपूर्ण वाहतुक व्यवस्थेकरिता अपेक्षित Inter changes ची आखणी भविष्यात होणाऱ्या वाहतुक वर्दळी प्रमाणे करणे सोयिस्कर व्हावे म्हणुन त्याची तरतुद सध्या करण्यात आलेली नाही.

टप्पा २ चे काम, मुख्य रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर हाती घेणे प्रस्तावित असल्याचे नमुद करुन या अंतर्गत पुढील कामांचा समावेश आहे :

१) खारेगाव
   अ) खाडी किनारा मार्गावरुन नाशिक दिशेकडे जाण्यासाठी मुक्त डावे वळण
   ब) खाडी किनारा मार्गावरुन ठाणे दिशेकडे जाण्याकरीता यू आकाराचा पुल
   क) खाडी किनारा मार्ग ते शिळफाटा दिशेकडे जाण्याकरीता रस्ता

२) ठाणे -भिवंडी रस्ता येथे
   अ) खाडी किनारा मार्ग ते भिवंडी दिशेकडे जाण्याकरीता मुक्त डावे वळण
   ब) भिवंडी कडून खाडी किनारा मार्गावर गायमुख दिशेकडे जाण्याकरीता रॅम्प

३) गायमुख येथे घोडबंदर रस्ता जंक्शन सुधारणा

टप्पा २ करीता अंदाजपत्रकीय किंमत रु. २१२.४५ कोटी इतकी असून यात वस्तू व सेवा कर (१८%), भाव वाढ (१०%), गौण खनिज, स्वामित्व मानधन, विमा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क आणि सेवावाहिन्यांवरील खर्च या बाबी मिळून एकूण अंदाजे खर्च रु. २७४ कोटी इतका आहे.

वरीलप्रमाणे भागनिहाय कामांचा अंदाजे खर्च पुढीलप्रमाणे सादर केला,

| **भाग क्र.** | **स्थळ** | **अंदाजखर्च** |
|---|---|---|
| टप्पा १ भाग – १ | खारेगाव ते कोलशेत | रु. ८९७ कोटी |
| टप्पा १ भाग – २ | कोलशेत ते वाघबीळ | रु. ६०८ कोटी |
| टप्पा १ भाग – ३ | वाघबीळ ते गायमुख | रु. ७९५ कोटी |
| टप्पा २ | तीन ठिकाणी जंक्शन सुधारणा | रु. २७४ कोटी |
| | संरक्षण विभागासाठी तरतुद | रु. १०० कोटी |
| | **एकूण अंदाजे खर्च** | **रु. २६७४ कोटी** |

१५.६ प्राधिकरणाच्या दि. १६/११/२०२१ रोजी झालेल्या १५१ व्या बैठकीत ठाणे खाडी किनारा रस्त्याच्या प्रकल्पास व त्यास ढोबळ मानाने रु. १३१६.१८ कोटी या अंदाजपत्रकीय रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. तसेच सल्लागार नियुक्ती करुन त्यांचेमार्फत विविध सर्वेक्षणे व चाचण्यांवर आधारीत प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे सदर ठरावात नमूद होते. ठाणे महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार सद्यस्थितीत ६६% जमीन (कांदळवन जमीनीसहीत) ताब्यात आहे. सदर रस्ता प्रवेश नियंत्रित (Acces Control) राहणार असून या रस्त्यावर प्रत्यक्षात वापरण्यात येणाऱ्या अंतरानुसार वाहनांना पथकर लागू करण्याचे नियोजन आहे.

१५.७ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी उपरोक्त बाबींचे अवलोकन करुन, बाळकुम ते गायमुख या ठाणे खाडी किनारा मार्ग (ठाणे कोस्टल रोड) प्रकल्पाच्या बांधकामासाठी रु. २६७४/- कोटी (रु. दोन हजार सहाशे चौऱ्याहत्तर कोटी मात्र) अंदाजपत्रकीय रक्कमेचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत सुधारीत प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात आल्याचे सांगितले.

**१५.८ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६५१:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे बाळकुम ते गायमुख या ठाणे खाडी किनारा मार्ग (ठाणे कोस्टल रोड) वाहतुक नियंत्रित प्रकल्पाच्या बांधकामासाठी रु. २६७४/- कोटीच्या (रु. दोन हजार सहाशे चौऱ्याहत्तर कोटी मात्र) अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१६ : ओशिवरा जिल्हा केंद्र, गोरेगांव (पश्चिम) येथील एमएमआरडीए वसाहत ते एस.व्ही.रोड यांना जोडणारा वालभट व मजास नाला यांच्या संगमावरील पुलाच्या बांधकामाच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

१६.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सादरीकरण केले. प्राधिकरणाने सन १९७७ मध्ये प्रादेशिक विकासासंबंधिच्या धोरणानुसार पश्चिम उपनगरामध्ये जोगेश्वरी व गोरेगांव स्थानकामधील ओशिवरा या ठिकाणची जिल्हा केंद्र म्हणून निवड करण्यात आली. सन १९८१ मध्ये प्राधिकरणाने ओशिवरा जिल्हा केंद्र विकसित करण्याचा आणि त्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करण्याचा प्रस्ताव मंजूर केला. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६च्या कलम ४० च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने १९८२ मध्ये ओशिवरा जिल्हा केंद्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती केली.

१६.२ चर्चेस अनुसरून असे नमूद केले की, सध्या ओशिवरा जिल्हा केंद्र येथील अनेक निवासी व व्यावसायिक वसाहती मोठया प्रमाणावर निर्माण होत आहेत. तसेच सदर ठिकाणी प्राधिकरणामार्फत प्रकल्प बाधितांचे मोठया प्रमाणात पुर्नवसन करण्यात आले आहे. याकरिता, या परिसरात मुलभूत पायाभूत सुविधा जसे की, रस्ते, जलवाहिन्या, मल:निस्सारण वाहिन्या इत्यादी पुरविणे याबाबतची कामे टप्प्या टप्प्याने प्राधान्य क्रमाने अतिक्रमणरहित जागेत निविदा काढून हाती घेऊन पूर्ण करण्यात आलेली आहेत.

१६.३ सद्य:स्थितीत ओशिवरा जिल्हा केंद्र, राम मंदिर रेल्वे स्थानकापासून एस.व्ही.रोड जाण्याकरीता एकच मार्ग (राम मंदिर रस्ता) असल्याने तेथे वाहतुक कोंडी होत असते. याकरीता व तसेच स्थानिक लोकप्रतिनीधी यांची मागणी लक्षात घेता मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांचे मार्फत राम मंदिर रेल्वे स्थानक तसेच, एकंदरीत ओशिवरा जिल्हा केंद्र यांना एस.व्ही.रोडला जोडणाऱ्या ३०.०० मी. डी. पी. रस्त्यावरील वालभट व मजास नाला यांच्या संगमावरील पुलाचे काम करणे आवश्यक आहे.

१६.४ प्राधिकरणामार्फत ओशिवरा जिल्हा केंद्र ते एस.व्ही.रोड जोडणाऱ्या ३०.०० मी. डी.पी. रस्त्यावरील वालभट व मजास नाला यांच्या संगमावरील पुल बांधण्याकरीता पुलाचा आराखडा तयार करणे, अंदाजपत्रक बनविणे व बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आवश्यक शेरे प्राप्त करणे

व प्रत्यक्ष कामाच्या देखरेखीकरीता मे. माहिमतुरा कंन्सल्टंट या प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. प्रकल्प सल्लागार यांच्याकडून प्राप्त संरचनात्मक आराखडे तयार करण्यात येऊन मुंबई महानगरपालिकेस सादर करण्यात आले आहेत. सदर आराखड्यानुसार, रू.४८.१७ कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून सद्य:स्थितीत निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर प्रस्तावित पुलाची लांबी १५८.००मी. असून रुंदी ३०.००मी. आहे. पुलाचे बांधकाम हे मुख्यत: ओपन फाऊंडेशन प्रकारचे असून सदर पूल हा एस.व्ही.रोड येथील महापालिकेच्या पुलाशी जोडणारा परंतु, स्वतंत्र रचना असणारा आहे. तसेच प्रस्तावित पुलाच्या वालभट नाल्याच्या बाजूला टच पाईल्स, बॉक्स ड्रेन इत्यादी करण्याचे प्रस्तावित आहे.

**१६.५ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१६५२:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम १चे पोटकलम (१ चे पोटकलम (ग) व (आय)) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून प्राधिकरणाने "ओशिवरा जिल्हा केंद्र, गोरेगांव पश्चिम येथील एमएमआरडीए वसाहत ते एस.व्ही. रोड जोडणारा वालभट व मजास नाला यांच्या संगमावरील पुलाचे बांधकाम करण्याकरीता रू.४८.१७ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र.१७</u> : <u>मेट्रो मार्ग-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या प्रकल्पाचा विस्तार खडकपाडा मार्गे उल्हासनगर पर्यंत करण्याबाबत.</u>**

१७.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सादरीकरण केले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या १४१ व्या बैठकीत मेट्रो मार्ग- ५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या प्रकल्पास मान्यता देण्यात आली असून मंत्रिमंडळाच्या

दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या १५० व्या बैठकीत सदर प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मेट्रो मार्ग ५ (ठाणे- भिवंडी - कल्याण) या उन्नत मेट्रो मार्गाच्या उभारणीकरितारु. ८,४१७ कोटी किंमतीच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे. सदर मेट्रो प्रकल्पांसाठी शासनाने दिनांक. २१ डिसेंबर, २०१७ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिनांक. २६ जून, २०१९ रोजी सदर प्रकल्पास "महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प (Vital Urban Transport Project)" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल M/s D'APPOLONIA TATA Consulting Engineers Ltd. यांनी बनविला असून सदरच्या अहवालानुसार सदर प्रकल्पाची उन्नत मार्गिका कापूरबावडी, ठाणे येथून ठाणे- भिवंडी रस्त्याने भिवंडी शहरात राजीव गांधी चौक, भिवंडी येथून कल्याण रोड मार्ग राजनोली ते दुर्गाडी पर्यंत व त्यापुढे कल्याण शहरातून कल्याण शीळरोड मार्गे कल्याण APMC पर्यंत प्रस्तावित केली आहे.

१७.२ याबाबत अशी चर्चा झाली की, मेट्रो मार्ग -५ या प्रकल्पाचे काम दोन टप्यात करण्यात येत असून टप्पा -१ (ठाणे ते भिवंडी) मध्ये मार्गिके संबंधी तसेच पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी विशेष समस्या नसल्यामुळे सदर लांबीतील स्थापत्य कामे हाती घेण्यात आली आहेत. सदर प्रकल्पाच्या टप्पा- १ ची लांबी १२.७ कि. मी. असून एकूण ६ मेट्रो स्थानके आहेत. सदर लांबीतील स्थापत्य कामांकरिता Consortium of Systra-CEG-SMCIPL या सहभागी संस्थेची सामान्य सल्लागार (General Consultant) म्हणून दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी नेमणूक करण्यात आली आहे. M/s. AFCONS Infrastructure Ltd. यांना दिनांक ०९ ऑगस्ट, २०१९ रोजी स्थापत्य कामे करण्याकरिता कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. स्थापत्य कामांची दिनांक १४/०२/२०२३ पर्यंतची एकूण भौतिक प्रगती ७१.५९% आहे. तसेच सदर प्रकल्पाच्या टप्पा-१ मधील प्रणालीच्या कामांकरिता Consortium of Systra-MVA- Consulting (India) Pvt. Ltd. & Systra या सहभागी संस्थेची सामान्य सल्लागार (General Consultant) म्हणून दिनांक ३१ मे, २०२१ रोजी नेमणूक करण्यात आली आहे. तसेच रेल्वे डब्बे, विद्युत, सिग्नलींग इत्यादी

कामांकरीता Asian Infrastructure Investment bank (AIIB) व OPEC Fund for International Development (OFID) या बँकांकडून कर्ज मिळण्याबाबतचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाच्या उर्वरीत टप्पा -२ (भिवंडी ते कल्याण) मधील भिवंडी शहरामध्ये राजीव गांधी चौक ते साईबाबा मंदीर, टेमघर पर्यंत (सुमोर ३.५ कि. मी. लांबी) मध्ये मोठया प्रमाणात पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी समस्या असल्यामुळे सदर टप्यातील स्थापत्य कामास सुरूवात करण्यात आलेली नाही. सदर प्रकल्पाकरीता टप्पा -२ (भिवंडी ते कल्याण) मधील भिवंडी शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात पुनर्वसन व पुनर्वसाहत सबंधीच्या समस्या असल्यामुळे प्रधिकरणाच्या दि.२२/०२/२०२२ रोजी झालेल्या १५२ व्या बैठकीत मेट्रो मार्ग ५ (ठाणे -भिवंडी - कल्याण) या प्रकल्पामध्ये धामणकार नाका ते टेमघर मधील उन्नत मार्गिकेचे भूमिगत मार्गात बदल करण्यास प्रस्तावित करण्यात आले असून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

१७.३ चर्चेमध्ये असू नमूद केले की, सदरचा भुमिगत मेट्रो मार्गाचा प्रस्ताव दि.२५/०४/२०२२ रोजी शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला असून सदर प्रस्तावासंदर्भात शासनामार्फत दि.०६/०१/२०२३ रोजी नियोजन व वित्त विभागाच्या उपस्थित मुददयांवर अभिप्राय सादर करण्यास कळविले होते. त्या अनुषंगाने प्राधिकरणामार्फत दि. १०/०२/२०२३ रोजी सदरचा अभिप्राय शासनास सादर करण्यात आला आहे. सदर भूमिगत मेट्रो मार्गिकेच्या प्रस्तावास शासनाची लवकरच मंजूरी मिळणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाचा टप्पा-२ (भिवंडी - कल्याण) करीता सामान्य सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुद्धा प्रगतिपथावर आहे.

१७.४ याबाबत पुढे अशी सुध्दा चर्चा झाली की, मेट्रो मार्ग-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) मधील कल्याण शहराच्या लगत उल्हासनगर हे औद्योगिक शहर असून या शहरामध्ये देशाच्या व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विविध प्रकारचा माल निर्यात केला जात असतो. तसेच उल्हासनगर मध्ये महाराष्ट्रातील तसेच इतर भागातील व्यापारी विविध वस्तू तसेच कपडे, फर्निचर यासारखे अनेक प्रकारचे वस्तु खरेदी करण्यासाठी उल्हासनगर मध्ये मोठया प्रमाणात येत असतात. त्यामुळे मेट्रो मार्ग-५ चा विस्तार योग्य त्या Transit System द्वारे खडकपाडा मार्गे उल्हासनगर पर्यंत टप्प्याटप्प्याने (Phasewise) केल्यास नागरिकांना व व्यापारांना चांगल्या दर्जाचा आरामदायक दळणवळणाचा पर्याय उपलब्ध होईल.सदर प्रकल्पाचा विस्तार खडकपाडा मार्गे उल्हासनगर पर्यंत करण्याकरिता मा. मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच स्थानिक लोकप्रतिनिधिंमार्फत सुध्दा कळविण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी दोन

टप्प्यांमध्ये उल्हासनगर पर्यंत (अंदाजित ७.७ कि.मी.) केल्यानंतर भविष्यात सदर प्रकल्पाचा विस्तार अंबरनाथ – बदलापूर (पश्चिम) पर्यंत करणे सुद्धा शक्य होईल.

१७.५ मेट्रो मार्ग-५ या प्रकल्पाचा विस्तार योग्य त्या Transit System द्वारे खडकपाडा मार्गे उल्हासनगर पर्यंत करण्याकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य त्या Transit System द्वारे तात्काळ करण्याकरिता सदर मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

**१७.६ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र.१६५३:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीमध्ये दिलेल्या प्रस्तावानुसार खालील बाबींस मान्यता देत आहे.

१. मेट्रो मार्ग-५ (ठाणे- भिवंडी- कल्याण) या प्रकल्पाचा विस्तार योग्य त्या Transit System द्वारे खडकपाडा पर्यंत टप्पा-१ मध्ये आणि उल्हासनगर पर्यंत टप्पा-२ मध्ये करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

२. उल्हासनगर पर्यंत सदर प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य त्या Transit System द्वारे तात्काळ करण्याकरिता सदर मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**बाब क्र.१८ : <u>रायगड जिल्ह्यामध्ये "मुंबई पारबंदर प्रकल्प ते मुंबई पुणे द्रुतगती मार्ग" असा थेट जोडरस्ता व त्या संलग्न कामाच्या सुधारित किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत</u>**

१८.१ महानगर आयुक्त यांनी सदर बाब टिप्पणी संदर्भात माहिती देताना असे सांगितले की, मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर असून पॅकेज-१, २ व ३ यांची सद्य:स्थितीत एकत्रित प्रत्यक्ष कामाची प्रगती ९२ % पूर्ण झाली आहे. प्रकल्पाची आर्थिक प्रगती सुमारे ८९% झाली असून सदर प्रकल्पाचे बांधकाम सप्टेंबर, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

१८.२ चर्चेस अनुसरून राष्ट्रीय महामार्ग-३४८ वरुन न्हावा-शेवा बंदराकडे ये-जा करणारी अवजड वाहनांची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे चिर्ले येथील आंतरबदल ठिकाणी मुंबई पारबंदर मार्गावरुन ये-जा करणारी वाहतूक राष्ट्रीय महामार्ग-३४८ वर उतरल्यानंतर तेथे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई -पुणे द्रुतगती मार्गापर्यंत पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे बाबतची आवश्यकता आहे.

१८.३ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. २८/०२/२०२२ रोजी झालेल्या १५२व्या बैठकीमधील ठरावानुसार रायगड जिल्हयामध्ये मुंबई पारबंदर प्रकल्प ते मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग असा थेट जोडरस्ता तसेच चिर्ले येथील उर्वरीत आंतरबदलाचे व सेवारस्त्याचे काम करणेसाठीची रक्कम ₹ ९४७.२५ कोटीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल कन्सलटंट प्रा.लि., या सल्लागार कंपनीकडून तयार करून घेण्यात आला आहे.

१८.४ महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी दि. १४/०९/२०२२ रोजी सदर कामाची आढावा बैठक घेतली. मे. टेक्नोजेम कन्सल्टंट्स प्रा.लि. यांनी चिर्ले बाजूला पर्यायी संरेखन ४ आणि पळस्पे बाजूला पर्यायी ३ संरेखन सादर केले आहेत. वरील बैठकीत चिर्ले स्थानासाठी पर्यायी संरेखन २- (४.५० किमी) आणि पळस्पे स्थानासाठी पर्यायी संरेखन -१ (२.० किमी लांबी) मंजूर करण्यात आले आहे. मुंबई -पुणे द्रुतगती मार्गापर्यंत पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणेची आवश्यकता लक्षात घेऊन खालील प्रमाणे पर्यायी मार्ग ठरविण्यात आले.

१. सदर मंजूर पर्यायांनूसार राष्ट्रीय महामार्ग-३४८ वर चिर्ले ते गव्हाण फाटा असा ४.५ किमी लांबीचा ६ पदरी उन्नत रस्ता प्रदान करण्याचा प्रस्ताव आहे. सदर उन्नत मार्गावरून मुंबई पारबंदर प्रकल्पाची वाहतूक राष्ट्रीय महामार्ग-३४८ वर गव्हाण फाटा येथे उतरते आणि पुन्हा राष्ट्रीय महामार्ग-३४८ पळस्पे गावापर्यंत वापरते.

२. पळस्पे ते मुंबई पुणे द्रुतगती मार्गापर्यंत २ किमीचा ६ पदरी उन्नत रस्ता प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर प्रकल्पामध्ये २ रेल्वे वरील पुल, २ आंतरबदल आणि ५.५० हेक्टर भूसंपादनाचा समावेश आहे

१८.५ प्रकल्प सल्लागाराने सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. त्यानुसार असे निदर्शनास आले की, सदर कामासाठी अंदाजित खर्च रू.१४२० कोटी येणार आहे. उपरोक्त नमुद केलेल्या बाबींचा ढोबळमानाने काढलेल्या अंदाजे रकमेचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-

| **अ.क्र** | **बाबीचे वर्णन** | **अंदाजे रक्कम (₹ कोटी)** |
|---|---|---|
| १ | चिर्ले येथून मुंबई पारबंदर मार्ग ते रा.मा.क्र. ३४८ च्या मध्य भागातून ४.५ कि.मी. लांबीचा नवीन ३+३ मार्गीकेचा उड्डाण पूल बांधणे + रेल्वे वर पुल बांधणे व सेवा रस्ते बांधणे. | ६५३.०० |
| २ | रा.मा. ४८ वरील पळस्पे पासून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गा पर्यंत उड्डाण पुल बांधणे + रेल्वे वर पुल बांधणे – २ कि.मी. | ४००.०० |
| ३ | एकूण स्थापत्य किंमत | १०५३.०० |
| ४ | सेवा व वस्तुकर १८% | १८९.५० |
| ५ | कामगार विमा खर्च १% | १०.५३ |
| ६ | सेवावाहिन्या स्थलांतर करणे ९% | ९४.७७ |
| ७ | भूसंपादन | ३३.०० |
| ८ | देखभाल दुरुस्ती ३.७५% | ३९.४८ |
| | **एकूण** | **१४२०.००** |

वरील रक्कमेत झालेली वाढ ही खालील बाबींमुळे झाली आहे.

१. रेल्वेच्या नवीन मार्गदर्शक तत्वानुसार रेल्वेवरील उडडाणपुलाच्या स्टील मध्ये साध्या स्ट्रक्चरल स्टील केल्याने अंदाजे रु . १५० कोटीची वाढ झाली .

२. वस्तु व सेवा करात जुलै मध्ये १२ टक्के वरुन १८ टक्के वाढ झाल्याने कामाच्या किंमतीत रु. ५० कोटीची वाढ झाली.

३. इपीसी तत्वावर निवीदा काढण्याचे ठरविण्यात आले असून त्यात कामाच्या मागील किंमतीत ४ टक्के दराने या प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती १० वर्षासाठी करण्याचे प्रस्तावीत केले असल्याने रु. ४० कोटी इतकी वाढ झाली.

४. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत प्राप्त झालेल्या सुचनेमुळे इतर बाबींसाठी जवळपास रु. २०० कोटीची वाढ झाली जसे की, सेवा रस्त्याचे काम पुलांची लांबी व उंची वाढणे इत्यादी.

बाब टिप्पणीत नमूद केलेल्या बाबीच्या अनुषंगाने चर्चेअंती, चिर्ले येथील आंतरबदल ठिकाणी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता तसेच मुंबई पारबंदर मार्गाला, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गापर्यंत जोडणे बाबतची आवश्यकता लक्षात घेऊन सदर कामाच्या सुधारीत खर्चास रू. १४२० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मंजुरी देऊन खालील प्रमाणे ठराव मंजूर केला.

**१८.६ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पण्णीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६५४:**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे रायगड जिल्हयामध्ये मुंबई पारबंदर प्रकल्प ते मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग असा थेट जोडरस्त्याचे काम करणेकरीता खालील बाबी राबविण्यास अधिकार प्रदान करण्यात येत आहेत तसेच सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | बाबीचे वर्णन | अंदाजे रक्कम (₹ कोटी) |
|---|---|---|
| १ | मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग ते मुंबई पारबंदर प्रकल्प चिर्ले जंक्शन पर्यंत जोडण्यासाठी, उन्नत मार्ग बांधणे (रा.म.-४८ पासून सा.क्र. १०५/४०० कि.मी. ते १०८/१५० आणि रा.म.-३४८ १२/५०० कि.मी. ते १७/१०० कि.मी.) | १४२० |
| | **एकूण ₹** | **१४२०** |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही योग्य त्या फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र.१९ : मुंबई पारबंदर प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मरी आई संस्थेने केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने मच्छिमार नुकसान भरपाई धोरणाच्या अंतर्गत**

१९.१ महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाविषयी माहिती देतांना असे सांगितले की,मुंबई पारबंदर (MTHL) प्रकल्पामध्ये मुंबई शहरातील शिवडी व नवी मुंबईतील चिर्ले यांना जोडणाऱ्या २२ कि.मी. लांबीच्या ६ पदरी (३+३ मार्गिका) पुलाचा अंतर्भाव आहे. या पुलाची समुद्रातील लांबी सुमारे १६.५ कि.मी. असून जमिनीवरील पुलाची (Land via duct) लांबी सुमारे ५.५ कि.मी. इतकी आहे. या पुलाला मुंबई शहरातील शिवडी येथे आणि नवी मुंबईतील शिवाजी नगर येथे व राष्ट्रीय महामार्ग -४ ब वर चिर्ले गावाजवळ आंतरबदल (Interchange) आहेत. मुंबई पारबंदर प्रकल्पाची अमंलबजावणी जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्था (जायका) (Japan International Corporation Agency -JICA) या संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन इंजिनिअरींग-प्रोक्युरमेंट-कन्स्ट्रक्शन (डिझाईन-बिल्ड) (EPC-Design Build) पध्दतीने कार्यान्वित आहे. जायकाने मुंबई पारबंदर प्रकल्पाचे बांधकाम एकूण ४ भागांमध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यापैकी ३ स्थापत्य भागास कामाचे कार्यारंभ आदेश (Civil works) कंत्राटदारांना दि. २३ मार्च, २०१८ रोजी देण्यात आले आहेत. मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर असून पॅकेज- १, २ व ३ यांच्या एकूण सद्य:स्थितीत प्रत्यक्ष कामाची प्रगती ९२% पूर्ण झाली आहे. तर पॅकेज - ४ चे कामाचे कार्यारंभ आदेश दि.०५.०५.२०२२ रोजी कंत्राटदारास देण्यात आले आहे व काम प्रगतीपथावर आहे.

१९.२ चर्चेच्या अनुषंगाने प्रकल्पासाठी केलेल्या अभ्यासादरम्यान, असे आढळून आले आहे की, पुलाच्या बांधकामादरम्यान आणि पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, मुंबई पारबंदर प्रकल्पांतर्गत पुलाच्या संरेखनाच्या परिसरातील मासेमारीच्या क्रियाकल्पांवर काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो. महाराष्ट्रात यापूर्वी मच्छिमारांच्या नुकसानभरपाईचे कोणतेही धोरण नव्हते. समन्वय समितीच्या अधिन राहुन तीन वेगवेगळया बैठकी आयोजित केलेल्या होत्या ज्यामध्ये प्राधान्याने मच्छिमार व इतर भागधारकांना बोलविण्यात आले होते. सदर बैठकीत मच्छिमार नुकसान भरपाई धोरणाबाबत संपुर्ण माहिती देऊन मच्छिमार समाजाकडून व इतर भागधारकाकडून लेखी व मौखीक सुचना मागविण्यात आल्या होत्या. तसेच हे प्रस्तावित नुकसान भरपाई धोरणाला मान्यता असल्याचे संबंधितांनी मान्य केले होते.

अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भरपाई धोरणानुसार मच्छिमार लोकांच्या श्रेणी.

| भरपाईचा संकेत क्र. | भरपाईचे प्रमाण | भरपाईचा प्रकार |
|---|---|---|
| सी 1 | कायमस्वरूपी | प्रकल्पाच्याआखणी मध्ये येणारे मासेमारीचे खांब (सस) आणि जाळी काढल्यामुळे मासेमारी आणि उपजीविकेचे नुकसान |
| सी 2 | कायमस्वरूपी | मत्स्य उत्पादनामधे घट आणि समुद्र प्रवाहातहोणारे बदल त्यामुळे उत्पादनामध्ये कायमचे नुकसान |
| सी 3 | कायमस्वरूपी | उदरनिर्वाहासाठी हाताने मासेमारी व इतर जलचर प्राणी पकडणाऱ्या मच्छीमार बांधवांचा प्रतिबंधीत क्षेत्रामुळे आकुंचित झालेले कार्यक्षेत्र |
| सी 4 | तात्पुरती | पारबंदर-जोडमार्गाच्या बांधकामाच्या काळात राहत्या ठिकाणापासून मासेमारीच्या ठिकाणी पोचण्यासाठी लागणारा अधिकचा काळ आणि इंधनावर होणारा वाढीव वाहतूक खर्च |
| सी 5 | तात्पुरती | बांधकामाच्या काळात वाढलेल्या गढूळपणामुळे कमी झालेले मत्स्य उत्पादन |
| सी 6 | प्रासंगिक | बांधकामाच्या काळातील पडावांच्या, बोटींच्या, मशीन, मालवाहतूक, माणसांच्या कामाच्या क्षेत्रातील, धक्क्यांजवळील, कास्टिंग यार्ड, कामगार वस्ती येथील वर्दळीमुळे मासेमारीच्या बोटींचे आणि जाळ्यांचे झालेले नुकसान |

टीप: तीन वर्षांच्या कालावधीत ६०%:२०%:२०% या प्रमाणात तीन हप्त्यांमध्ये मॉनिटरी भरपाई देण्याचे प्रस्तावित आहे.

सदर विषयास अनुसरुन समितीने मासेमारी व्यवसायाबाबत नुकसान भरपाईसाठी पात्र असलेल्या अजर्दारास खालील नियमावली घोषित केली आहे:

i. मत्स्यव्यवसाय विभागाने जारी केलेले TF, BO च्या संदर्भात बायोमेट्रिक कार्ड.

ii. मत्स्यव्यवसाय विभागाद्वारे नोंदणीकृत नौकांची कागदपत्रे (फॉर्म २/४/५).

iii. मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे सन २०१६ पूर्वीचे सदस्य

iv. सीएमएफआरआयने केलेल्या मच्छिमारांच्या सर्वेक्षणात नोंद करणे.

v. वरीलपैकी कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्यास संबंधित तालुका तहसीलदार / गटविकास अधिकारी यांनी दिलेले मासेमारी व्यवसायाचे प्रमाणपत्र व सद्यस्थितीत या क्षेत्रामधील नुकसान भरपाई अर्जदारास वरीलपैकी कोणतेही एक प्रमाणपत्र असल्यास सर्व प्रकल्पग्रस्त मच्छिमार पात्र लाभार्थांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नुकसान भरपाई मंजुर करण्यात आलेली आहे.

vi. तसेच समन्वय समितीच्या ५व्या बैठकीत कुटुंब या शब्दाची व्याख्या विशाल करुन केवळ एक रेशन कार्ड एक कुटुंब असे न धरता कुटुंबातील १८ वर्षावरील विवाहित मुलांना व त्यांच्या १८ वर्षाखालील मुलांसाठी वेगळे कुटुंब म्हणुन मान्यता देण्यात आली. यामुळे नुकसान भरपाईची व्याप्ती कितीतरी वाढली व जास्तीत जास्त कुटुंबांना नुकसान भरपाईचा लाभ घेता आला.

१९.३ दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत नुकसान भरपाई रक्कम जमा करण्यात आलेल्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| एकुण (प्रभाव क्षेत्र + प्रभाव नसलेले क्षेत्र ) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्णन | एकुण प्राप्त अर्ज | डुप्लिकेट मध्ये अर्ज | एकुण अर्ज | एकूण मंजूर अर्ज | | | | **अपात्र अर्ज** |
| | | | | C१ | C२ | C३ | एकुण | |
| प्रभाव क्षेत्र | १५०९७ | २४२८ | १२६६९ | २३२ | ८६४ | ५५४९ | ६६४५ | ६०२४ |
| प्रभाव नसलेले क्षेत्र | ५७४४ | ० | ५७४४ | ० | १२४ | ० | १२४ | ५५२२ |
| | **२०८४१** | **२४२८** | **१८४१३** | **२३२** | **१०८६** | **५५४९** | **६८६७** | **११५४६** |

भरपाईच्या वितरणाची स्थिती :

| **अ.क्र** | **श्रेणी** | एकुण मंजूर अर्ज | प्रति व्यक्ती एकुण नुकसानभरपाईची रक्कम ₹ | एकुण देय रक्कम ₹ | आजपर्यंत पैसे दिले | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १st in (६०%) | | २nd (२०%) | | ३rd (२०%) | |
| | | | | | no.of PAP | रक्कम ₹ | no.of PAP | रक्कम ₹ | no.of PAP | रक्कम ₹ |
| १ | C१ | २३२ | ६२९४७९ | १४६०३९१२८ | २२८ | ८३११६०६५ | १३४ | १६९९२६९२ | १३४ | १६९९२६९२ |
| २ | C२ | ७६१ | ३१७३५६ | ३१३८६५०८४ | ५१८ | ९९४२०४६८ | ३०२ | १९३४५७६८ | ३०२ | १९३४५७६८ |
| ३ | C३ | ५५३२ | ३१७३५६ | १७६१००८४४४ | ५०८५ | ९६९६१८१४३ | ३५८४ | १०८७०६३१३ | ३५८४ | १०८७०६३१३ |
| Grand Total | | ६५२५ | | २२२०९१२६५६ | ५८३१ | ११५२१५४६७६ | ४०२० | १४५०४४७७३ | ४०२० | १४५०४४७७३ |

| | |
|---|---|
| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे मत्स्यव्यवसाय विभागाकडे वितरित केलेली रक्कम | रू.१९०,६०,३४,०८२/- |
| मत्स्यव्यवसाय विभागाने वापरलेली रक्कम | रू. १७२,४०,६०,५१५/- |
| मत्स्यव्यवसाय विभागाकडे शिल्लक रक्कम | रू. १८,१९,७३,५६७/- |

१९.४ चर्चेस अनुसरून असे नमूद करण्यात आले की, मरी आई संस्थेने प्राधिकरणाकडे नुकसान भरपाईसाठी वारंवार पाठपुरावा करीत आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (MTHL) प्रकल्प ठाणे खाडीच्या मुखाशी असून सर्व १० गावे बाधित मानली जातील, असे मरिआई संस्थेने प्रतिनिधित्व केले होते. १२२६ मच्छिमारांची यादी तहसीलदार, ठाणे यांनी तयार केली होती व ती सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, ठाणे-पालघर यांना सादर करण्यात आली होती. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, ठाणे यांनी यादीची पडताळणी केली असता ३० मच्छीमार आता जिवंत नसल्याचे आढळून आले आहे आणि १६ मच्छिमार शासकीय सेवेत आहेत. त्यामुळे उर्वरित ११८० मच्छीमारांची यादी प्रादेशिक संचालक मत्स्यव्यवसाय, मुंबई यांच्यामार्फत एमएमआरडीएकडे पाठविण्यात आली. त्यानंतर या यादीतील ११५८ मच्छिमारांचे अर्ज विहित मुदतीत एमएमआरडीएकडे प्राप्त झाले आहेत.

१९.५ प्रभाव क्षेत्राबाहेरील नुकसान भरपाईच्या धोरणाचा तपशिल देताना असे सांगितले की, राज्याच्या किनारी व खाडी भागामध्ये पुर्वा पार पासुन नैसर्गिकरित्या मत्स्यसाठा उपलब्ध आहे व या भागात राहत असलेले लोक हे या जल क्षेत्रामध्ये मासेमारी करुन आपला उदरनिर्वाह करत असतात, ही वस्तुस्थिती आहे.

महामुंबईच्या विकासामुळे १९५० पासुनच समुद्रावरती व खाड्यांवरती प्रदुषणाचा प्रभाव होत राहिला आहे. ठाणे बेलापुर व ठाणे ते चेंबुर या पट्टयातील रासायनिक व औद्योगिक कारखान्यांमुळे मोठ्या प्रमाणात जलप्रदुषण होत राहीले आहे. तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे देखील मोठ्या प्रमाणात मल:निसारण होऊन ठाणे खाडीतील पाण्याची गुणवत्ता अनेक वर्षांपासुन खालावलेली आहे. मत्स्यव्यवसाय तज्ज्ञ व मत्स्यव्यवसाय आयुक्त यांनी १२ व्या मत्स्यव्यवसाय समन्वय समितीच्या (FCC) बैठकीत असे मत मांडले होते की, १९७५ पासून भारतातील मासे पकडण्याचे प्रमाण कमी होत आहे आणि विशेषत: ठाणे खाडीमध्ये मासे पकडण्याचे प्रमाण कमी होत आहे आणि एका लहान अभ्यासाच्या आधारे मासे कमी होण्याचे कारण सांगणे कठीण आहे.

१९.६ दिनांक ४ जून, २०२१ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) १२व्या समन्वय समितीची बैठक येथे आयोजित करण्यात आली होती, नुसार मरी आई मच्छीमार संस्था, वाशी ही ठाणे खाडीलगत असलेल्या ठाणे जिल्ह्यातील १० मच्छिमार गावांतील सदस्यांचे प्रतिनिधित्व करते. १० गावांपैकी ३ गावे दुय्यम प्रभाव क्षेत्रामध्ये (बेलापूर गाव, सारसोळे आणि करावे) व उर्वरित ७ मच्छिमार गावे हे प्रभाव क्षेत्राबाहेर आहेत (वाशीगाव, घणसोली, दिवा कोळीवाडा, कोपर खैरणे, जुहुगाव, तळवली/गोठवली आणि सानपाडा गाव). त्यामुळे या ७ गावांमधील C३ श्रेणीतील (हात मच्छिमारी) मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (MTHL) प्रकल्पात भरपाई मिळण्यास पात्र नाहीत कारण पूर्वी घोषित केलेल्या प्रभाव क्षेत्राच्या पलीकडे मासेमारीवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. मरीआई संस्थेकडून प्राप्त अर्जाचा तपशिल खालीलप्रमाणे:

**अ: प्रभाव क्षेत्रांतर्गत येणारी गावे:**

| अ. क्र | गावाचे नाव | एकुण प्राप्त अर्ज | डुप्लीकेट अर्ज | एकुण अर्ज | एकुण मंजुर अर्ज | | | एकुण | अपात्र अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | C१ | C२ | C३ | | |
| १ | बेलापुर | ११० | ५ | १०५ | ० | ५ | १५ | २० | ८५ |
| २ | सारसोळे | २६६ | १८ | २४८ | ० | ३० | ८३ | ११३ | १३५ |
| ३ | करावे | १७८ | ० | १७८ | ० | ४४ | ६७ | १११ | ६७ |
| | एकुण | ५५४ | १८ | ४२६ | ० | ७९ | १६५ | २४४ | २८७ |

**आ: प्रभाव क्षेत्राबाहेरील गावे:**

| अ. क्र | गावाचे नाव | एकुण प्राप्त अर्ज | C१ श्रेणी | C२ ACF व्दारे प्रमाणित | एकुण मंजुर | अपात्र अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दिवा-कोळीवाडा | १२२ | ० | ० | ० | ११० |
| २ | घनसोळी | ३४० | ० | १५ | १५ | ३१० |
| ३ | तळवली | ५४ | ० | ० | ० | ५२ |
| ४ | कोपर खैराणे | २४५ | ० | १ | १ | २४० |
| ५ | वाशी गाव | २५६ | ० | २५ | २५ | २०५ |
| ६ | जुहुगाव | २०१ | ० | ३ | ३ | १९४ |
| ७ | सानपाडा | २५ | ० | ० | ० | २५ |
| | एकुण | १२४३ | ० | ४४ | ४४ | ११३६ |
| | एकुण (**अ + आ**) | १७९७ | ० | १२३ | १२३ | १४२३ |

मरीआई संस्थेकडुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (MSRDC) ठाणे खाडी पूल III ("TCB III") या प्रकल्पांतर्गत सुद्धा नुकसान भरपाईसाठी अर्ज भरण्यात आलेले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडे संपर्क साधलेल्या या ०७ गावांपैकी ५ गावे

(घणसोली, दिवागाव, कोपरखैरणे, जुहूगाव, वाशी गाव) तीच आहेत जी TCB III प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा(MSRDC) चे अनुसरण करत आहेत तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र . | गावाचे नाव | एकुण प्राप्त अर्ज | C१ श्रेणी | C२ ACF व्दारे प्रमाणित | एकुण मंजुर | अपात्र अर्ज | MSRDC ने मंजूर केलेला अर्ज | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दिवा-कोळीवाडा | १२२ | ० | ० | ० | १२२ | ६९ | ५३ |
| २ | घनसोळी | ३४० | ० | १५ | १५ | ३२५ | १९३ | १३२ |
| ३ | तळवली | ५४ | ० | ० | ० | ५४ | १३ | ४१ |
| ४ | कोपर खैराणे | २४५ | ० | १ | १ | २४४ | १२६ | ११८ |
| ५ | वाशी गाव | २५६ | ० | २५ | २५ | २३१ | १३६ | ९५ |
| ६ | जुहुगाव | २०१ | ० | ३ | ३ | १९८ | १५६ | ४२ |
| ७ | सानपाडा | २५ | ० | ० | ० | २५ | ० | २५ |
| | **एकुण** | **१२४३** | **०** | **४४** | **४४** | **११९९** | **६९३** | **५०६** |

१९.७ प्राधिकरणाने तांत्रिक बाबींचे पुनरावलोकन करण्यासाठी आणि ठाणे खाडीवरील मासेमारीवर MTHL बांधकामाचा परिणाम करण्यासाठी मत्स्यपालन तज्ञ समिती (FEC) स्थापन केली असून, मरी आई संस्थेची ७ (वाशीगाव, घणसोली, दिवा कोळीवाडा, कोपर खैरणे, जुहुगाव, तळवली/गोठवली आणि सानपाडा गाव) गावे पुलाच्या संरेखनापासून ५ कि.मी. अंतरावर वसलेली आहेत जिथे गढूळपणा, कंपने आणि समुद्राच्या पाण्याचे प्रवाह यावर प्रभाव कमी आहे. त्यामुळे मरी आई संस्थेसाठी प्रभाव क्षेत्र वाढविल्यास प्रभाव क्षेत्राबाहेरील मरी आई संस्थेतील ७ गावांसह एकूण २७ गावे (तळवली, कोपरखैरणे, नेरुळ, वाशीगाव, शहाबाज, फणसपाडा, जुहूगाव, तरघर, वाघिवली, बामवी, सानपाडा, दिवा कोळीवाडा, घणसोली, ऐरोली, गोठवली, घारापुरी, नविन शेवा, नवघर ,कोपरी, सोनारी, कुंडेगाव, केळवणे, टाकीगाव, विंधणे, दिघोडे, बोनकोडे, पाणजे) नुकसान भरपाईसाठी पात्र होतील, त्यामुळे प्राधिकरणावर अतिरीक्त आर्थिक बोजा पडेल.

प्रभाव क्षेत्राबाहेरील मरी आई संस्थेअंतर्गत येणारी गावे नुकसान भरपाईकरीता घेण्यासाठी मुंबई पारबंदर प्रकल्पाचे प्रभाव क्षेत्राचे अंतर १२ कि.मी. पर्यंत वाढवावे लागेल, व त्याअन्वये प्रभाव क्षेत्राबाहेरील प्राप्त झालेल्या १२२६ मरीआई संस्थाधारकांचा अर्जांसह एकुण ३६४२ अर्जांचाही विचार करावा लागेल.

चर्चेच्या दरम्यान मुख्य सचिव यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय मत्स्यपालन नुकसान भरपाई धोरण तयार केले आहे. सदर धोरणामार्फत मरी आई संस्थेच्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देता येईल का? अशी विचारणा केली. चर्चेदरम्यान असे सांगण्यात आले की, मुंबई पारबंदर प्रकल्प मत्स्यपालन धोरण महाराष्ट्र शासन मत्स्यपालन धोरणापूर्वी अंतिम करण्यात आले होते, त्यामुळे मरी आई संस्थेसाठी नवीन राज्यस्तरीय धोरण लागू करता येणार नाही. मरी आई संस्थेच्या मच्छीमारांच्या मागणीचा अभ्यास करण्यासाठी नगर विकास विभाग, मत्स्य विभाग व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची एकत्रित समिती गठित करण्यात यावी असे ठरले.

**१९.८ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६५५:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मरी आई संस्थेच्या मच्छीमारांच्या मागणीचा अभ्यास करण्यासाठी नगर विकास विभाग, मत्स्य विभाग आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची एकत्रित समिती गठित करण्यास मान्यता देण्यात देत येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र.२० : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणुकीचा अहवाल दिनांक ०१ जुलै, २०२२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२२**

२०.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने दि. १ जुलै, २०२२ ते दि. ३१ डिसेंबर, २०२२ दरम्यान केलेल्या गुंतवणूक अहवालासंबंधी माहिती दिली. त्यानंतर दि. १ जुलै, २०२२ ते दि. ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

..६९/-

**बाब क्र.२१ : वांद्रे-कुर्ला संकुल येथील "जी ब्लॉक" मधील**
**अ) ले-आऊटमधील मनोरंजनासाठीची जागा (LOS) आर.जी.-२३-अ व आर.जी.-२३-ब या (अंदाजे ८.३७ हे.) भूखंडाच्या विकासाकरीता Design, Finance, Built, Operate & Transfer (DFBOT) तत्त्वावर व**
**ब) आर.जी.-६ व टेकडी (Hills) या (अंदाजे २.४७ हे.) पब्लिक ओपन स्पेसचा (POS) विकास व देखभाल करण्यासाठी ई निविदेद्वारे ३० वर्षांसाठी एजन्सीची नियुक्ती करणेबाबत...**

**२१.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सादरीकरण करुन प्राधिकरणास खालीलप्रमाणे अवगत केले :-**

१.१ शासनाने अधिसूचना क्र. बीकेआर-११७७/२६२ दिनांक ७ मार्च, १९७७ अन्वये या प्राधिकरणाची वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नेमणूक केली आहे. प्राधिकरणाने या क्षेत्रासाठी बनविलेल्या नियोजन प्रस्तावांना व विकास नियंत्रण नियमावलीला शासनाने अधिसूचना क्र. बीकेआर-११७७/२६२ दिनांक ०९ एप्रिल, १९७९ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.

शासनाने मंजूरी प्रदान केलेल्या वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर नियोजन प्रस्तावानुसार वांद्रे-कुर्ला संकुलाचे ए, बी, सी, डी, इ, एफ, जी, एच, आय् ब्लॉक होते. यापैकी शासनाच्या विविध अधिसूचनेनुसार मंजूरी दिलेल्या फेरबदलांनुसार सध्या वांद्रे-कुर्ला संकुलाचे क्षेत्र २५० हे. एवढे असून त्यात बी, सी, डी, डी-१, ई, एफ्, जी व आय् या ब्लॉकचा समावेश आहे. या ब्लॉकपैकी "इ" व "जी" ब्लॉकमधील जमीन शासनाने प्राधिकरणास भाडेपट्टयाने दिली आहे. या जमिनीचे वाटप हे प्राधिकरण मंजूर नियोजन प्रस्तावाच्या तपशीलवार आराखड्यानुसार करीत असते. वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेळोवेळी अंमलात असलेला विकास नियंत्रण नियमावलीनुसार वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये विकास अनुज्ञेय आहे.

१.२ प्रधिकरणाने यापुर्वी वांद्रे-कुर्ला संकुल येथील ई-ब्लॉकमधील मनोरंजनासाठीची (आर.जी.) जागा सिटी पार्क म्हणून व धारावी येथील मिठी नदीला लागून असलेली एच् - ब्लॉकमधील मनोरंजनासाठीची (आर.जी.) जागा महाराष्ट्र नेचर पार्क म्हणून विकसित केली आहे. (सध्या महाराष्ट्र नेचर पार्क हे प्राधिकरणाच्या विशेष नियोजन कक्षेत येत नसून ते शासनाच्या दिनांक २५ जून, २००९ रोजीच्या अधिसूचनेद्वारे धारावी पुर्नविकास प्राधिकरणाच्या विशेष नियोजन क्षेत्रात येते).

तसेच, यापुर्वी प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुल येथील "जी" ब्लॉकमधील मनोरंजनासाठीच्या (आर.जी.) जागा विविध संस्थामार्फत (एजन्सीमार्फत) विकसित केल्या आहेत. (उदा. आर.जी. – १ए जियो गार्डन, आर.जी.-२ मुंबई क्रिकेट असोसिएशन क्रिकेट ॲकेडमी). तर काही आर.जी. चे भूखंड तात्पुरत्या तत्वावर देखभालीसाठी दिले आहेत. शाळांना लागून असणारे आर.जी. चे भूखंड खेळाचे मैदान म्हणून वितरीत केलेले आहेत. सदर मनोरंजनाच्या जागा (आर.जी.) विकसित झाल्यामुळे शहर पातळीवर मनोरंजनासाठीच्या व खेळासाठी सोयी-सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

१.३ वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार या क्षेत्रासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेळोवेळी मंजूर केलेली विकास नियंत्रण नियमावली अनुज्ञेय आहे. या मंजूर नियमावलीनुसार RG च्या भूखंडावर, भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या १५% बांधकाम क्षेत्र हे खेळासाठी व मनोरंजनासाठी अनुज्ञेय आहे.

१.४ प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुल येथील "जी" ब्लॉकमधील आर.जी. -६, आर.जी.-१९ व आर.जी.-२३ या भूखंडावर बगिचा विकसित करण्यासाठी वास्तुविशारदामार्फत संकल्पचित्र बनविले होते व त्यास दिनांक २० जुलै, २०१३ रोजी सी.आर. झेड. ची मंजूरी प्राप्त करुन घेतली होती. त्यानंतर या आर्.जी. प्रत्यक्ष विकसीत करण्यासाठी विविध संस्थाकडून प्रस्ताव मागितले होते, मात्र त्यास अपेक्षित प्रतिसाद प्राप्त झाला नाही.

१.५ प्राधिकरणाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीतील बाब क्र.१७ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुल येथील "जी" ब्लॉकमधील आर.जी.-६, आर.जी -१९ व आर.जी.-२३ या भूखंडाच्या सुशोभिकरणासाठी "मे. केअर फाऊंडेशन" यांना बीकेसी प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशन यांचेसह सदर भूखंड वाटप करण्याकरीता काही अटी व शर्ती वर मान्यता दिली होती. तथापि, मे. केअर फाऊंडेशनसह मे. बीकेसी प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशन यांनी सदर सुशोभिकरणाबाबत प्राधिकरणाशी करार केला नसल्याने व त्यासंबंधी प्राधिकरणाच्या स्मरणपत्राचेही उत्तर दिले नसल्याने मे. केअर फाऊंडेशनसह मे. बीकेसी प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशन सदर सुशोभिकरण प्रकल्पामध्ये इच्छूक नाहीत असे दिसते.

१.६ सन २०२०-२१ मध्ये वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील आर.जी.-६, आर.जी.-१९, आर.जी.-२३ व टेकडी (Hills) या क्षेत्राच्या विकासाकरिता संकल्पचित्र, वित्त,

..७१/-

बांधणे, चालविणे व हस्तांतरण तत्वावर (Design, Finance, Built, Operate & Transfer Basis) (DFBOT) ३० वर्षांकरिता ई निविदेद्वारे यशस्वी निविदाकाराची नियुक्ती करणेचे योजिले होते. आरजीच्या भूखंडावर एजन्सीमार्फत मनोरंजनाचे केंद्र (Club House), भूमिगत सार्वजनिक वाहनतळ (Underground Public Car Park), हेलीपॅड (Helipad) व सार्वजनिक वापराचा बगिचा (Garden and Sports Facility) देखिल विकसित करण्याचा प्रस्ताव होता.

याबाबत प्राधिकरणाने दि.७ जुलै, २०२० रोजीच्या १४९ व्या बैठकीत ठराव क्र.१५३४ अन्वये मान्यता दिली आहे. याबाबतची ई-निविदा दि.२४ ऑगस्ट, २०२० रोजी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर (Website) व ई-टेंडर पोर्टलवर प्रकाशित केली होती. सदर निविदेची निविदा पुर्व बैठक दि.३१ ऑगस्ट, २०२० रोजी संपन्न झाली. परंतु खालील कारणांमुळे सदर निविदा प्रक्रिया महानगर आयुक्तांच्या मान्यतेने दि.२४ मार्च, २०२१ रोजी थांबविण्यात आली :

(i) सदर भूखंडाचा काही भाग प्राधिकरणाच्या मेट्रो कंत्राटदारांना तात्पुरत्या स्वरुपात वाटप केलेला असून सदर भाग कास्टिंग यार्डने व्यापला आहे.

(ii) सदर भूखंडाच्या काही भागास जमिन वापर निश्चित नसून त्यास जमिन वापर निश्चित करुन सुधारीत लेआऊट करणे गरजेचे आहे.

(iii) सदर भूखंडाच्या काही भागावर मिठी नदीच्या मेंटेंनन्ससाठीचा सेवा रस्ता (service road) आहे.

१.७ **आंतरराष्ट्रीय वित्त सेवा केंद्र** (IFSC) -

वांद्रे-कुर्ला संकुल येथे आंतरराष्ट्रीय वित्त सेवा केंद्र (IFSC) उभारण्यासाठी प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या १३८ व्या बैठकीतील ठराव क्र.१३४१ अन्वये "जी" ब्लॉक मध्ये २० हेक्टर क्षेत्र राखीव ठेवण्यासाठी मंजूरी प्रदान केली आहे.

विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ Act २००५) अनुसार एकत्रित जमिनीचे क्षेत्र ५० हे. पेक्षा अधिक असल्यास एक किंवा त्यापेक्षा अधिक सेवांकरीता SEZ मध्ये आंतरराष्ट्रीय वित्त सेवा केंद्र (IFSC) अनुज्ञेय आहे असे केंद्र शासनाच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने दिनांक १८ जून, २०१६ च्या पत्राने प्राधिकरणास कळविले आहे. सबब, प्राधिकरणाने दिनांक ०६ जानेवारी, २०१७ व दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनास व

क्षेत्र ई-निविदेद्वारे नियुक्त एजन्सीकडून विकसित व देखभाल करण्याचे आणि सर्वसामान्य जनतेस मनोरंजनासाठी व बगिचा म्हणून खुले करण्याचे प्रस्तावित आहे.

२.४ **अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र:** - आर.जी. – २३अ व आर.जी. - २३ ब या (LOS) भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ ८.३७ हे. एवढे आहे. या LOS च्या भूखंडावर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या १५% म्हणजेच (८.३७ हे. च्या १५%) १.२५ हे. एवढे बांधकाम क्षेत्र खेळासाठी व मनोरंजनाच्या बांधकामासाठी (Club House) अनुज्ञेय आहे.

२.५ **प्रस्तावित वापर:-** विषयांकित जमिनीवर पुढील तक्ता – अ प्रमाणे प्रस्तावित वापर वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय राहील. प्राधिकरणाने विषयांकित भूखंडावर खालीलप्रमाणे विकास करणे योजिले आहे व त्यासाठी आता ई-निविदा मागवून विकास करण्याचे योजिले आहे.

**तक्ता – अ**

| | **लेआऊटमधील मनोरंजनासाठीची जागा (LOS) आर.जी. – २३ अ, आर.जी. – २३ ब (अंदाजे ८.३७ हे.)** | | **पब्लिक ओपन स्पेसचा (POS) आर.जी.-६ व टेकडी (Hills) (अंदाजे २.४७ हे.)** |
|---|---|---|---|
| | **सीआरझेड मधील भूखंड** | **सीआरझेड बाहेरील भूखंड** | **सीआरझेड बाहेरील भूखंड** |
| **भूखंड क्षेत्र** | **४०,१९२.३६ चौ.मी.** | **४३,५७९.७८ चौ.मी.** | **२४,७७४.३७ चौ.मी.** |
| **अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र** | **० चौ.मी.** | **१२,५६५.०० चौ.मी. (१.२५ हे.)** | **० चौ.मी.** |
| **अनुज्ञेय वापर** | **खेळाची मैदाने व बगीचा (Outdoor Sports Facility & Garden)** | **१) मनोरंजनाचे केंद्र (Club House)** (अनुज्ञेय कमाल बांधकाम क्षेत्र १२,००० चौ.मी.) **२) २ हेलीपॅड (Helipad)** (दोन्ही हेलिपॅड जमिनीवर किंवा पैकी १ Club House वर) (अनुज्ञेय कमाल बांधकाम क्षेत्र ५६५.०० चौ.मी.) **३) समारंभासाठीचे लॉन (Banquet lawn)** (समारंभासाठी वापर अनुज्ञेय, भूखंड क्षेत्र १०,००० चौ.मी.) | **सार्वजनिक वापराचा बगीचा (Public Garden)** केवळ विकास व देखभालीसाठी |

टिप्पणी :

१. वरील तक्त्यात नमूद भूखंडांपैकी काही भाग मेट्रो प्रकल्पाच्या कास्टींग यार्डसाठी तात्पूरत्या स्वरूपात वापरण्यात येत आहे. सदर भूखंडांचा ताबा प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर तो यशस्वी निविदाकारास देण्यात येईल, याबाबतच्या सुयोग्य अटी व शर्ती महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने ई-निविदेमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

२. वरील घटकाप्रमाणे निविदा पुस्तिका तयार करुन महानगर आयुक्त यांच्या मान्यतेनंतर शासनाच्या महाटेंडर पोर्टलवर (३ लिफाफे पध्दतीने) ई-निविदा प्रणाली द्वारे निविदा मागवून यशस्वी निविदाकार निवडण्यात येईल.

**२१.३ बाब टिप्पणीमधील मुद्दे विचारात घेता खालील प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी सादर : -**

३.१ वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील (अ) आर.जी. – २३अ व आर.जी.- २३ब या (LOS) भूखंडाचे विकास DFBOT तत्वावर तसेच (ब) आर.जी.-६ व टेकडी (Hills) (POS) भूखंडाचे विकास व देखभाल करण्यासाठी परिच्छेद-२.५ मधील तक्ता-अ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे विकसित करण्यासाठी ई-निविदेद्वारे प्राप्त होणारे उच्चतम निविदाकारास / एजन्सीला ३० वर्षाकरीता वाटप करणेसाठी मान्यता द्यावी, ही विनंती.

३.२ परिच्छेद २.५ मधील "तक्ता - अ" मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे (LOS) भूखंडावरील खेळासाठीचे तसेच मनोरंजन केंद्राच्या (Club House) सभासदाकडून सभासद शुल्क (Membership Fee), २ हेलीपॅड (२-Helipad) व समारंभासाठीचे लॉन (Banquet Lawn) यामधून निविदाकारास महसूल मिळेल. या सर्व महसुलातून निविदादाराने प्राधिकरणास दरवर्षी निश्चित शुल्क (Fixed Fee) रु. ५ कोटी प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस (अग्रिम) + इतर शासकीय प्रचलित कर देणे असून सदर अग्रिम देयकामध्ये ५% प्रति वर्ष (चक्रवाढ पध्दतीने) वाढ करुन ती फी निविदाकाराने प्राधिकरणाला भरणा करावी लागेल. तसेच या अग्रिम देयकाव्यतिरिक्त (Fixed Fee) जो निविदाकार त्यांच्या एकूण वार्षिक उत्पन्नामधील (Annual Gross Receipts) जास्तीत जास्त टक्केवारी प्राधिकरणास देईल त्याला यशस्वी निविदाकार समजण्यास मान्यता देण्यात यावी, ही विनंती.

तसेच, पूर्वीच्या निविदेतील दरवर्षी निश्चित शुल्क (Fixed Fee) रु. १० कोटी, हेलीपॅड चालवणे बद्दलचा अनुभव (experience) व भूमिगत वाहनतळ (Underground Public Parking) याबद्दलच्या अटी शिथिल करण्यात येतील व सदर अटी नविन निविदेमध्ये नमूद केल्या जाणार नाहीत जेणे करुन अधिक निविदाकार निविदेमध्ये भाग घेऊ शकतील व प्राधिकरणास जास्त किमतीची ऑफर प्राप्त होईल.

३.२ बाब टिप्पणीतील परिच्छेद २.५ "तक्ता - अ" मधील नमूद भूखंड क्षेत्र, अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र व निविदेतील इतर अटी व शर्ती यामध्ये महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने आवश्यक बदल करून ई-निविदा मागविण्यास मान्यता द्यावी, ही विनंती.

२१.१० वरील प्रस्तावाबाबत चर्चेदरम्यान, मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या वित्तीय केंद्रासाठी हेलिकॉप्टरची सेवा आवश्यक आहे, तसेच हेलिकॉप्टर सेवा सुरळीत चालविण्यासाठी हेलिपॅड हे मिठी नदीच्या काठावर असावे. मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे नमूद केले की, वांद्रे कुर्ला संकुलात हेलिकॉप्टर सेवा हि वैद्यकीय रुग्णवाहिका म्हणून देखील आवश्यक आहे. सबब, त्यांनी वांद्रे कुर्ला संकुलात जागतिक दर्जाची सुविधा व क्लब हाऊस तयार करण्याच्या प्राधिकरणाच्या प्रस्तावाचे स्वागत केले. त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव संमत केला.

<u>**ठराव क्र.१६५६:**</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ पोटकलम (२) अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिन विल्हेवाट) विनियम,१९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकांराचा वापर करुन वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील (अ) आर.जी.- २३अ व आर.जी.- २३ब या (LOS) भूखंडाचे विकास DFBOT तत्वावर तसेच (ब) आर.जी.-६ व टेकडी (Hills) (POS) भूखंडाचे विकास व देखभाल करण्यासाठीचे परिच्छेद-२.५ मधील तक्ता-अ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे विकसित करण्यासाठी ई-निविदेद्वारे प्राप्त होणा-या उच्चतम निविदाकारास / एजन्सिला ३० वर्षाकरीता वाटप करण्यासाठी मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीतील परिच्छेद परिच्छेद २.५ मधील "तक्ता – अ" मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे (LOS) भूखंडावरील खेळासाठीच तसेच मनोरंजन केंद्राच्या (Club House) सभासदाकडून सभासद शुल्क (Membership Fee), २ हेलीपॅड (२-Helipad) व समारंभासाठीचे लॉन (Banquet Lawn) यामधून निविदाकारास महसूल मिळेल. या सर्व महसुलातून निविदादाराने प्राधिकरणास दरवर्षी निश्चित शुल्क (Fixed Fee) रु. ५ कोटी प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस (अग्रिम) देणे + इतर शासकीय प्रचलित कर असून सदर अग्रिम देयकामध्ये ५% प्रति वर्ष (चक्रवाढ पध्दतीने) वाढ करुन ती फी निविदाकाराने प्राधिकरणाला भरणा करावी लागेल. तसेच या अग्रिम देयकाव्यतिरिक्त (Fixed Fee) जो निविदाकार त्यांच्या एकूण वार्षिक उत्पन्नामधील (Annual Gross Receipts) जास्तीत जास्त टक्केवारी प्राधिकरणास देईल त्याला यशस्वी निविदाकार समजण्यास मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीतील परिच्छेद २.५ "तक्ता – अ" मधील नमूद भूखंड क्षेत्र, अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र व निविदेतील इतर अटी व शर्ती यामध्ये महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने आवश्यक बदल करून ई-निविदा मागविण्यास याद्वारे मान्यता देत आहेत.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील बाब टिप्पणीतील प्रस्तावांची अंमलबजावणी करण्यास तसेच पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.२२ : पूर्व मुक्त मार्गाचे छेडानगर, घाटकोपर ते ठाणे पर्यंत विस्तारीकरण करणेचे प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

२२.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दि. १६/११/२०२१ रोजी झालेल्या १५१ व्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेशाकरीता सर्वंकष वाहतुक आराखड्यास (Comprehensive Transport study) मंजूरी देण्यात आली आहे. या आराखड्यानुसार मुंबई महानगर क्षेत्रामध्ये वाहतुक व्यवस्था सुधारण्यासाठी भविष्यात हाती घेणे आवश्यक असलेल्या विविध वाहतुक प्रकल्पांची आवश्यकता नमूद करण्यात आली आहे. यामध्ये पूर्व मुक्त मार्गाचे छेडानगर, घाटकोपर ते ठाणे पर्यंत विस्तारीकरण करणे व त्यास ढोबळ मानाने अपेक्षित खर्च रु. ३१४२ कोटी रक्कम नमूद करण्यात आली आहे. पूर्व मुक्त मार्गाचे बांधकाम प्राधिकरणामार्फत सन २०१३ मध्ये करण्यात आले असून या १६.८० कि.मी. लांबीच्या मुक्त मार्गामुळे वाहनांना दक्षिण मुंबई येथील पी. डीमेलो मार्गापासुन घाटकोपर पर्यंत विना अडथळा व जलदरीत्या प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. सद्यस्थितीत घाटकोपर व सायन पासून मुलुंड, ठाणे, कल्याण व त्यापुढील भागांमध्ये प्रवास करणाऱ्या वाहनांना पूर्व द्रुतगती महामार्गाचा वापर करावा लागतो. या लांबीत सद्यस्थितीत छेडानगर, घाटकोपर ते आनंदनगर, ठाणे या प्रवासाकरीता वर्दळीच्या वेळेस साधारणपणे ३० मिनिटांचा कालावधी लागतो व भविष्यात समृध्दी महामार्ग व इतर वाढ होणारी वाहतुक लक्षात घेता सध्या असणारा १० मार्गिकांचा मार्ग हा अपुरा पडेल. यास्तव पूर्व मुक्त मार्गाचे ठाण्यापर्यंत विस्तारीकरण करणेचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

२२.२ चर्चेनुसार, या प्रस्तावाचे अनुषंगाने सविस्तर सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक बनविणे व व्यवहार्यता तपासण्यासाठी सल्लागार नियुक्तीकरीता निविदा प्रक्रिया करुन मे. टेक्नोजेम कंसल्टंट व मे. कंपोजिट कंबाईन कंसल्टंट (संयुक्त भागीदारी) या सल्लागार संस्थेची नेमणूक करण्यात आली. प्रकल्पाचा अभ्यास करुन सल्लागारांनी खालीलप्रमाणे पर्याय सुचविले :-

१ महामार्गाच्या दक्षिण बाजुचा मुख्य वाहनमार्ग व सेवा रस्त्यांमधून उन्नत मार्गाचे बांधकाम करणे. (४ पदरी वाहनमार्गीका)

२ महामार्गाच्या मध्यातुन सहा पदरी वाहन मार्गिकांच्या उन्नत मार्गाचे बांधकाम करणे.

३ तीन पदरी वाहन मार्गिकांच्या दोन स्वतंत्र उन्नत मार्गाचे उत्तर व दक्षिण बाजूंना वाहन मार्गीका व सेवा रस्त्याच्यामध्ये बांधकाम करणे.

४ सहा मार्गिकांच्या उन्नत मार्गाचे महामार्गाच्या मध्य रेषेवर आणि अस्तित्वातील उड्डाणपुलांच्या लांबीत प्रत्येकी तीन वाहन मार्गिकांच्या स्वतंत्र मार्गिकांचे बांधकाम मुख्य वाहन मार्गीका व सेवा रस्त्याच्या मध्ये ठेवण्यात आले आहेत.

२२.३. प्रस्तावित उन्नत मार्ग घाटकोपर पूर्व येथील छेडानगर येथे सुरु होऊन आनंदनगर ठाणे येथे समाप्त होईल. या मार्गाची एकूण लांबी १३ कि.मी. असून यात ३+३ वाहन मार्गिका असुन रुंदी २४ मी. आहे. या प्रकल्पाचे बांधकाम एकाच पीअरवर असून अस्तित्वातील उड्डाणपुलांच्या लांबीत उन्नत मार्ग दूभागुन प्रत्येकी तीन मार्गिका उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूने असतील. या उन्नत मार्गास मुंबई दिशेकडे चढण्यासाठी दोन व ठाणे दिशेकडे उतरण्यासाठी ऐरोली व कांजुरमार्ग येथे दोन अशा चार रॅम्पची सुविधा देण्यात येईल. यामुळे विमानतळ, ऐरोली, आय आय टी, पश्चिम उपनगरे आणि नवी मुंबई दिशेकडील वाहतुकीसाठी उन्नत मार्गाचा उपयोग होईल. याशिवाय मुलुंड येथे असलेल्या पथकर नाक्याच्या वर नाशिक व ठाणेकडून येणाऱ्या वाहतुकीसाठी उन्नत पातळीवर नविन पथकर वसुली नाक्यासाठी बांधकाम करण्याची तरतूद करण्यात आली आहे. रमाबाई नगर येथील वाहनांच्या भुयारी मार्गाचे सेवा रस्त्यापर्यंतचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. कांजुरमार्ग जंक्शन येथे उड्डाणपुलाचे रुंदीकरण आणि गोदरेज जंक्शन येथे नवीन उड्डाणपुलाचा समावेश आहे. अस्तित्वातील महामार्गाचे आवश्यक त्या लांबीत डांबरीकरणाने मजबुतीकरण करण्यात येईल.

२२.४. समितीने शिफारस केलेल्या चौथ्या पर्यायाचे अंदाजपत्रक सल्लागारांनी तयार केले असून याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२२-२३ चे दर सुचिनुसार दर पृथ:करण करुन बाबीचा समावेश केला आहे. अंदाजपत्रकाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे सादर करण्यात आले :-

| अ.क्र. | कामाचा तपशिल | एकूण किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| १ | भाग १ : उन्नत मार्ग | १५५४.९६ |
| २ | भाग १ : उन्नत पातळीवर पथकर वसुली नाका | १७८.६६ |
| ३ | भाग ३ : अतिरिक्त रॅम्प | १२४.२४ |
| ४ | भाग ४ : नवीन गोदरेज उड्डाणपुलआणि कांजुरमार्ग उड्डाणपुलाचे रुंदीकरण | ७६.२५ |
| ५ | भाग ५ : विविध ठिकाणी रस्त्यांची सुधारणा. | १३९.३३ |
| ६ | **एकूण किंमत** | **२०७३.४५** |
| ७ | गौण स्वामित्व घन शुल्क | ५.२३ |
| ८ | वस्तू व सेवा कर | ३७३.२२ |
| ९ | **एकूण किंमत** | **२४५१.९१** |
| १० | विमा | **२०.७४** |
| ११ | सेवा वाहिन्या स्थलांतरण | १०३.६७ |
| १२ | देखभाल दुरुस्ती | ७७.७५ |
| १३ | **एकूण प्रकल्प खर्च** | **२६५४.०७** |
| १४ | आकस्मिक खर्च | २६.५४ |
| १५ | पर्यवेक्षण सल्लागार शुल्क @ ३% | ७९.६२ |
| १६ | भाववाढ @ ५.००% | १३२.७० |
| १७ | **एकूण** | **२८९२.९३** |
| १८ | **एकूण खर्च रु. (कोटी)** | **२८९३.००** |

२२.५ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी **पूर्व मुक्त मार्गाचे छेडानगर, घाटकोपर ते ठाणे पर्यंत विस्तारीकरण करणे या प्रकल्पाच्या बांधकामासाठी रु. २८९३/- कोटी (रु. दोन हजार आठशे त्र्याण्णव कोटी मात्र) अंदाजपत्रकीय रकमेचा प्रस्ताव** प्रशासकीय मंजुरीकरीता प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला आहे.

२२.६ चर्चेदरम्यान, मा. उप मुख्यमंत्री यांनी सद्या पूर्व मुक्त मार्ग शिवाजी नगर (गोवंडी) येथून सरळ पूर्व द्रुतगती मार्गावर घाटकोपर येथे जोडणे शक्य आहे का ? याबाबत विचारणा केली . यावर महानगर आयुक्त यांनी सदर लांबीत ४ मजली असणाऱ्या झोपड्या व त्यांचे पुनर्वसन पुढे कांदळवनातून जात असल्यामुळे त्यास कांदळवन कक्षाकडून पर्यावरण विभागाची परवानगी लागेल. तद्नंतर, मा. उप मुख्यमंत्री यांनी सदर संरेखनाची महानगर आयुक्त स्तरावर पडताळणी करून त्या प्रस्तावास मान्यता देण्यास हरकत नाही असे निर्देश दिले.

**२२.७ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१६५७:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, पूर्व मुक्त ते घाटकोपर या संरेखनेचा अभ्यास करून महानगर आयुक्त यांनी अंतिम केलेल्या संरेखनेस प्राधिकरण याद्वारे पूर्व मुक्त मार्गाचे छेडानगर, घाटकोपर ते ठाणे पर्यंत विस्तारीकरण करणे या प्रकल्पाच्या बांधकामासाठी रु. २८९३/- कोटी (रु. दोन हजार आठशे त्र्याण्णव कोटी मात्र) अंदाजपत्रकीय रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.२३ : वांद्रे रेक्लमेशन, मुंबई येथे "मुंबई आय"(Mumbai Eye) या प्रकल्पाच्या उभारणीसाठी तांत्रिक व्यवहार्यपूर्वाभ्यास करणे (Technical Feasibility) तसेच प्रकल्प उभारणी करण्याकरिता विकासकाची नेमणूक करण्याबाबत.**

२३.१ महानगर आयुक्त यांनी वरील विषयाच्या अनुषंगाने माहिती देताना सदर प्रकल्पाच्या पार्श्वभूमीबाबत असे सांगितले की, मा. मंत्री, नगर विकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) व अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वांद्रे रेक्लेमेशन, मुंबई येथे लंडन आयच्या धर्तीवर 'मुंबई आय' (Mumbai Eye) या प्रकल्पाची प्रक्रिया सूरू करण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिली होती.

त्याअनुषंगाने दिनांक १० मे, २०२१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६८व्या बैठकीमध्ये 'मुंबई आय' प्रकल्पाबाबत व्यवहार्यपूर्वाभ्यास करणे, तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करणे, जागेची निवड करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा तयार करणे व एजन्सीच्या निवडीसाठी निविदा प्रकिया व्यवस्थापन राबविणे आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणे याकरिता कार्यकारी समितीच्या मंजूरीने सल्लागाराची नेमणूकीबाबतची प्रक्रिया करण्यात आली होती.

सदर प्रक्रियेअंती M/s Skill Tree Consulting Private Limited, Guru Gram Haryana, यांना दि. १० ऑगस्ट, २०२१ रोजी प्राधिकरणामार्फत कार्यादेश निर्गमित करण्यात आला होता. सल्लागारामार्फत कार्यादेशामध्ये नमूद आवश्यक वितरणांची विहित मुदतीत पुर्तता न झाल्यामुळे सदर कार्यादेश दि. २५ मार्च, २०२२ रोजी रद्द करण्यात आला.

२३.२ चर्चेच्या अनुषंगाने सदर प्रकल्प राबविण्याकरिता सल्लागाराच्या नियुक्तीची निविदा प्रक्रिया पुन:श्च हाती घेण्यापूर्वी प्रकल्पाकरिता पर्याय म्हणून निवडण्यात आलेल्या योग्य स्थळांच्या जमिनी ताब्यात असलेल्या संस्थेंचे (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई पोर्ट ट्रस्ट) अभिप्राय प्राधिकरणामार्फत मागविण्यात आले आहेत. यापैकी बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचेकडून सकारात्मक प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. तथापि, सदर प्रकल्पासाठी वांद्रे रेक्लेमेशन येथील जागा उपलब्धतेबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जमिनीबाबत महामंडळासोबत सकारात्मक चर्चा सुरु आहे.

पर्याय म्हणून निवडण्यात आलेल्या जमिनींपैकी वांद्रे रेक्लेमेशन येथून वांद्रे – कुर्ला वित्तीय संकुलाची निकटता, सागरी किनारपट्टीचे दर्शनिय दृश्य, शहराच्या आकाश रेषेचा विलक्षण अनुभव तसेच दादर येथील निर्माणाधीन असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १३७ मी. उंची असलेले 'समानतेचे भव्य स्मारक' (Statue Of Equality) याची वांद्रे रेक्लेमेशन पासून असलेली निकटता लक्षात घेता,भविष्यात प्रस्तावित 'मुंबई आय' ते सदर स्मारकापर्यंत फेरी सेवा उपलब्ध करुन दोन्ही पर्यटन स्थळे जोडली जाण्याची शक्यता, या बाबींचा विचार करता वांद्रे रेक्लेमेशन हे स्थळ सदर प्रकल्प उभारणीकरिता पर्यटन वाढीच्या दृष्टीने अधिक व्यवहार्य वाटते.

२३.३ 'मुंबई आय' (Giant Observation Wheel) हा भारतामध्ये एक नावीन्यपूर्ण प्रकल्प असून त्याची अंमलबजावणी झाल्यास मुंबई तसेच महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्रास चालना मिळेल. सदर प्रकल्पाचा विकास खाजगी-सार्वजनिक भागीदारी (Public Private Partnership) तत्वाव्दारे राबविता येईल. त्याकरिता तांत्रिक व्यवहार्यपूर्वाभ्यास (Technical-Feasibility) तसेच प्रकल्प उभारणीसाठी विकासकाची नेमणूक करणे, अशा दोन टप्प्यांमध्ये राबविता येईल. सदर प्रकल्पाकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून वांद्रे रेक्लेमेशन येथील जमीन प्राप्त झाल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्रकल्प अंमलबजावणी संस्था

म्हणून नियुक्ती केल्यास, आंतरराष्ट्रीय अनुभव व ख्याती असलेल्या विकासकाची निवड जागतिक स्तरावरुन निविदा आमंत्रित करुन सदर प्रकल्प उभारण्यास विकासकाची निवड करता येईल. तसेच सदर प्रकल्पातून मिळणारे उत्पन्न महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व विकासक यांचेमध्ये विभागता येईल. तसेच सदर जमीन महामंडळाने उपलब्ध करुन दिल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यामध्ये नफ्यामधील भागीदारी देण्याच्या अटीवर करारनामा करण्यात येईल.

प्राधिकरणाने जगभरातील विविध आकाश पाळणे (Giant Observation Wheel), त्यांचा व्यास, उंची आणि बांधकाम खर्च इत्यादी बाबींची प्राथमिक माहितीच्या अनुषंगाने १२०-१५० मी. व्यास असलेला आकाश पाळणा तसेच अनुषंगिक पायाभूत सुविधा, परिसराचा विकास इ. करिता अंदाजे किंमत किमान रु.२००० कोटी असल्याचे दिसून येते.

सदर प्रकल्पाव्दारे अपेक्षित उत्पन्नाचे स्त्रोत हे पर्यटकांना होणारी तिकिट विक्री, सभोवतालच्या परिसराचा वाणिज्यीक वापर इ. होऊ शकेल.

२३.४ बाब टिप्पणीतील बाबी सादर करुन, महानगर आयुक्त यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केला :-

अ. प्रकल्पाचा विकास खाजगी-सार्वजनिक भागीदारी (Public Private Partnership) तत्वाव्दारे राबविणे. प्रकल्पातून मिळणारे उत्पन्न प्राधिकरण, जमीन उपलब्ध करुन देणारी संस्था आणि विकासक यांच्यामध्ये विभागणे.

ब. प्रकल्पासाठी आवश्यक जमीन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून नफ्यामधील भागीदारी देण्याच्या अटीवर उपलब्ध करुन घेणे व सदर जमीन उपलब्ध न झाल्यास इतर संस्थांकडून समान तत्वावर जमीन उपलब्ध करुन घेणे. संबंधित संस्थांमार्फत जमीन उपलब्ध करुन दिल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व सदर संस्थेमध्ये नफ्यामधील भागीदारी देण्याच्या अटीवर करारनामा करणे.

क. प्रस्तावित जमिनीची मालकी ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नसल्याने तसेच सदर जमिनीसाठी प्राधिकरण हे नियोजन/ विशेष नियोजन प्राधिकरण नसल्याने या प्रकल्पासाठी प्रकल्प अंमलबजावणी संस्था (Project Implementing Agency) म्हणून प्राधिकरणाची नियुक्ती करण्यासाठी शासनास विनंती करणे.

ड. सदर प्रकल्पाच्या उभारणीसाठी विकासकाची नेमणूक करण्याबाबतची प्रक्रिया जागतिक ई -निविदा प्रणालीव्दारे विनंती प्रस्ताव प्रसिध्द करुन पार पाडणे.

इ. 'मुंबई आय' प्रकल्पाची उभारणी करण्याकरीता तांत्रिक व्यवहार्यपूर्वाभ्यास करणे (Technical-Feasibility) ज्यामध्ये वाहतुक प्रभाव अभ्यास, पर्यावरणीय प्रभाव अभ्यास, टोपोग्राफीक सर्वेक्षण, प्रस्तावित जमिनीची तपासणी व विमान वाहतूक प्राधिकरणाकडून मंजूरी इ. करिता सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी मान्यता देणे. तसेच प्रकल्प उभारणी करण्याकरीता विकासकाची नेमणूक करण्यासाठी मान्यता देणे व याबाबत अनुषंगिक सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करणे.

२३.५ वरील प्रस्तावाबाबत चर्चेदरम्यान मुख्य सचिव यांनी असे सुचविले की, सदर प्रकल्प उभारण्याकरिता विकासकाने अभ्यास करुन दोन-तीन पर्यायी जागा सूचवाव्यात तसेच त्या जागांपैकी कोणती जागा सदर प्रकल्पासाठी योग्य राहील याबाबत शिफारस करावी. त्यास मा. मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सहमती दर्शविली.

**२३.६ सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-**

<u>ठराव क्र.१६५८:</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम १ चे पोटकलम (घ) व (च) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे 'मुंबई आय' प्रकल्पाची अंमलबजावणी खाजगी-सार्वजनिक भागीदारी (नफ्यामधील भागीदारीसह) तत्वावर राबविण्यास तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सदर प्रकल्पासाठी प्रकल्प अंमलबजावणी संस्था (Project Implementing Agency) म्हणून नेमणूक करण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देत आहे,

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्पासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करुन दिल्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ किंवा इतर संस्था व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये नफ्यामधील भागीदारी देण्याच्या अटीवर करारनामा करणेस मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्प राबविण्याकरीता सल्लागारातर्फे दोन-तीन पर्यायी जागेंचा अभ्यास करुन योग्य जागा सुचविणे व सदर सुचविलेल्या जागेकरिता तांत्रिक व्यवहार्यपूर्वाभ्यास करणे (Technical-Feasibility) ज्यामध्ये वाहतुक प्रभाव अभ्यास, पर्यावरणीय प्रभाव अभ्यास, टोपोग्राफीक सर्वेक्षण, प्रस्तावित जमिनीची तपासणी, व विमान वाहतूक प्राधिकरणाकडून मंजूरी इ. तसेच प्रकल्प उभारणी करण्याकरिता विकासकाची नेमणूक जागतिक निविदा मागवून करण्यासाठी मान्यता देत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येतो की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>पटल बाब क्र.०१ :</u>** **मुंबई मेट्रो मार्ग-१ वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर कॉरिडोर मे. मुंबई मेट्रो वन प्रा.लि. (मे.मुंबई मेट्रो वन प्रा.लि.(MMOPL) द्वारे सादर केलेल्या विविध विचारांचे सादरीकरण.**

प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये मेट्रो मार्ग- १ बाबत सविस्तर चर्चा केल्यानंतर, सदरचा प्रस्ताव हा कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी सादर करण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********